सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. २१ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक १०९ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## भारताने विकसित केली मलेरिया प्रतिबंधक लस



नवी दिल्ली : भारताने मलेरिया प्रतिबंधक लस विकसित केली आहे. या लसचे नाव एडफाल्सीवॅक्स असे ठेवण्यात आले आहे. ही लस मलेरियाला प्रतिबंध करेल आणि मलेरियाच्या प्रार्दुभावाला आळा घालण्यासही मदत करेल. यामुळे भारतातून लवकरच मलेरिया या आजाराने उच्चाटन करणे शक्य होईल, असा विश्वास संशोधक व्यक्त करत आहेत.

आयसीएमआरने मलेरिया प्रतिबंधक लस विकसित केल्याचे जाहीर केले आहे. डासांमुळे भारतात दरवर्षी अनेकजण आजारी पडतात. यातील काही जणांचा मृत्यू होतो. पण मलेरियाला प्रतिबंधक लसमुळे ही परिस्थिती बदलण्यास मदत होणार आहे. भारतात डेंग्यू आणि चिकनगुनिया या आजारांना प्रतिबंध करण्यासाठीही लस विकसित करण्याचे काम सुरू आहे.

भारताने विकसित केलेली मलेरिया प्रतिबंधक लस अर्थात एडफाल्सीवॅक्स परजीवी प्लास्मोडियम फाल्सीपेरमवर कमालीची प्रभावी ठरली आहे. लस घेतलेल्या व्यक्तीच्या शरीरात मलेरियाशी संबंधित परजीवी सक्रीय होऊ शकत नाही. यामुळे संबंधित व्यक्तीला मलेरिया होत नाही तसेच त्याच्या शरीरातून मलेरियाचे कोणत्याही प्रकारे संक्रमण होण्याची शक्यता मावळते.

## मुंबई बाहेर गेलेल्या मराठी माणसांना ३५ लाख घरे उपलब्ध करणार : उपमुख्यमंत्री



मुंबई: उबाठाच्या नेत्यांनी शिवसेना नेते रामदास कदम आणि गृहराज्य मंत्री योगेश कदम यांच्यावर अधिवेशनात आरोप केले होते. या आरोपांचा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज कडक शब्दांत समाचार घेतला. गोरेगाव मधील नेस्को येथे शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत सिद्धेश कदम यांनी आयोजित केलेले विशेष शिबिरात ते बोलत होते. यावेळी शिवसेना नेते गजानन कीर्तिकर, नेते रामदास कदम, खासदार रवींद्र वायकर, प्रवक्ते संजय निरुपम यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. ते म्हणाले की, रामदास कदम मला माहित आहे, त्यामुळे तुम्ही काळजी करु नका. निवडणुका आल्या की काही लोक बदनामीची खेळी खेळतात. निवडणुका येतात आणि जातात पण त्यांनी लक्षात ठेवावे, ज्यांचं घर काचेचं असतं, त्यांनी इतरांवर दगड मारू नये, असा इशारा त्यांनी यावेळी आरोप करणाऱ्यांना दिला. त्यांच्या पोटात दुखते कारण त्यांनी इतकी वर्ष मराठी माणसांसाठी काही केलं नाही. आपल्या सरकारने मुंबईतील रस्ते कॉंक्रिटचे केले आहेत. येत्या अडीच वर्षांत संपूर्ण मुंबईचे रस्ते कॉंक्रिटचे होतील. रस्त्यांचे रिपेअरिंग होणार नाही, त्यामुळे त्यांचा पैसा बंद होईल अशी टीका त्यांनी उबाठावर केली. मराठी माणसासाठी त्यांनी काहीच केलं नाही. बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न होते की ४० लाख घरे मराठी माणसाला मिळायला हवीत. आम्ही हे स्वप्न पुढे नेत आहोत. ३५ लाख घरे उभारण्याचे काम सुरू केले आहे. मराठी माणसाला हक्काचं घर मिळवून देण्यासाठी काम सुरू आहे. जे मराठी लोक मुंबईबाहेर गेले, त्यांना परत आणण्याचे काम आम्ही करत आहोत. मी सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलो नाही, पण प्रत्येकाच्या हातात तो देण्याची माझी इच्छा आहे असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. काचेच्या घरात राहणाऱ्यांनी इतरांवर दगड मारू नये, असा इशारा शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज उबाठा गटाला दिला.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सिद्धेश कदम, योगेश कदम आणि रामदास कदम यांच्या कामाचं कौतुक करताना सांगितले की, येथे उपस्थित नेते हे शाखाप्रमुख राहिले आहेत. शाखा हे न्यायाचे मंदिर आहे. शिवसैनिक वर्षानुवर्षे तिथे जनतेसाठी काम करत आले आहेत. लोकांचा विश्वास आहे की, आपल्याला तिथे न्याय मिळतो. मी देखील जनतेच्या सेवा कार्यातून आणि शाखेतील कामगिरीमधूनच मुख्यमंत्री झालो आणि सत्तेतील माझ्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. आजही तीच दिशा पुढे नेण्याचे काम चालू आहे. आपण अनेक योजना सुरू केल्या.

## आ. रोहित पवारांविरुद्ध मुंबईत गुन्हा दाखल

मुंबई : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सरचिटणीस आणि आमदार रोहित पवार यांच्यावर आझाद मैदान पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांना दमबाजी करणे, पोलीस ठाण्यात जाऊन पोलिसांनाच आवाज चढवू नको असे मोठ्या आवाजात बोलणे रोहित पवारांना भोवले आहे. आझाद मैदान पोलीस ठाण्यातील पोलिसांशी गैरवर्तन करणे आणि सरकारी कामात अडथळा आणणे यासाठी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भारतीय जनता पार्टीचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये विधानभवनात हाणामारी झाली. यानंतर पोलिसांनी हाणामारी प्रकरणी आव्हाडांच्या समर्थकाला अटक केली. या समर्थकाची सुटका व्हावी यासाठी आधी आव्हाडांनी निवडक कार्यकर्त्यांसोबत जाऊन रस्त्यात पोलिसांची गाडी अडवली. पण पोलिसांनी आव्हाड आणि त्यांच्या समर्थकांना बाजूला करुन पुढील कारवाई सुरू केली. पोलीस कार्यकर्त्याला सोडत नसल्याचे बघून आव्हाड थेट पोलीस ठाण्यात धडकले. तिथे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सरचिटणीस आणि आमदार रोहित पवार पण पोहोचले. पोलीस ठाण्यात रोहित पवार आणि पोलीस अधिकारी यांच्यात वाद झाला होता. यावेळी रोहित पवारांनी पोलिसांना दमबाजी केली. या घटनेचे व्हिडीओ व्हायरल झाले. आता या प्रकरणात रोहित पवारांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## आयसीसीकडून २०२४ च्या विकास पुरस्कारांच्या जागतिक विजेत्यांची घोषणा




दुबई, २० जुलै : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने आयसीसी विकास पुरस्कार २०२४ च्या जागतिक विजेत्यांची घोषणा केली आहे. 'विकास पुरस्कार' २००२ मध्ये सुरू झाले होते. याचा उद्देश आयसीसीच्या असोसिएट सदस्य देशांच्या नवीन विचारसरणी आणि उपक्रमांचा सन्मान करण्याचा होता. आयसीसीनुसार २०२४ च्या पुरस्कारांमध्ये एकूण सात श्रेणी आहेत. यावेळी 'आयसीसी एक्स रेक्सोना क्रिओ फेस्टिव्हल ऑफ द इयर अवॉर्ड' नावाची एक नवीन श्रेणी जोडण्यात आली आहे. भूतान, इंडोनेशिया, नामिबिया, नेपाळ, स्कॉटलंड, टांझानिया, यूएसए आणि वानुआतू हे पुरस्कार प्राप्त करणारे आठ सदस्य देश आहेत.

आयसीसीने म्हटले आहे की, क्रिकेट नामिबियाची 'आयसीसी डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह ऑफ द इयर' म्हणून निवड करण्यात आली आहे. क्रिकेट नामिबियाने त्यांच्या ॲशबर्टन क्काटा मिनी-क्रिकेट कार्यक्रमासाठी हा पुरस्कार जिंकला आहे. आयसीसी महिला क्रिकेट इनिशिएटिव्ह ऑफ द इयर हा पुरस्कार दोन विजेत्यांना देण्यात आला आहे. भूतान क्रिकेट कौन्सिल बोर्ड आणि वानुआतू क्रिकेट असोसिएशनला या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यूएसए क्रिकेटला 'आयसीसी असोसिएट मेंबर्स मेन्स टीम परफॉर्मन्स ऑफ द इयर' म्हणून गौरवण्यात आले.

क्रिकेट स्कॉटलंडला 'आयसीसी असोसिएट मेंबर्स वुमेन्स टीम परफॉर्मन्स ऑफ द इयर' हा पुरस्कार देण्यात आला आहे. नेपाळ क्रिकेट असोसिएशनला 'आयसीसी डिजिटल फॅन एंगेजमेंट ऑफ द इयर' हा सन्मान मिळाला आहे. याशिवाय, पर्साटुआन क्रिकेट इंडोनेशियाला 'आयसीसी क्रिकेट ४ गुड सोशल इम्पॅक्ट इनिशिएटिव्ह ऑफ द इयर' हा पुरस्कार देण्यात आला आहे, तर 'आयसीसी एक्स रेक्सोना क्रिओ फेस्टिव्हल ऑफ द इयर' हा पुरस्कार टांझानिया क्रिकेट असोसिएशनला देण्यात आला आहे.

## भारत-पाकिस्तान सामना रद्द; भारतीय क्रिकेटपटूंची वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्समधून माघार



लंडन, २० जुलै : रविवारी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स सामना रद्द करण्यात आला आहे. भारतीय क्रिकेटपटूंनी त्यांची नावे मागे घेतल्यानंतर आयोजकांनी हा निर्णय घेतला आहे. डब्ल्यूसीएलने देखील या संदर्भात एक निवेदन दिले आहे. डब्ल्यूसीएलने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, भारत-पाकिस्तान सामना दोन्ही देशांमधील अलिकडेच झालेल्या व्हॉलीबॉल सामन्यानंतर नियोजित होता. पण सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अनेक भारतीय क्रिकेटपटूंनी पाकिस्तानसोबत सामना न खेळण्याच्या बाजूने होते. भारतीय फलंदाज शिखर धवननेही इन्स्टाग्रामवर या सामन्याबद्दल आपला राग व्यक्त केला. त्याने लिहिले की, ''११ मे रोजी मी उचललेल्या पावलावर मी अजूनही ठाम आहे. माझा देश माझ्यासाठी सर्वकाही आहे आणि माझ्या देशापेक्षा मोठे काहीही नाही. जय हिंद.'' पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला होता. सुरेश रैना, शिखर धवन आणि हरभजन सिंग यांनी या स्पर्धेतून माघार घेतली होती. मात्र, भारत-पाकिस्तान सामन्याबाबत सोशल मीडियावर बरीच नाराजी व्यक्त केली जात होती.

## दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणासाठी मित्र पक्षांचा सल्ला घ्यावा लागेल - भुजबळ



नाशिक, २० जुलै : दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विलिनीकरण करायचे असतील तर मित्र पक्षांचा सल्ला घ्यावा लागेल. त्यांना विश्वासात घ्याव लागेल, असे सांगून राज्याचे अन्न व पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले की, विधिमंडळात झालेला प्रकार हा दुःखदायक आहे.

राज्याचे अन्न व पुरवठा मंत्री आणि समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष छगन भुजबळ हे नाशिक दौऱ्यावरती आहेत रविवारी सकाळी निवडक पत्रकारांशी संवाद साधताना भुजबळ म्हणाले की, दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस एकत्र येण्यासंदर्भामध्ये सध्या तरी कोणता विचार नाही. हे प्रांत अध्यक्ष सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले आहे. पण त्यांनी जर तसं करावयाचा असेल तर भाजपच्या वरिष्ठ नेते नेत्यांशी चर्चा करण्याचा घेतलेला निर्णय आणि केलेले वक्तव्य हे योग्यच आहे. कारण आत्ता राज्याच्या राजकारणामध्ये तीन पक्षांचे सरकार आहे. त्यामुळे मित्र पक्षांना विचारात घेऊन त्यांचा सल्ला घेऊन सुनील तटकरे योग्य ती पाऊल उचलतील आणि तेच करावे लागेल त्यांच्या विचाराशी सहमत असल्याचे बोलताना स्पष्ट करून छगन भुजबळ म्हणाले की, सध्या तरी काय घडत आहे काय घडत नाही या सर्व बाबींचे पडताळणी करावी लागेल आणि त्यावरच प्रतिक्रिया देऊ, असे ते म्हणाले.

नाशिकमध्ये सुरू असलेल्या हनी ट्रॅप प्रकरणाबाबत बोलताना छगन भुजबळ म्हणाले की, या सर्व प्रकरणाची मुख्यमंत्र्यांनी चौकशी केली असेलच आणि त्यानंतरच त्यांनी याबाबत वक्तव्य दिला आहे. त्यामुळे मी जास्त काही बोलण्यात अर्थ नाही. मुख्यमंत्र्यांनी या सर्व प्रकरणी खुलासा केलेला आहे, असेही भुजबळ यांनी स्पष्ट केले.

नाशिकमध्ये फार मोठे दुर्दैव आहे कारण नाशिकचं नाव कधी खड्ड्यांवरून खराब होतं तर, सातत्याने होत असलेल्या खुनामुळे नाशिकला बदनामी मिळते तर कधी हनी ट्रॅप सारख्या प्रकरणांमध्ये नाशिकचे नाव येतं. कधी नाशिकमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते हे सर्व दुर्दैव नाशिकवासी यांना मिळाला आहे याचा खेद वाटतो. पण असा काय करणार कारण आलं आहे ते समोर सहन करावंच लागेल असा टोला देऊन भुजबळ यांनी नाशिकच्या होणाऱ्या बदनामी बाबत आपली नाराजी देखील व्यक्त केली.

## डॉन चित्रपटाचे दिग्दर्शक चंद्रा बारोट यांचे निधन



मुंबई, २० जुलै : महानायक अमिताभ बच्चन यांच्या गाजलेल्या डॉन चित्रपटाचे दिग्दर्शक चंद्रा बारोट यांचे निधन झाले आहे. ते ८६ वर्षांचे होते. गेल्या सात वर्षांपासून पल्मोनरी फाइब्रोसिस या फुफ्फुसांच्या गंभीर आजाराशी ते झुंज देत होते. रविवारी सकाळी मुंबईतील गुरु नानक रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनामुळे चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली आहे.

त्यांच्या निधनाची माहिती त्यांच्या पत्नीने दिली. याआधी त्यांच्यावर जसलोक रुग्णालयात उपचार सुरू होते. वयोमानानुसार वाढलेली शारीरिक अशक्तता आणि श्वसनाचे विकार त्यांच्या प्रकृतीस अधिकच गंभीर बनवत होते. चंद्रा बारोट यांच्या निधनावर चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवरांनी सोशल मीडियावरून श्रद्धांजली वाहिली. दिग्दर्शक फरहान अख्तर यांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करत लिहिले, डॉन चे मूळ दिग्दर्शक आता आपल्यात नाहीत हे ऐकून खूप दुःख झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो. त्यांच्या कुटुंबियांप्रती माझ्या गहिर्या संवेदना.

चंद्रा बारोट यांनी डॉन सारख्या अमर चित्रपटाचे दिग्दर्शन करून हिंदी सिनेसृष्टीत आपली अमिट छाप सोडली. त्यांनी 'पूरब और पश्चिम', 'यादगार' आणि 'रोटी कपड़ा और मकान' अशा सामाजिक विषयावरील चित्रपटांमध्ये सहायक दिग्दर्शक म्हणूनही कार्य केले. याशिवाय त्यांनी बंगाली सिनेमातही दिग्दर्शनाची चाचपणी केली होती. पण, आपल्या कारकिर्दीबद्दल बोलताना ते अभिमानाने म्हणत, लोक मला डॉन साठीच कायम लक्षात ठेवतील, आणि आज त्यांच्या या म्हणण्याला खरीच प्रचिती आली आहे. चंद्रा बारोट यांचे जाणे ही हिंदी सिनेसृष्टीसाठी मोठी हानी मानली जात आहे.

## चीनचे तिबेटमध्ये ब्रह्मपुत्रा नदीवर जगातील सर्वात मोठ्या धरणाचे काम सुरु



बीजिंग, २० जुलै - चीनने तिबेटमध्ये ब्रह्मपुत्रा नदीवर जगातील सर्वांत मोठ्या धरणाच्या बांधकामास शनिवारी(दि.१९) औपचारिक सुरुवात केली. अरुणाचल प्रदेशमधील भारत-चीन सीमेजवळ बांधण्यात येत असलेल्या या धरणासाठी चीन सरकार तब्बल १६७.८ अब्ज डॉलर खर्च करणार आहे. हा तोच प्रकल्प आहे ज्याला डिसेंबर २०२४ मध्ये मंजुरी देण्यात आली होती.

चीनचे पंतप्रधान ली कियांग यांच्या हस्ते धरणाचा पायाभरणी समारंभ झाला. या समारंभात त्यांनी धरणाच्या कामास प्रारंभ झाला असल्याची अधिकृत घोषणा केली. तिबेटमधील न्यिंगची शहराजवळील सखल भागात हे धरण उभारण्यात येत आहे. या ठिकाणी ब्रह्मपुत्रा नदीस स्थानिक भाषेत यार्लुंग झँगबो असे नाव आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, या धरणावर न्यिंगची मेनलिंग जलविद्युत प्रकल्प उभारण्यात येणार आहे. सूत्रांनी सांगितले की, हा ऊर्जा प्रकल्प जगातील सर्वांत मोठा पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. १६७.८ अब्ज डॉलर खर्चाच्या या प्रकल्पात ५ जलविद्युत स्टेशन्स असणार आहेत. त्यातून दरवर्षी ३०० अब्ज केडब्ल्यूएच विजेची निर्मिती होईल. ३० कोटी लोकांची विजेची गरज त्यातून भागेल. हा प्रकल्प भारत आणि बांगलादेश या देशांसाठी तो चिंतेचा विषय ठरणार आहे.

या वर्षी जानेवारीमध्येच भारताने या प्रकल्पाबद्दल चिंता व्यक्त केली होती. परराष्ट्र मंत्रालयाने चीनला ब्रह्मपुत्रेच्या खालच्या भागात कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही याची खात्री करण्याचे आवाहन केले होते.यावर चीनने दावा केला होता की, हा प्रकल्प सुरक्षित आहे आणि कोणालाही इजा होणार नाही.

दरम्यान, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी काही दिवसांपूर्वी इशारा दिला होता की चीन ब्रह्मपुत्र नदीवर 'वॉटर बॉम्ब' बांधत आहे. त्यांनी म्हटले होते की, हा प्रकल्प भारताच्या सुरक्षेला आणि अस्तित्वाला गंभीर धोका निर्माण करू शकतो.पुढे ते म्हणाले की, चीनने अद्याप कोणत्याही आंतरराष्ट्रीय जल करारावर स्वाक्षरी केलेली नाही. अशा परिस्थितीत, त्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. त्यांनी इशारा दिला की चीन काय करू शकतो हे कोणालाही माहिती नाही.

## मंदिर विश्वस्त संघटित झाल्यास मंदिरावरील आघात थांबतील! : श्री १००८ महामंडलेश्वर योगेशानंद गिरीजी महाराज

### छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र मंदिर महासंघाचे मंदिर - न्यास जिल्हा अधिवेशन !

छत्रपती संभाजीनगर :

धर्मासाठी सर्वांना संघटित व्हावे लागेल. संघटनामुळे अधर्म संपतो, हे आर्य चाणक्यांनी धनानंदला संपवून दाखवून दिले. धर्म टिकला तरच आपण टिकणार आहोत. देव, देश, मंदिर आणि धर्म यांवर होणाऱ्या आघातांविषयी हिंदूंनी जागृत व्हावे. सर्व मंदिर विश्वस्त संघटित झाल्यास मंदिरावरील आघात थांबतील. वेळीच जागे व्हा, तरच जागेवर राहाल, अन्यथा ही जागा सोडून जावे लागेल, असे प्रतिपादन श्री १००८ महामंडलेश्वर योगेशानंद गिरीजी महाराज यांनी केले. ते अधिवेशनाच्या प्रथम सत्रात बोलत होते.

श्री काशी विश्वनाथ बाबा संस्थान, दत्त मंदिर, बीड बायपास, श्री पावन गणेश मंदिर, दिवाण, देवडी, सोमठाणा येथील श्री रेणुकामाता मंदिर, हिंदु जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र मंदिर न्यास जिल्हा अधिवेशन पार पडले. श्री काशी विश्वनाथ बाबा संस्थान, दत्त मंदिर, बीड बायपास येथे दि.२० जुलै रोजी पार पडलेल्या अधिवेशनाचा शुभारंभ सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरु नंदकुमार जाधव, श्री १००८ महामंडलेश्वर योगेशानंदगिरीजी महाराज, पू. यशवंत शिवनगिरीकर महाराज, माजी सहाय्यक धर्मदाय आयुक्त श्री. दिलीप देशमुख, हिंदु जनजागृतीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश श्री. प्रल्हाद शिंदे यांच्याहस्ते दिपप्रज्वलनाने झाला. त्यानंतर सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रम्ह प.पू. डॉ. जयंत बाळाजी आठवले यांनी दिलेल्या संदेशाचे वाचन श्री. रामेश्वर भुकन यांनी केले. उपस्थितांचे स्वागत सेवानिवृत्त



जिल्हा न्यायाधीश श्री. प्रल्हाद शिंदे यांनी केले तर अधिवेशनाची प्रस्तावना हिंदु जनजागृती समितीचे उत्तर महाराष्ट्र संघटक श्री. प्रशांत जुवेकर यांनी मांडली.

या अधिवेशनाला परभणी, नांदेड, जालना, जळगाव आणि छत्रपती संभाजीनगर येथील विविध मंदिरांचे १८० हून अधिक विश्वस्त, प्रतिनिधी उपस्थित होते.

मंदिरांमध्ये चालू असलेल्या पाश्चात्य कुप्रथा थांबवा ! - सुनील घनवट, महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक, हिंदु जनजागृती समिती

अनेक मंदिरातील मूर्तींना नाताळच्या काळात सांताक्लोजचा वेष परिधान केला जातो. देवाचा केक कापून वाढदिवस साजरा करणे, मंदिरात दान दिलेल्या वस्तूंचा अयोग्य वापर, काही ठिकाणी देवस्थानांच्या गायी कसायांना विकणे यांसारख्या कुप्रथा घडत आहेत. तसेच वैयक्तिक मानापमानामुळे अनेक मंदिराकडे दुर्लक्ष करणे, यामुळे मंदिर संस्कृती आणि मंदिरे बदनाम होत आहे, यावर उपाय म्हणजे मंदिर विश्वस्तांनी मंदिर संस्कृती परंपरा प्रथा यांचे पालन हिंदु संस्कृती नुसार करा, असे प्रतिपादन हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी केले.

मंदिरे - धर्मशिक्षणाची केंद्रे बनायला हवी ! - सद्गुरू नंदकुमार जाधव

मंदिर हा हिंदु संस्कृतीचा वारसा आहे, तो जतन करणे महत्त्वाचे आहे. आपला धर्म, संस्कृती जीवंत ठेवण्याचे कार्य वेळोवेळी मंदिरांमुळे झालेले आहे. मंदिर संस्कृतीचा देशाच्या विकासात मोठा वाटा आहे. मंदिरात येणाऱ्यांना धर्माचा अभ्यास नसतो. तीर्थक्षेत्र पर्यटन क्षेत्र झाली आहेत. त्यामुळे तेथील आध्यात्मिक शक्तीचा लाभ होत नाही. मंदिरांमधून धर्मशिक्षण दिले तर त्यांची श्रद्धा वाढून सशक्त राष्ट्रभक्ती असणारी पिढी निर्माण होईल आणि ती राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात योगदान देईल. मंदिरांतून संस्कारवर्ग घेणे, धर्मशास्त्र समजावून सांगणे हे कार्य नियमित व्हायला हवे. हिंदु समाजाची जन्म हिंदु ते कर्म हिंदु पर्यंत वाटचाल होण्यासाठी मंदिर अधिवेशन हे प्रभावी माध्यम आहे. म्हणून मंदिरे ही धर्मशिक्षणाची केंद्रे बनायला हवी, असे आवाहन सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरू नंदकुमार जाधव यांनी केले.

या वेळी निवृत्त सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. दिलीप देशमुख यांनी न्यास नोंदणी तसेच मंदिरांच्या अडचणीसंदर्भात तर सनातनचे संत पू . सुरेश कुलकर्णी यांनी तुळजाभवानी देवस्थानातील भ्रस्टाचाराविषयी दिलेल्या कायदेशीर लढ्याविषयी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात मंदिर विश्वस्तांना मंदिरांच्या जमिनीविषयी येणाऱ्या अडचणी याविषयी परिसंवाद आयोजित करण्यात आला. समारोपीय सत्रात मंदिर महासंघाच्या कार्याची पुढील दिशा कशी असावी ? याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. समारोपीय सत्रात महंत नारायण नंदगिरी महाराज, श्री. श्यामकुमार जैस्वाल, श्री. प्रमोद नरवाडे, कु. प्रतीक्षा कोरगावकर, कु. प्रियंका लोणे यांनी उपस्थितांना संबोधित केले.

CMYK

धाराशिव

# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पैशाच्या त्रासाला कंटाळून युवकाची आत्महत्या; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जुलै -**

खामसवाडी (ता. कळंब) येथे संतोष दिगंबर सौदागर (वय २५) या युवकाने उसाच्या शेतात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. पैशाच्या मागणीसह धमकी दिल्यामुळे त्रस्त होऊन त्याने हे टोकाचे पाऊल उचलले, असा आरोप करत संतोषच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून एका व्यक्तीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संतोष हा आरोपी ज्ञानेश्वर तुकाराम बंडगर (रा. खामसवाडी) याच्या ऊस वाहतुकीच्या ट्रॅक्टरवर काम करत होता. आरोपीचे ४० हजार रुपये संतोषच्या वडिलांकडून देणे बाकी होते. याच कारणावरून आरोपी बंडगर याने संतोषकडे वेळोवेळी पैशाची मागणी करत त्याला मानसिक त्रास दिला. धमकी आणि सततच्या जाचाला कंटाळून संतोष याने ३ जुलै रोजी दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास शेतात विषारी औषध पिऊन आत्महत्या केली.

संतोषची आई वंदना दिगंबर सौदागर यांनी १९ जुलै रोजी शिराढोण पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून आरोपी ज्ञानेश्वर बंडगर याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास शिराढोण पोलीस करीत आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



### आचलेर येथे 'हरित धाराशिव' अभियाना अंतर्गत ३३०० झाडांची वृक्षारोपण मोहीम

**लोहारा, दि.२० जुलै -**

धाराशिव जिल्ह्यात हरित धाराशिव अभियानाचा प्रभावी अंमलबजावणीचा एक उत्तम आदर्श लोहारा तालुक्यातील आचलेर गावाने उभारला आहे. ग्रामपंचायत कार्यालयाच्या हद्दीत दि.१९ जुलै रोजी झालेल्या वृक्षारोपण उपक्रमात तब्बल ३३०० झाडांची लागवड करण्यात आली. ही वृक्षारोपण मोहीम 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या उद्दिष्टांच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल ठरली आहे. या उपक्रमात १५ प्रकारच्या विविध वनस्पतींच्या झाडांचे रोपण करण्यात आले. कृषी अधिकारी नयन मगर, कृषी सहाय्यक सुभाष स्वामी, ग्रामसेवक राम वेणू, तलाठी प्रशांत माळवदकर, तसेच सरपंच कांताबाई सोलंकर यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमात शिक्षक, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका, महिलांचे बचत गट, शेतकरी व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

### राजा कंपनी तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी गणेश साळुंके

**तुळजापूर, दि.२० जुलै -**



शहरातील राजा कंपनी तरुण मंडळाच्या नुकत्याच घेण्यात आलेल्या बैठकीत श्रीमंत राजयोगी पावणारा गणपतीच्या गणेशोत्सव अध्यक्षपदी गणेश साळुंके यांची निवड करण्यात आली आहे. मंडळाचे जेष्ठ सदस्य रवींद्र इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत. उर्वरित कार्यकारणीमध्ये उपाध्यक्षपदी जयराज भोसले व राहुल भालेकर तर सचिवपदी संकेत घोगरे सहसचिव पदी गणेश मस्के तसेच कोषाध्यक्षपदी अमोल गरड सहकोषाध्यक्ष हरीश साळुंके यांच्या निवडी करण्यात आल्या आहेत. या निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार मंडळाचे मार्गदर्शक सज्जनराव साळुंके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी राजा कंपनी मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### चेतन बंडगर यांचा भीम नगर येथे सत्कार

**इटकळ, दि.२० जुलै -**

काक्रंबा येथील शिवसेना सोशल मीडिया तालुका प्रमुख चेतन बंडगर यांचा भीम नगर, काक्रंबा येथील समाजबांधवांनी विशेष सत्कार करून गौरव केला. धाराशिवचे खासदार ओमप्रकाश निंबाळकर यांच्या स्थानिक विकास निधीतून समाजमंदिरासाठी दहा लाख रुपयांचा निधी मिळवून देण्यात चेतन बंडगर यांनी केलेल्या विशेष प्रयत्नाबद्दल हा सन्मान करण्यात आला. या सत्कार सोहळ्यात दयासागर मस्के, शाहूराज मस्के, धर्मा मस्के, बाळासाहेब मस्के, सुधीर मस्के, आकाश मस्के, अरविंद चंदनशिवे, किशोर सोनवणे, प्रदीप चंदनशिवे, हनमंत मस्के, झुंबर मस्के, उत्तम चंदनशिवे, शरद मस्के, दीपक भिसे, विनोद साबळे यांच्यासह आदी उपस्थित होते.



### खोत यांची अध्यक्षपदी नियुक्ती

**धाराशिव, दि.२० जुलै -**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद मराठवाडा विभाग (धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली) अध्यक्षपदी आबासाहेब खोत यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आली. या नियुक्तीबद्दल समीर भुजबळ व पंकज भुजबळ यांनी आबासाहेब खोत यांचे अभिनंदन केले. यावेळी दिलीप खैरे, सुभाष राऊत, व्यंकट जाधव, नागेश गवळी, बापूसाहेब भुजबळ उपस्थित होते.

### मद्यधुंद अवस्थेत गोंधळ घालणाऱ्या युवकावर गुन्हा दाखल

**परंडा, दि.२० जुलै -**

शहरातील तहसील कार्यालयासमोर मध्यरात्री मद्यधुंद अवस्थेत आरडा-ओरड करत गोंधळ घालणाऱ्या एका युवकाविरुद्ध परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अजय बंडु माळी (वय २३, रा. कुऱ्हाड गल्ली, परंडा) हा दि.१९ जुलै रोजी रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास तहसील कार्यालय, परंडा परिसरात मद्यधुंद अवस्थेत आढळून आला. सरकारतर्फे दाखल करण्यात आलेल्या प्रथम खबरेवरून आरोपी अजय माळी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

... अखेर पालकमंत्र्यांची नळदुर्ग शहराला भेट; कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण...

# नळदुर्ग किल्ल्याच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध : पालकमंत्री सरनाईक

**पर्यटन विकास आराखड्याची घोषणा, १५१ फूट उंच भगवा ध्वज उभारणार...**



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० जुलै -**

धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्गचा ऐतिहासिक किल्ला हा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महत्वाचा ठिकाण असून, या किल्ल्याला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी सरकार सकारात्मक आहे, असे प्रतिपादन राज्याचे परिवहन मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. दि.२० जुलै रोजी किल्ल्याच्या पाहणी दरम्यान त्यांनी किल्ल्याच्या सर्वांगीण विकासासाठी विकास आराखडा तयार केल्याची माहिती दिली.

या भेटीदरम्यान पालकमंत्री सरनाईक यांच्या समवेत शिवसेना उपनेते माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, तहसीलदार अरविंद बोळंगे, अप्पर तहसीलदार प्रमोद गायकवाड, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. निलेश देशमुख, नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार तसेच शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. किल्ल्यात प्रवेश करताच शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके यांच्या हस्ते पालकमंत्र्यांचा पारंपरिक सत्कार करण्यात आला. यावेळी विविध संघटनांनी तसेच शेतकरी संघर्ष समितीने आपापल्या मागण्यांचे निवेदन पालकमंत्र्यांना सादर केले. घोडके यांनी दिलेल्या निवेदनात किल्ला तात्काळ संगोपन योजनेअंतर्गत आणून पर्यटकांसाठी बोटिंग, संगीतकारंजे आणि अन्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली होती.

या कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री सरनाईक म्हणाले, नळदुर्ग किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता त्याचे जतन, संवर्धन आणि आकर्षक रूपात सादरीकरण अत्यंत गरजेचे आहे.

किल्ल्यात येणाऱ्या पर्यटकांसाठी आवश्यक सुविधा, बोटिंग, संगीतकारंजे तसेच प्राचीन वास्तूला धक्का न लागता सुधारणा करण्यात येणार आहेत.

तसेच किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर १५१ फूट उंच भगवा ध्वज उभारण्यात येणार आहे.

हा किल्ला जागतिक पर्यटन नकाशावर स्थान मिळवावा, यासाठी नियोजनबद्ध आणि दीर्घकालीन दृष्टिकोन ठेवून संपूर्ण किल्ला विकास आराखड्याअंतर्गत उभारला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांचा बॅनरवरून फोटो गायब; कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी

**भाजपमध्ये पुन्हा एकदा गटबाजी उफाळली...**

**तभा वृत्तसेवा / आकाश पोतदार**
**उमरगा, दि.२० जुलै -**

मुरूम शहरातील बसस्थानकाच्या भूमिपूजन कार्यक्रमासाठी लावण्यात आलेल्या भाजपच्या बॅनरवर लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष व माजी राज्यमंत्री बसवराज पाटील यांचा फोटो नसल्याने पक्षातील अंतर्गत गटबाजी पुन्हा एकदा उघड झाली आहे. या प्रकारामुळे स्थानिक भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, पक्षांतर्गत असंतोषाचा स्वर अधिकच तीव्र होऊ लागला आहे.

बसवराज पाटील हे काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांना थेट लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली होती. त्यांच्या राजकीय अनुभवावर विश्वास ठेवत पक्षश्रेष्ठींनी त्यांना नेतृत्वाची धुरा सोपवली होती. त्यांनी याआधी



राज्यमंत्री म्हणूनही यशस्वी कारकीर्द पार पाडलेली आहे. मात्र, अशा अनुभवी आणि प्रभावशाली नेत्याचा फोटो कार्यक्रमाच्या मुख्य बॅनरवरून वगळण्यात आल्याने समर्थकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या घटनेमुळे भाजपमधील अंतर्गत मतभेद आणि कट्टर गटबाजी पुन्हा एकदा स्पष्टपणे समोर आली आहे. काही स्थानिक नेत्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर प्रतिक्रिया देताना सांगितले की, हा प्रकार चुकून घडलेला नसून, तो मुद्दाम केला गेलेला आहे. पक्षातील काही मंडळींची ही कुरघोडीची वृत्ती भविष्यात पक्षासाठी घातक ठरू शकते. या प्रकरणामुळे युवा कार्यकर्तेही संभ्रमात असून, नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सोशल मीडियावरही या मुद्द्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, बंद दाराआड कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर गडद होत आहे. विशेष म्हणजे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही महिन्यांवर येऊन ठेपलेल्या असताना, अशा घटनांमुळे भाजपची संघटनात्मक ताकद डळमळीत होण्याचा धोका निर्माण झाला आहे. पक्षाच्या 'संघटित कार्य' या घोषणेला गालबोट लागल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे.

पक्षश्रेष्ठींनी या घटनेकडे गांभीर्याने पाहून तात्काळ कारवाई करावी, अशी जोरदार मागणी कार्यकर्त्यांतून होत आहे.

### 'हरित धाराशिव' उपक्रमाचे जिल्हाधिकाऱ्यांकडून कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० जुलै -**

धाराशिव जिल्ह्यात हरित धाराशिव अभियानाअंतर्गत पर्यावरण संवर्धनासाठी सुरू झालेल्या वृक्षलागवड मोहिमेचा एक भाग म्हणून नळदुर्ग नगरपालिकेने ३० हजारांहून अधिक वृक्षांची लागवड केली आहे. या उपक्रमाचे धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन दि.२० जुलै रोजी सकाळी १० वाजता पाहणी केली आणि केलेल्या कामाचे भरभरून कौतुक केले.

वसंतनगरजवळील १०० गुंठ्यांवर नळदुर्ग नगरपालिकेने ही व्यापक वृक्षलागवड केली असून, जिल्हाधिकारी पुजार यांच्या आगमनावेळी मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी त्यांचे स्वागत केले. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी व नगरपरिषद कर्मचाऱ्यांसमवेत संपूर्ण वृक्षलागवड क्षेत्राची तपशीलवार पाहणी केली.

### बेपत्ता युवकाचा अवघ्या २४ तासांत लावला शोध

**नळदुर्ग पोलिसांची तत्पर कामगिरी...**

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२० जुलै -**

ईटकळ येथील २४ वर्षीय युवक गिरीराज (गिरीष) विलास दुपारगुडे हा १५ जुलै रोजी रात्रीपासून बेपत्ता झाला होता. घटनेनंतर अवघ्या २४ तासांच्या आत नळदुर्ग पोलिसांनी दाखवलेली तत्परता व कर्तव्यनिष्ठा यामुळे युवकाचा यशस्वी शोध लागला असून, संपूर्ण परिसरात नळदुर्ग पोलिसांच्या कामगिरीचे जोरदार कौतुक होत आहे.

भिमनगर (ईटकळ दुरक्षेत्र) येथील रहिवासी गिरीराज हा कामावरून परत येत असताना रस्ता चुकून हरवला होता. कुटुंबीयांनी तत्काळ नळदुर्ग पोलिस ठाण्यात संपर्क साधत माहिती दिली. तक्रार प्राप्त होताच पोलिस हवालदार हनमंत गरड (क्रमांक ११७७) आणि महिला पोलिस माया राज एखंडे गायकवाड (क्रमांक ११८८) यांनी त्वरित कार्यवाही करत बेपत्ता व्यक्तीची नोंद घेतली.

पोलिस निरीक्षक सचिन यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार संदीपान कोळी (क्रमांक ७२५) यांच्या नेतृत्वाखाली शोध पथक गठीत करण्यात आले. शोध मोहिमेत नळदुर्ग पोलिसांनी ईटकळ दुरक्षेत्र परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासली, तसेच युवक जिथे काम करत होता त्या ठिकाणी सहकाऱ्यांकडे चौकशी करण्यात आली.

शोधकार्य सुरु असतानाच दिनांक १६ जुलै रोजी सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर पेट्रोलिंग करत असलेल्या पोलिस पथकाला युवक चालत जाताना दिसला. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत त्याला आपल्या ताब्यात घेतले व सुखरूप वडिलांच्या स्वाधीन केले.

या उत्कृष्ट व तत्पर कार्यवाहीत संदीपान कोळी, हनमंत गरड, माया एखंडे, राजेंद्र गायकवाड, प्रविण राठोड, सखाराम मिटके, नागेश साळुंखे आणि मायाचारी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### संत सेवालाल महाराज कट्ट्याची तोडफोड : बंजारा समाजात संतापाची लाट



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२० जुलै -**

आलूर येथील इंदिरानगरमधील संत सेवालाल महाराज चौकातील कट्ट्याची दगडफेक करून तोडफोड करण्यात आल्याची घटना शनिवार, दि. १९ जुलै रोजी मध्यरात्री घडली. बंजारा समाजाचे आराध्य दैवत असलेल्या संत सेवालाल महाराजांच्या चौकात अशा प्रकारची विटंबना झाल्यामुळे संपूर्ण समाजात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

रविवारी सकाळी ७ ते ८ वाजण्याच्या सुमारास ही तोडफोड समाजबांधवांच्या निदर्शनास आली. त्यांनी तात्काळ आलूर बीटचे हवालदार वाघमारे यांना याची माहिती दिली. वाघमारे यांनी घटनास्थळी भेट देऊन तातडीने पंचनामा केला.

पंचनाम्यावेळी उपस्थित प्रमुख समाजबांधव ज्येष्ठ नागरिक गुलाब राठोड, नीलू राठोड, शिवाजी राठोड, खुबा जाधव, पिंटू पवार, रवी राजू राठोड, तानाजी पवार, सचिन जाधव, रमेश राठोड यांच्यासह इतर नागरिक उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या विश्वासात घेऊनच भूसंपादन प्रक्रिया राबवा

**पालकमंत्र्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० जुलै -**

धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देत, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५२ संदर्भातील भूसंपादन प्रक्रिया शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन राबवण्याचे स्पष्ट आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

पालकमंत्री सरनाईक हे नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्याच्या पाहणीसाठी आले होते. यावेळी शेतकरी संघर्ष समितीच्या प्रतिनिधींनी त्यांची भेट घेतली आणि विविध मागण्यांचे निवेदन सुपूर्द केले. विशेष म्हणजे हे निवेदन स्वरा पंडित पाटील या लहानग्या शेतकरी कन्येच्या हस्ते मंत्री महोदयांना देण्यात आले.



निवेदन स्विकारल्यानंतर पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे थेट विचारणा करत शेतकऱ्यांचे प्रश्न ऐकून घेतले. यात पिक विमा, अतिवृष्टी अनुदान, दुष्काळ अनुदान आदी महत्त्वाच्या विषयांचा समावेश होता. विशेषतः मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने दिलेल्या निर्देशांनुसार, भूसंपादन प्रक्रिया पारदर्शक व शेतकऱ्यांच्या सहमतीने होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने सादर करण्यात आलेल्या निवेदनावर दिलीप जोशी, सरदारसिंग ठाकुर, व्यंकट पाटील, महादेव बिराजदार, पंडित पाटील, अजमोद्दिन शेख, गुलाब शिंदे, संजय कलकोटे, बालाजी ठाकुर, प्रताप ठाकुर, श्रीमंत कलकोटे, श्रीमंत फडतरे, श्रीकांत पोतदार यांच्यासह इतर शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या होत्या.

शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींनी मांडलेले मुद्दे ऐकून घेतल्याने व जिल्हा प्रशासनास आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिल्याने, मंत्री सरनाईक यांच्या या सकारात्मक भूमिकेचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## शासकीय आयटीआयसाठी ४० कोटींचा निधी; अद्ययावत संकुल बांधणार

**आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जुलै -**



जलसंपदा विभाग आणि शासकीय आयटीआयची जागा नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयासाठी हस्तांतरित करण्यात आली आहे. त्यामुळे येथील शासकीय आयटीआयचे स्थलांतर करून नवीन अध्यायवत संकुल बांधण्यासाठी ४० कोटी रुपयांचा निधी महायुती सरकारच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा रुग्णालयाच्या बांधकामासाठी यापूर्वीच रुपये ४३५ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. आता आयटीआयसाठी ४० कोटीचा निधी उपलब्ध होणार असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

धाराशिव-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या एकूण ११.६३ हेक्टर जागेपैकी ५.३० हेक्टर जागा वैद्यकीय शिक्षण विभागाच्या ताब्यात देण्यात आली आहे. उर्वरित जागेवर आयटीआय ची मुख्य इमारत, वर्कशॉप व मोकळी जागा आहे. या ठिकाणी सद्याचे एकत्रित बांधकाम जवळपास ९० हजार चौरस फुट आहे. आपल्या महायुती सरकारच्या माध्यमातून शासकीय आयटीआयसाठी नव्याने उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या रु. ४० कोटी निधीच्या माध्यमातून जवळपास १ लाख चौरस फुटाचे बांधकाम करण्याबाबत येणार आहे. प्रस्तावित असलेली ही नवीन इमारत देशपांडे स्टँड परिसरातील कौशल्य विकास विभागाच्या तंत्रनिकेतन प्रशालेच्या मोकळ्या जागेत उभारायची की सध्याच्या जागेत उभारायची याबाबतचा निर्णय कौशल्य विकास विभाग घेणार असल्याचेही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

**मोठ्या उद्योग समूहा बरोबर रोजगार निर्मिती साठी करार...**

मोठ्या उद्योग समुहाच्या सहकार्याने राज्यातील काही औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. खाजगी भागीदारी तत्त्वावर नामांकित कंपन्या यासाठी निधी उपलब्ध करून देणार आहेत. या प्रतिथयश कंपन्यामधील गरजेनुसार सुधारित अभ्यासक्रम निर्माण केले जाणार आहेत. त्याच कंपन्यांच्या माध्यमातून स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देणार आहेत. 'मित्र' संस्थेच्या माध्यमातून यावर काम सुरु आहे. या सगळ्या प्रक्रियेत आवर्जून धाराशिव जिल्हाचा समावेश करण्यात येणार आहे.

### रस्ता ओलांडताना अपघात; युवकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जुलै -**

जळकोट शिवारातील एनएच-६५ रस्त्यावर १५ जुलै रोजी पहाटे २ वाजता रस्ता क्रॉस करत असताना परमेश्वर सरवदे (रा. कलदेव लिंबाळा) यांना भरधाव कारने धडक दिली.

या अपघातात ते गंभीर जखमी होऊन मरण पावले. याप्रकरणी कल्याण सरवदे यांच्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत अधिक तपास पोलिस करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

युपीआय व्यवहार वाढवण्यासाठी गती खाते सुरू केले आहे

पुणे : बँकिंग प्रक्रिया सुलभ, सोपी आणि सोयीस्कर बनविल्यानंतर आता फिनो पेमेंट्स बँक नवीन खाते उघडल्यानंतर ग्राहक त्वरित व्यवहार करू शकतील यावर लक्ष केंद्रीत करत आहे. याच उद्देशाने फिनो पेमेंट्स बँकेने आज नवीन बचत खाते गती लॉन्च केल्याची घोषणा केली. गती या शब्दाचा अर्थ अनेक भारतीय भाषांमध्ये 'वेग' किंवा 'जलद' असा होतो. जे बँकिंग सेवा परवडणाऱ्या पद्धतीने डिजिटल प्लॅटफॉर्मवरून वापरू इच्छितात , विशेषतः अशा ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन हे उत्पादन तयार करण्यात आले आहे. भारतात डिजिटलायझेशन वेगाने वाढत असताना, हा ग्राहकवर्ग फिजिटल (भौतिक + डिजिटल) पद्धतीतून पूर्णपणे डिजिटल पद्धतीकडे वळण्यास तयार आहे, याला युपीआयचा वाढता स्वीकार अधिक गती देत आहे.

२४ जुलै रोजी आईकू ज़ेड१०आर लाँच होत आहे

नवी दिल्ली : उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू २४ जुलै रोजी आईकू ज़ेड१०आर लाँच करण्यासाठी सज्ज आहे. विद्यार्थी आणि नवीन कंटेंट क्रिएटर्ससाठी डिझाइन केलेला, हा स्मार्टफोन ४के फ्रंट आणि रियर कॅमेरे, अल्ट्रा-स्लिम क्वाड-कर्व्हड डिस्प्ले आणि सेगमेंट-लीडिंग मीडियाटेक डायमेन्सिटी ७४०० प्रोसेसरसह येतो, ज्यामुळे तो नेहमी ऑनलाइन सक्रिय असलेल्या आणि प्रवासात असलेल्यांसाठी एक परिपूर्ण पर्याय बनतो. कंटेंट तयार करणे असो, वर्गात उपस्थित राहणे असो, रील्स स्क्रोल करणे असो, ब्रेकवर गेमिंग असो किंवा अनेक ॲप्समध्ये स्विच करणे असो - आईकू ज़ेड१०आर जलद गतीने चालणारी, मल्टीटास्किंग जीवनशैली लक्षात घेऊन डिझाइन केले आहे. आईकू ज़ेड१०आर मध्ये विशेषतः कंटेंट क्रिएटर्ससाठी डिझाइन केलेला सेटअप आहे, ज्यामध्ये ५०एमपी सोनी आईएमएक्स ८८२ ओआईड मुख्य कॅमेरा आणि सेगमेंट-बेस्ट ३२एमपी ४के फ्रंट कॅमेरा आहे. पुढील आणि मागील दोन्ही कॅमेऱ्यांमध्ये ४के व्हिडिओ रेकॉर्डिंगची सुविधा आहे, ज्यामुळे वापरकर्त्यांना व्यावसायिक गुणवत्तेसह अल्ट्रा-क्लिअर, एचडीआर-गुणवत्तेचे व्हिडिओ शूट करण्याची परवानगी मिळते. ४ के ३२ मेगापिक्सेल फ्रंट कॅमेरा असलेला त्याच्या सेगमेंटमधील एकमेव आईकू फोन, आईकू ज़ेड१०आर हा प्रवासात असलेल्या निर्मात्यांसाठी एक उत्तम अपग्रेड आहे.

योकोगावा इंडिया तर्फे डव्हान्स्ड एएक्सजी फ्लोमीटरची पहिली डिलिव्हरी

इंडस्ट्रीयल ऑटोमेशन आणि प्रोसेस कंट्रोल क्षेत्रात आघाडीच्या कंपन्यांपैकी एक असलेल्या योकोगावा इंडिया लि.(वायआयएल) ने महाराष्ट्रात नेक्स्ट जनरेशन एएक्सजी मॅग्नेटिक फ्लोमीटरच्या पहिल्या डिलिव्हरीसह एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.ही डिलिव्हरी योकोगावाची संपूर्ण उपकंपनी असलेल्या डेप्ट फ्लुडाईन प्रा.लि.तर्फे करण्यात आली असून भारतातील झपाट्याने विकसित होणाऱ्या औद्योगिक क्षेत्राला जागतिक दर्जाच्या इंस्ट्रुमेंटेशन सोल्युशन्स पुरविण्याची आणि स्थानिक पातळीवर आपली उपस्थिती अधिक दृढ करण्याप्रती कंपनीची कटिबद्धता दर्शविते. हा महत्त्वाचा टप्पा योकोगावाच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या उपस्थितीत डेप्टच्या पुण्यातील सुविधेमध्ये एका कार्यक्रमाच्या माध्यमातून नुकताच साजरा करण्यात आला.याप्रसंगी योकोगावा इंडिया लि.चे. संचालक कात्सुया इकेजावा,योकोगावा मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशनचे अध्यक्ष हिरोशी नागाई,योकोगावा प्रॉडक्टस मुख्यालयाचे प्रमुख,सीटीओ, कार्यकारी संचालक व वरिष्ठ उपाध्यक्ष हिरोशी तानोगुची, डेप्ट फ्लुडाईन प्रा.लि.चे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक गद्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

लक्षणे दिसण्यापूर्वीच, फक्त ५ मिनिटांत हृदयरोगाचे निदान करण्याच्या दिशेने एक अग्रगण्य पाऊल

मुंबई : भारतातील मृत्यूचे प्रमुख कारण असलेल्या हृदयरोगाशी लढण्यासाठी एका ऐतिहासिक उपक्रमात, जसलोक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरने भारतातील पहिले एआय-आधारित डॉक्टर असिस्टंट, अँजिनॅक्स एआय सोबत भागीदारी केली आहे. या भागीदारीअंतर्गत, महाराष्ट्राचे पहिले एआय-सक्षम हृदयरोग प्रतिबंधक मॉडेल लाँच करण्यात आले आहे. हे सहकार्य भारताच्या हृदयरोग प्रणालीला विलंबित उपचार पासून वेळेवर प्रतिबंध पर्यंत नेण्यासाठी एक मैलाचा दगड ठरत आहे. जसलोकच्या बाह्यरुग्ण विभागांमध्ये (ओपीडी) आता अँजिनॅक्स एआय तंत्रज्ञान सक्रिय आहे, ज्यामुळे डॉक्टरांना लक्षणे दिसण्यापूर्वीच काही सेकंदात हृदयरोगाचा धोका मूल्यांकन करण्याची क्षमता मिळते. ही प्रणाली वैज्ञानिक तथ्यांवर आधारित अहवाल प्रदान करते आणि

# दुधातून विषबाधा झाल्याच्या भीतीने आख्ख गावाची रेबीजच इंजेक्शन घेण्यासाठी धाव

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २० जुलै पैठण तालुक्यातील म्हारोळा गावात एक आगळावेगळा प्रकार घडला आहे. आठ दिवसांपूर्वी या गावातील एका गायीच्या वासरूला पिसाळलेला कुत्रा चावला. तीन ते चार दिवसानंतर त्या वासरास झटके येऊ लागले तेव्हा गायमालकाने वासराला डॉक्टरांना दाखवले असता त्यांनी वासराला पिसाळलेला कुत्रा चावल्याने रेबीज झाल्याचे सांगितले व उपचार केले मात्र उपचारादरम्यान वासरू मृत्युमुखी पडला. विशेष म्हणजे वासरू गायीचं दूध पित असल्याने गायीला देखील याचं इन्फेक्शन झाल्याची अफवा गावात पसरली. बरं या गाईचं दूध गावातील काही घरांना पुरवठा केला जात होता. त्यामुळे आपल्याला देखील इन्फेक्शन होईल म्हणून अख्ख गावं शासकीय रुग्णालयात रेबीजच इंजेक्शन घेण्यासाठी पोहचेले आहे. परिस्थिती अशी आहे की रुग्णालयात इंजेक्शन पुरत नाही. लोक रुग्णालयात रांगा लावून इंजेक्शन घेत आहे. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार आतापर्यंत हजार लोकांनी इंजेक्शन घेतला आहे. बिडकीन शासकीय रुग्णालयात इंजेक्शन घेण्यासाठी लोकांची अक्षरशः रांग लागली आहे. आता या शासकीय रुग्णालयात देखील इंजेक्शन कमी पडत असल्याने बाजूच्या गावातील शासकीय रुग्णालयात लोकांना जाण्याचा सल्ला दिला जात आहे. विशेष म्हणजे एक वर्षांपूर्वी याच गावात अशीच एक घटना समोर आली होती. एका गायीच्या वासरूला कुत्रा चावला, हा तरुण वासराच्या संपर्कात आला. आणि काही दिवसांनी त्याचा मृत्यू झाला.त्यामुळे पुन्हा अशी घटना घडू नये म्हणून गावकरी इंजेक्शन घेण्यासाठी रुग्णालयात धाव घेत आहे.

# सहकारी संस्थांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य करू : आ. अब्दुल सत्तार

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२० जुलै : शेती हा उद्योग व्हावा यातून शेतकऱ्याचे सक्षमीकरण व्हावे यासाठी राज्यशासन विविध उपक्रम व शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत असल्याचे प्रतिपादन आमदार अब्दुल सत्तार यांनी शनिवार रोजी सोयगाव येथे आयोजित शेतकरी मेळाव्या प्रसंगी व्यक्त केले. कृषी उत्पन्न बाजार समिती,खरेदी विक्री संघ यासारख्या शेतकऱ्यांशी निगडित सहकारी संस्थांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य करू अशी ग्वाही देखील आमदार अब्दुल सत्तार यांनी या प्रसंगी दिली.



व्यासपीठावर जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे, शिवसेना (उबाठा) चे जिल्हाध्यक्ष तथा खरेदी विक्री संघाचे नवनिर्वाचित चेअरमन राजेंद्र राठोड,व्हाईस चेअरमन रंगनाथ वराडे,शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे,माजी जि.प.उपाध्यक्ष केशवराव तायडे, देविदास पा. लोखंडे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विश्वास पा. दाभाडे,उपसभापती संदीप राऊत,शिवसेनेचे (उबाठा) तालुकाप्रमुख दिलीप मचे,माजी सभापती रामदास पालोदकर,शिवसेना तालुका प्रमुख मारुती वराडे,धरमसिंग चव्हाण,गोपीचंद जाधव,नगराध्यक्षा आशाबी तडवी, उपनगराध्यक्षा सुरेखाताई काळे,शिवसेना महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार,द्रुपताबाई सोनवणे,सुरेखाताई तायडे,सुशीलाबाई इंगळे,सुमनबाई तांगडे,बंडू काळे,रमेश साळवे,नजीर अहमद,लक्कुसिंग नाईक,राजेंद्र ठोंबरे,प्रशांत क्षीरसागर,हनिफ मुलतानी,खरेदी विक्री संघाचे संचालक संजय निकम,सुभाष बोरसे,मुरलीधर वेहळे,भगवान लहाने, राधेश्याम जाधव,गुलाबसिंग पवार,चंदाबाई राजपूत,प्रतिभा सोळंके,भारत तायडे,मोतीराम पंडित तसेच कृउबा समितीचे संचालक केशवराव पाटील तायडे,श्रीरंग साळवे,जयराम चिंचपुरे,दामू अण्णा गव्हाणे,कौतिकराव मोरे,नानासाहेब रहाटे,नंदकिशोर सहारे,सतीश ताठे,दारासिंग चव्हाण, राजाराम पाडळे,रमेश लाठी,भाऊराव लोखंडे,शेख जावेद, आदींची उपस्थिती होती.

# व्यापारी व ग्रामस्थांचा रस्ता रुंदीकरणाला विरोध

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १९ जुलै : छत्रपती संभाजीनगर ते कौडगाव रस्ते रुंदीकरण सध्या सुरू असून कांचनवाडीपर्यंत सध्या तीस मिटर रस्ता रुंदीकरण झालेले असून सविस्तर बातमी अशी की गेवराई ते बिडकीन पर्यंत रस्ता रुंदीकरणामुळे हजारो व्यापारी, संस्था, शाळा, रुग्णालये,आस्थापना घरे जमीनदोस्त होणार त्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त होणार आहे प्राधिकरणाच्या रस्ता रुंदीकरणाच्या निर्णयला विरोध बिडकीन येथील व्यापाऱ्यांनी दर्शविला आहे.बिडकीन मधील सध्या सुरू असलेला तीस मिटर रस्ता बिडकीनची वाहतूक करण्यासाठी पुरेसा असून परंतु यापेक्षा जास्त रुंदीचा रोड नको



आता यापुढे डीएमआयसीची वाहतूक पर्यायी गेवराई ते चितेगाव,फारोळा, डीएमआयसी मार्गे कौडगाव बायपास करण्यात यावी बाहेरुन रिंग रोड टाकून करण्यात यावी अशी मागणी , बिडकीन व्यापारी संघटनेच्या वतीने निवेदने मार्फत बिडकीन येथील व्यापारी यांनी मुखमंत्री, उद्योगमंत्री, ग्रामविकास मंत्री, पालकमंत्री, खासदार, आमदार, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, तहसिलदार, पोलिस अधिक्षक ग्रामीण, पोलिस ठाणे बिडकीन, सरपंच , यांना देण्यात आले शहर व परिसरातील रस्ते विकास योजनेअंतर्गत पैठण महामार्गावरील गेवराई ते कौडगाव मार्गाचे रुंदीकरण व अतिक्रमण हटवण्याची बिडकीनसह परिसरातील ग्रामस्थ, व्यापारी आणि ग्रामस्थांनी मोहिमेस विरोध दर्शवत पर्यायी बायपास रोडची मागणी केली आहे. बिडकीन ते कौडगावपर्यंतच्या मुख्य रस्त्यावर ३७ मीटरचा रस्त्याला विरोध केला असून नसता जर शासनाने निर्णय बदलला नाही तर रास्ता रोको आंदोलन करण्यात येइल असा इशारा देण्यात आला त्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त होणार आहे. यावेळी ओमप्रकाश जैस्वाल, पंढरीनाथ मोगल, कृष्णा चौथमल, संतोष धाडगे,दिलीप देवळाणकर, न्हनेखा पठाण,शैलेश तोतला, सुनील धुत दिपक डांगरे, भागवत ठाकूर, राहुल वांजरे, प्रेम शिंदे, , हरुन जिलानी, काकासाहेब टेके, मधुकर बर्फे, आदींची उपस्थिती होती.

# हिवरखेडा गौ.येथील इसमाचा मृतदेह आढळला!



कन्नड :- दि.२० जुलै - तालुक्यातील हिवरखेडा गौताळा येथील इसम धारसिंग धरमु जाधव वय ३३ वर्ष यांचा मृतदेह दि.१९ रोजी आढळून आला आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार धारसिंग जाधव हे हिवरखेडा गावाजवळ असलेल्या शेतात गेले होते,सायंकाळी हिवरखेडा कन्नड रस्त्यालगत असलेल्या शेतात त्यांचा मृतदेह शेजारी असलेल्या शेतकऱ्यांना दिसून आला त्यांनी तत्काळ जाधव यांच्या नातेवाईकांना माहिती दिली नातेवाईकांच्या मदतीने त्यांना कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपेश माटे यांनी तपासून मृत घोषित केले, घटनेची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरली कन्नड ग्रामीण रुग्णालयात काही काळ वातावरण तापले होते,दि.२० रोजी डॉ.रुपेश माटे यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला दि.२० रोजी दुपारी हिवरखेडा गौताळा येथे स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले धारसिंग जाधव यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,आई,वडील, भाऊ असा परिवार आहे कन्नड शहर पोलिस स्टेशनमध्ये आकस्मित मृत्यूची नोंद घेण्यात आली असून अधिक तपास पोलिस निरीक्षक रघुनाथ सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल एस.पी.आटोळे हे करत आहे.

# रागाच्या भरात घर सोडलेली महिला पोलिसांच्या मदतीने परतली

कन्नड :- दि.२० जुलै - रागाच्या भरात घर सोडून निघून गेलेल्या महिलेला पोलिसांच्या मदतीने लातूर येथून परत आणले आहे पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पल्लवी सक्सेना वय २३ वर्ष रा.सुरत गुजरात राज्य ही महिला कावीळ आजारावर उपचार घेण्यासाठी माहेरी कन्नड तालुक्यातील मक्रणपुर येथे आली होती,पण या आजाराला कंटाळून घरात कोणाला काही एक न सांगता दि.३० मे रोजी घरातून निघून गेली,कन्नड शहर पोलिस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल करण्यात आली होती,पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या साहाय्याने दि.१९ रोजी महिलेला लातूर येथून ताब्यात घेत दि.२० रोजी नातेवाईकांच्या ताब्यात दिले आहे.

## आकाश कुलथे यांची निवड



पैठण दि २० :- भारतीय जनता पार्टी पैठणच्या उपशहर प्रमुखपदी आकाश भैय्या कुलथे यांची नियुक्ती करण्यात आली आहे प्रदेश अध्यक्ष रविंन्द्र चव्हाण यांच्या तसेच रावसाहेब पाटील दानवे आदेशानुसार नुसार कुलथे यांची निवड करण्यात आली आहे. नगराध्यक्ष सुरज लोळगे राज्य परिषद सदस्य रेखा ताई कुलकर्णी तुषार भाऊ शिसोदे मंडळ बंडू आंधळे , लक्ष्मन औटे सहकार आघाडी शहराध्यक्ष प्रसाद लोळगे विजय चाटूफळे समीर शुक्ल विशाल पोहेकर वैभव पोहेकर शहरसरचिटणीस सतीश आहेर सुरेश गायकवाड सुनील वीर विजय आचार्य गणेश डुकरे ऋषिकेश बटूळे ज्ञानेश्वर दहिवाळ निखिल गुप्ता रशीद कुरेशी आदींनी कुलथे यांचे अभिनंदन केले

## 'बेटर-हाफची लव्हस्टोरी' मध्ये अनुभवायला सुबोध भावे, प्रार्थना बेहेरे व रिंकू राजगुरुचा लव्ह ट्रायंगल

छत्रपती संभाजीनगर - हास्याने भरलेली, धमाल प्रसंगांनी नटलेली आणि नात्यांच्या गुंतागुंतीवर भाष्य करणारी एक हटके प्रेमकहाणी लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा प्रस्तुत 'बेटर-हाफची लव्हस्टोरी' हा चित्रपट एक मजेशीर लव्ह ट्रायंगल घेऊन येत आहे ज्यात नात्यांमधील गैरसमज, गोंधळ त्यातून उगम पावणारे हास्य यांचा सुरेख मिलाप पाहायला मिळेल. या चित्रपटाचे मोशन पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर प्रदर्शित झाले असून, प्रेक्षकांमध्ये चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटात सुबोध भावे, प्रार्थना बेहेरे, रिंकू राजगुरू आणि अनिकेत विश्वासराव यांची कमाल केमिस्ट्री पाहायला मिळणार आहे. येत्या २२ ऑगस्टला प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात एका वेगळ्या आणि मजेशीर लव्ह ट्रायंगलची कहाणी पाहायला मिळेल.

# एमजीएममध्ये शिक्षणतज्ञ सोनम वांगचुक यांच्या शिक्षण पद्धतीवर विशेष सत्र संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.२० : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या लिओनार्दो दा विंची स्कूल ऑफ डिझाईनच्या वतीने पुरातत्त्वशास्त्राचे प्रा.आशुतोष पाटील यांनी शिक्षणतज्ञ सोनम वांगचुक यांच्या हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्हस येथे केलेल्या अभ्यास दौऱ्यावर आधारित 'व्हॉट आय लर्न्ड ॲनट हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्हस, लडाख' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना प्रा. पाटील म्हणाले, शिक्षण केवळ पुस्तकापुरते मर्यादित नसावे ते प्रयोगातून, जीवनातून शिकवणारे असावे. शिक्षण म्हणजे केवळ ज्ञानाचे संकलन नाही तर समाजातील समस्यांचे समाधान शोधण्याची क्षमता विकसित करणे आहे. एचआयएएल व सेकमोल यांनी याच दिशेने एक वेगळा आदर्श उभा केला आहे. विद्यार्थी जर प्रत्यक्ष अनुभवातून शिकले तर त्यांचे शिक्षण केवळ गुण मिळविण्यापुरते न राहता, सृजनशीलता आणि सामाजिक जाणीवा विकसित करणारे ठरते.

प्रा.पाटील यांनी एचआयएएलमध्ये चालणाऱ्या प्रयोगांचे छायाचित्राद्वारे सादरीकरण करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवांची ओळख करून दिली. या व्याख्यानादरम्यान त्यांनी परिस्थितीनुसार शिक्षण आणि प्रयोगशील शिक्षण या महत्त्वपूर्ण संकल्पना स्पष्ट केल्या. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत अनेक प्रश्न विचारले. एचआयएएलच्या कार्यपद्धतीतून आपण सगळ्यांनी शिकण्यासारखे खूप काही आहे, असा अभिप्राय विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केला.

**ANGEL ONE LIMITED**

Regd. Off: 601, 6th Floor, ACKRUTI STAR, CENTRAL ROAD, MIDC, ANDHERI EAST, MUMBAI -400093
Centralized desk : 18001020 Email id : support@angelone.in
Member of : NSE / BSE / BSE REMISIER / MCX / MCX SX / NCDEX
Member IDs: NSE : 12798, BSE : 612, MCX : 12685,
NCDEX : 00220 SEBI Registration No: INZ000161534

**NOTICE**

This is to inform all concerned that we have initiated the process of cancellation of registration of our below mentioned Authorised Person (AP) due to regulatory reasons/concerns.

| Name Of Authorised Person | Trade Name of AP | Address of AP | AP Registration No. |
|---|---|---|---|
| D K JANGLE | D K JANGLE | PLOT NO. 17, HARIOMNAGAR NEAR SWARAJ CHOWKJATWADA ROAD, JATWADA NEAR SWARAJ CHOWK AURANGABAD 431008 MAHARASHTRA | NSE : AP0397308821 |

Any person dealing with the above-mentioned Authorised Person henceforth shall do so at their own risk. **ANGEL ONE LTD.** shall not be liable for any dealings with the said entity post the issuance of this notice. Investors having any queries or concerns regarding this matter are requested to contact **ANGEL ONE LTD.** within **15 days** from the date of issuing this notice.

Date : 21.07.2025
Place : Maharashtra

For ANGEL ONE LTD
Sd/-, Authorised Signatory

# सोयगाव येथील तिरुपती अर्बन पतसंस्थेची बारावी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहत संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२० जुलै

शहरातील तिरुपती अर्बन पतसंस्थेची बारावी वार्षिक सर्वसाधारण सभा सोयगाव शहरातील अजिंठा व्हॅली इंग्लिश स्कुल सोयगाव-गलवाडा रोड येथे रविवार रोजी १०:३० वाजता उत्साहत संपन्न झाली.यावेळी ज्येष्ठ सभासद तुकाराम कळवत्रे यांच्या हस्ते श्री तिरुपती बालाजी प्रतिमेस पूजन करून उद्घाटन करण्यात आले.

संस्थेचे चेअरमन रामदास लालचंद राजपूत यांनी संस्थेचे उद्दिष्टांनविषयी माहिती दिली. तसेच पतसंस्थेमार्फत आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे व सभासदाचे



फुलगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.व सभासद अनिल मानकर यांनी संस्थेच्या कार्याबद्दल मार्गदर्शन केले.यावेळी तुकाराम कळवत्रे यांनी संस्थेच्या कार्याबद्दल आभार मानले.

यावेळी संस्थेचे चेअरमन रामदास राजपूत,व्हा.चेअरमन प्रदीप जैस्वाल,संचालक अशोक खेडकर,डॉ.दिनकर पिंगाळकर,किशोर पाटील,संजय वाडेकर,गोपाल दुसाने, विष्णू परदेशीं,विनोद कंधारी,संचालिका सरलाबाई युवराज आगे,रेखाबाई उमेश पंडित,राधाबाई विष्णू बोरसे,अश्विनी तुकाराम तायडे,राजीव तिडके,चंद्रशेखर ढाकरे तसेच सभासद श्रीकांत विष्णू बोरसे,युवराज आगे,तुकाराम तायडे, सुधाकर पंडित,कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे व्हा.चेअरमन योगेश बोखारे,कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे संचालक शेख सुलेमान,भैरवनाथ पतसंस्थेचे व्यवस्थापक धनराज औरंगे,विशाल घन,विष्णू गव्हाणे,देविदास बैरागी,मयुर मनगटे,दत्तात्रय गाडेकर,राहुल परदेशी,राजू औरगे,बंडू कळवत्रे,योगेश काळे,भगवान वाघ, सह सभासद उपस्थित होते.

यावेळी सूत्र संचालन व अहवाल वाचन व्यवस्थापक विकास देसाई यांनी केले,आभार प्रदर्शन चेअरमन रामदास राजपूत यांनी केले.व पतसंस्थाचे कर्मचारी,विकास देसाई,रविंद्र साखळे व गणेश तेली यांनी परिश्रम घेतले.

# पथनाट्याने रंगला 'अवकारीका'; रसिकांची जिंकली मने

छत्रपती संभाजीनगर - स्वच्छतेची सामाजिक गरज, कचऱ्यातून उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक असंख्य समस्या व त्या जाणीवेची आणि त्यावरील उपायांची प्रभावी मांडणी झाली ती नाट्य सादरीकरणातून. रवींद्र नाट्यमंदिरातल्या रंगमंचावर रंगलेल्या बहारदार पथनाट्याने रसिकांची मने जिंकली. चित्रपटाच्या प्रमोशनसाठी स्वच्छतेचं पथनाट्य सादर करीत पहिल्यांदाच अनोख्या पद्धतीने 'अवकारीका' या मराठी चित्रपटाचा ट्रेलर अनावरण सोहळा रंगला. याप्रसंगी चित्रपटातील



कलाकार, तंत्रज्ञ, तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त पोलीस महासंचालक मा. श्री कृष्णप्रकाशजी आवर्जून उपस्थित होते.

रेडबड मोशन पिक्चर या बॅनर अंतर्गत 'अवकारीका' हा मराठी चित्रपट येत्या १ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अरविंद भोसले यांचे आहे. चित्रपटाची निर्मिती भारत टिळेकर,अरुण जाधव यांनी केली असून सहनिर्मिती मनोज गायकवाड, अरविंद भोसले, मृणाल कानडे, गीता सिंग यांची आहे.

चित्रपट मनोरंजनाचे माध्यम असले तरी त्यातून समाजप्रबोधन होणे आवश्यक असतं. देशातील सामाजिक समस्यांबाबत लोकांना जागरूक करणे हे साहित्यिक, कलाकार यांचे आद्य कर्तव्य आहे. आपल्यासमोर उभ्या ठाकणार्या प्रश्नांना आपणच तोंड द्यायचं आहे, हे लक्षात येऊन एका एका महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाची जाणीव करून देण्यासाठी एकत्र आलेल्या 'अवकारीका' चित्रपटाच्या टीमच्या विलक्षण प्रयत्नांना दाद देत या चित्रपटाला अतिरिक्त पोलीस महासंचालक श्री. कृष्णप्रकाश यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## CHANGE IN NAME

तरुण भारत

I Have Changing my Name from
Old Name : Shaikh Javed Shaikh Tameez
To
New Name : Javed Tameez Shaikh
Address:- Asad kirana pandhari Mohalla, Kannad.Dist. Aurangabad Maharashtra 431103

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि. अर्ज क. ४९४/२०२५

अर्जदार - १) विशाल तुळशीदास साबणे वय ५० वर्ष धंदा नौकरी रा. खंडोबा मंदिर परिसर, गंगापूर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) वैशाली कैलास हिरे वय ४६ वर्षे, धंदा नौकरी रा. खंडोबा मंदिर परिसर, गंगापूर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) वैभव तुळशीदास साबणे वय ४१ वर्ष धंदा नौकरी रा. खंडोबा मंदिर परिसर, गंगापूर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) पुष्पा तुळशीदास साबणे वय ७० वर्ष धंदा घरकाम रा. खंडोबा मंदिर परिसर, गंगापूर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

अर्जदार क्र.१, २ व ३ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. ४ हि अर्जदार क्र. १ ते ३ ची आई आहे वरील सर्व नमुद ठिकाणचे रहिवाशी आहेत. अर्जदार क्र. ४ चे पती व अर्जदार क्र. १ ते ३ चे वडील नामे तुळशीदास गोपाळराव साबणे हे गंगापूर ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०९/०७/२०२५ रोजी मौजे गंगापूर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे अल्पशा आजाराने मयत झाले आहे. आता मयत तुळशीदास गोपाळराव साबणे यांना अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत तुळशीदास गोपाळराव साबणे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार क्र. १ ते ४ यांना शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता मयत तुळशीदास गोपाळराव साबणे यांचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप सर्टिफिकीट) ची आवश्यक असल्याने अर्जदार क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराचा अर्जास व त्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संबन्धीतानी त्यांचा असलेला आक्षेप उजर या मा. न्यायालयात व्यक्तिश अथवा विधीज्ञ मार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा मुदतीनंतर आलेला आक्षेप उजर गृहीत धरला जाणार नाही. व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करिता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्याने आज दिनांक १९/०७/२०२५ रोजी दिले.

लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर. गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एम. ए. शेख, ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. ४९६/२०२५ — पुढील तारीख ३०/०८/२०२५

अर्जदार -१) मालनबाई भ्र. सुभाष सोनवणे वय ५७ वर्षे, धंदा घरकाम रा. बस स्थानक जवळ, लासूर स्टेशन ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मो. नं. ९८६०१२२२५३ २) योगिता भ्र. विजय सुपेकर वय ३६ वर्षे, धंदा घरकाम रा. घर नं. ३-१४-०५, स्मशानी मारुती रोड, कैलाश नगर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) ३) प्रशांत पिता सुभाष सोनवणे वय ३२ वर्षे, धंदा मजूरी रा. बस स्थानक समोर लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ३ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ ही अर्जदार क्रं. २ व ३ यांची आई आहे. अर्जदार क्रं. २ व ३ हे आपसात सख्खे भाऊ विवाहीत बहिण आहे. अर्जदार क्रं. १ हिचे पती व अर्जदार क्रं. २ व ३ यांचे वडील नामे सुभाष शंकरराव सोनवणे हे दिनांक २३/०५/२०२५ रोजी मौजे लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ चे सासु सासरे व अर्जदार क्रं. २ व ३ यांचे आजी आजोबा हे बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले असल्यामुळे त्यांचा मयताबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदारांकडे उपलब्ध नाही. त्यामुळे मयत सुभाष शंकरराव सोनवणे यांना अर्जदार क्रं. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ विवाहीत मुलगी आणि अर्जदार क्रं. ३ हा मुलगा या नात्याने कायदेशीर वारसदार असून मयतास अर्जदार क्रं. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत सुभाष शंकरराव सोनवणे यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिद झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक १९/०७/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व. स्तर गंगापूर

## रोखठोक

# मुद्दे आणि गुद्दे...

दिनेश गुणे

विचारांचा मुकाबला विचाराने करावा, मुद्याला मुद्याने प्रत्युत्तर द्यावे, हा सुविचार व्यक्त करण्याची वेळ जेव्हा जेव्हा कोणावरही येते, तेव्हा तेव्हा या सुविचाराच्या नेमके विपरीत असे काही अगोदर घडून गेलेले असते. त्यामुळे काळाच्या प्रवाहात भरकटत चाललेल्या या सुविचाराची धार केव्हाच संपलेली असून वारंवार वापरला गेल्याने त्यास केवळ गुळगुळीतपणा आला आहे. असे गुळगुळीत विचार कालांतराने बुळबुळीतही होत जातात आणि जेथे मुद्दे आणि विचारांचे अस्तित्वच संपते तेव्हा हा सुविचारच खुंटीवर ठेवून गुद्यांवर येणे हाच मार्ग अवलंबिला जातो, असेही अनेकदा घडलेले दिसते. महाराष्ट्राच्या राजकारणाला एक संस्कृती आहे, सभ्यतेचा वारसा आहे, विरोधी विचारांचा आदर करण्याची परंपरा आहे आणि या राज्याच्या सभ्यतेने राजकारणास दिशा दिलेली आहे, असे गेल्या अनेक पिढ्यांकडून आपण ऐकत आलो आहोत. खरोखरीच ते खरे आहे का, हे तपासण्यासाठी इतिहासाचा मागोवा घेण्याची तसदी सहसा फारशी कोणी घेतलेली नाही, कारण खरेखोटे तपासताना या सुविचारास छेद देणारे काही समोर आलेच, तर ते सहन करण्याची हिंमत महाराष्ट्राच्या राजकारणात आहे किंवा नाही याबाबतही बहुधा कोणासही खात्री नसावी. त्यामुळे हा सुविचार खरा असा भोळसट समज करून घेऊनही, सध्याच्या काळात जे काही घडते, ते पाहणे आणि सहन करण्यापलीकडे सामान्यांच्या हाती काही उरलेले नाही. गेल्या काही दिवसांत महाराष्ट्राच्या विधिमंडळात आणि त्याआधी राज्यात जे काही प्रकार घडले, ते पाहता, प्रतिवाद करावा असे विचार आहेत किंवा नाहीत आणि मुळातच, प्रतिवादाकरिता तरी काही ठोस विचार कोणाच्या गाठीशी आहेत किंवा नाही याचाच विचार करण्याची वेळ आली आहे, हेच खरे आहे. मुद्यांचा मुद्यांशी संबंध नाहीच, पण मुद्यांऐवजी गुद्दे हाच विचार बळावत आहे, हेही स्पष्ट आहे. तरीही, महाराष्ट्रात असे काही घडून गेल्यानंतर, विचारांचा प्रतिवाद विचाराने करावा आणि मुद्याला मुद्याने प्रत्युत्तर द्यावे या सुविचाराचा गजर सुरू होतो. महाराष्ट्राने गेल्या काही दिवसांत राजकारणाच्या पटावर जे काही अनुभवले, ते पाहता असे सुविचार केवळ विनोदी वाटावेत, अशीच परिस्थिती दिसू लागते. राजकारणाचा स्तर खालावला आहे. कुरघोडीच्या राजकारणाने खालचा थर गाठला आहे आणि कात्रजचा घाट हा या राजकारणातील परवलीचा शब्द झाला आहे. अनेक जण आखाड्यात उतरण्याच्या ईर्ष्येनेच राजकारण करत आहेत आणि धोबीपछाड हा अनेकांचा आवडता डाव झाला आहे. यामुळेच, राजकारणाविषयी आणि विधिमंडळात प्रतिनिधित्व करण्यासाठी जनतेने पाठविलेल्या लोकप्रतिनिधींविषयी सामान्य जनतेच्या भावनाही बदलत गेल्या आहेत. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात व्यक्त केलेली मते हे सामान्य जनतेच्या भावनांचे हुबेहूब प्रतिबिंब होते. आमदार माजले आहेत ही सामान्य जनतेची भावना आहे आणि विधिमंडळात अधिवेशनाच्या अखेरच्या आठवड्यातील अखेरच्या दोन दिवसांत जे काही घडले, हाणामारी झाली, त्यामुळे सभागृहाची व लोकप्रतिनिधींची प्रतिमा मलिन झाली आहे, हे त्यांचे वक्तव्य म्हणजे केवळ जनतेची भावना नसून राजकारणाच्या सद्य:स्थितीचे विश्लेषण आणि कबुलीदेखील ठरले आहे.

विधिमंडळाच्या परंपरेने लाजेने मान खाली घालावी अशी एक निंदनीय घटना पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजातील अखेरच्या सत्रात महाराष्ट्रास पाहावयास मिळाली. त्याआधीच्या दोन आठवड्यांच्या कामकाजादरम्यान याच सभागृहात सभ्यतेचे एक सकारात्मक चित्र दिसले होते. राज्याच्या जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपयोगी ठरणारा व कट्टर विघातक अतिरेकी कारवायांना पायबंद घालणारा कायदा याच सभागृहाने विरोधाविना संमत केला होता आणि महाराष्ट्राचे प्रेरणास्थान असलेल्या छत्रपती शिवरायांच्या पराक्रमी इतिहासाचा व रयतेच्या राज्याचा आदर्श जिवंत करून नव्या पिढीला प्रेरणा देणारा त्यांचा कारकीर्दीचा वारसा जपणाऱ्या गडकिल्ल्यांना जागतिक वारसा वास्तूंचे मानांकन मिळवून देणाऱ्या निर्णयाचे एकमुखी स्वागतही याच सभागृहाने केले होते. एका बाजूला छत्रपतींच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या लोकप्रतिनिधींनी जनतेच्या प्रतिनिधिगृहात परस्परांवर असंसदीय शब्दांची प्रच्छन्न उधळण करावी, समर्थकांच्या टोळ्यांना विधिमंडळाच्या आवारात आणून एकमेकांना मारहाण करावी आणि पुढे सभागृहाच्या व लोकप्रतिनिधींच्या प्रतिष्ठेचा मुद्दा समोर येताच सावध शब्दांत दिलगिरी व्यक्त करून मोकळे व्हायचे, हा सारा खेळ पाहता, लोकप्रतिनिधी माजले आहेत, ही सभागृहात मुख्यमंत्र्यांच्या मुखातून व्यक्त झालेली जनतेची भावना जनतेच्या मनातून पुसली गेली असेल असे कोणास वाटणार नाही.

लोकप्रतिनिधींच्या माजलेपणाचे अनेक मासलेवाईक दाखले याआधीही जनतेने अनेकदा अनुभवलेले आहेत. अधिवेशनाच्या अखेरच्या आठवड्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्यात उडालेल्या मौखिक हाणामारीचे पर्यवसान पुढे समर्थकांमधील शारीरिक हाणामारीत झाले. असा गोंधळ याआधी कधी झाला नव्हता असे नाही. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना नागपूरच्या एका हिवाळी अधिवेशनात सत्तारूढ आणि विरोधी सदस्यांत सभागृहामध्ये झालेल्या वादाच्या काही मुद्यांवर तोडगा काढण्यासाठी अध्यक्षांच्या दालनातील बैठकीदरम्यान तेव्हाचे मंत्री अण्णा डांगे आणि विरोधी सदस्य बबनराव ढाकणे यांच्यात झालेल्या वादावादीचे पर्यवसान शिवीगाळीत झाले आणि बैठक संपून बाहेर पडताना दोघेही हातघाईवर आले. हातघाईच्या त्या घटनेसही नाट्यपूर्ण वळण देऊन कुरघोडीचा डाव टाकणारा तो प्रसंग परवाच्या हाणामारीनंतर अनेकांस आठवला असेल. समाजवादी पार्टीचे सदस्य अबू आझमी यांच्या आमदारकीच्या शपथविधीवेळी मनसेच्या सदस्यांनी भर सभागृहात त्यांच्यावर हात उगारला होता, या आठवणीचीही उजळणी झाली असेल



आणि एका आमदाराचे वाहन अडविल्याच्या आरोपावरून एका पोलिस अधिकाऱ्यास विधान भवनात झालेल्या मारहाणीचा किस्साही या निमित्ताने अनेकांस आठवला असेल. भर सभागृहातील हमरीतुमरीच्या अनेक प्रसंगांमुळे उद्भवलेल्या गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज तहकूब करण्याची वेळ याआधी अनेकदा आली आहे. पण यंदाच्या पावसाळी अधिवेशनात आव्हाड-पडळकर यांच्या वादाने या एकूणच भूतकाळावर कळस चढविला. हमरीतुमरीच्या त्या प्रसंगांनंतर काही जणांवर कारवाईही झाली होती, पण थेट विधिमंडळाच्या आवारात, प्रवेशद्वाराशीच समर्थकांना आणून हाणामारी करत कायदा हातात घेण्याचा प्रकार मात्र, पहिल्यांदाच घडला. सभागृहाच्या प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्हे उमटविणाऱ्या त्या घटनांनी महाराष्ट्राने वेळोवेळी चिंता व्यक्त केली होती. आमदार माजले आहेत, अशा भावना तेव्हाही जनतेमध्ये उमटल्या होत्या. पण या भावनेची नोंद विधिमंडळाच्या कामकाजात खुद्द मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यातून झाली, म्हणून ही घटना अभूतपूर्व ठरते. राज्याच्या कानाकोपऱ्यातील लोकप्रतिनिधी किंवा राजकीय नेत्यांमधील राजकीय वैराचे अनेक किस्से सांगितले जातात. लोकप्रतिनिधींच्या करामतींची दबक्या आवाजातील कुजबूज हा अनेक गावांतील संध्याकाळी पारावरच्या गप्पांना रंग भरणारा विरंगुळ्याचा विषय असतो. रस्त्यावरचे राजकीय राडे हा तर राज्यात वर्षानुवर्षे चर्चिला जाणारा विषय आहे. पण या सर्वांस एक मर्यादा होती. लोकप्रतिनिधींमधील वाद किंवा वैराने लक्ष्मणरेषा आखलेली होती. कदाचित त्यामुळेच, हे रस्त्यावरचे राडे याआधी कधीही विधिमंडळाच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचले नव्हते. जितेंद्र आव्हाड यांनी महाविकास आघाडीचे मंत्री असताना अनंत करमुसे नावाच्या एका व्यक्तीस बंगल्यावर आणून मारहाण केल्याचा उल्लेख सभागृहातच चर्चेदरम्यान झाला. एका मंत्र्याने आपल्या पदाची प्रतिठा अशा रीतीने खुंटीवर टांगली तेव्हाही, लोकप्रतिनिधी माजले आहेत, अशीच सर्वसाधारण भावना जनतेच्या मनात उमटली होती. असे प्रकार जेव्हा जेव्हा घडले, तेव्हा तेव्हा प्रत्येक वेळी हीच भावना उमटली आणि अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात जनतेच्या मनातील ही भावना बोलून दाखविली, तेव्हा कामकाजाच्या नोंदीत या भावनेस स्थान मिळाले. कारण विधिमंडळाच्या आवारात, प्रत्यक्ष प्रवेशद्वारातच दोन आमदारांतील वैराची ठिणगी भडकून त्यांच्या समर्थकांनी किंवा कार्यकर्त्यांनी हाणामारी करावी अशी नोंदही विधिमंडळाच्या इतिहासात प्रथमच घडली आहे.

ही विधानसभा आमदारांच्या मालकीची नाही, मंत्र्यांच्या मालकीची नाही आणि मुख्यमंत्र्यांच्याही मालकीची नाही, तर महाराष्ट्रातील १४ कोटी जनता हीच याची मालक आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनात कामकाजाच्या अखेरच्या दिवशी सर्वच सदस्यांस ठणकावून बजावले हे मात्र चांगलेच झाले. शुक्रवारी सभागृहातील त्यांच्या भाषणाचा कणखर सूर मात्र जनतेच्या भावनांना दिलासा देणारा ठरणार आहे. कारण, विधानसभेच्या कामकाजातून समाजाला दिशा दाखविण्याचे कामकाज झाले पाहिजे अशी जनतेचीही अपेक्षा असते. त्याऐवजी लाथाबुक्क्यांचा संदेश समाजात जात असेल, तर चिंतन करण्याची वेळ सर्वांवर आली आहे, याची जाणीव मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखविली आणि त्याचीही नोंद सभागृहाच्या कामकाजात झाली. गुरुवारच्या हाणामारीत सामील असल्याची नोंद झालेल्या दोघांनी अभ्यागत म्हणून विधानभवनात प्रवेश केला होता, त्यामुळे आता विधिमंडळाच्या आवारात अभ्यागतांच्या प्रवेशासंबंधी काही नियमावली करण्याचा एक प्रस्ताव विचाराधीन असल्याचे शुक्रवारी विधानसभा अध्यक्षांनीही जाहीर केले. या हाणामारीत सहभागी असलेली एक व्यक्ती जितेंद्र आव्हाड यांचा कार्यकर्ता होती, तर दुसरी व्यक्ती आमदार गोपीचंद पडळकर यांची नातेवाईक होती. अशा कोणाही व्यक्तीस अनाहूतपणे आपल्यासोबत विधानभवनात आणण्याचे नेमके प्रयोजन काय होते, असा प्रश्नही अप्रत्यक्षपणे त्यांनी उपस्थित केला आणि अशा अनाहूतांकडून कोणतीही आक्षेपार्ह कृती झाली तर त्याची जबाबदारी संबंधित सदस्यावर राहील असा नियम करण्याची गरजही अधोरेखित केली. लोकशाहीचे मंदिर मानल्या जाणाऱ्या विधिमंडळाच्या सर्वोच्च परंपरांचे पालन करण्याची जबाबदारी सदस्यांची आहे, सदस्यांचे वर्तन विधिमंडळाची प्रतिष्ठा वाढविणारे असावे, सभागृहाची परंपरा, उच्च प्रथा, गरिमा बाधित होईल असे कोणतेही वर्तन सदस्यांनी करू नये, असे सांगण्याची वेळ अध्यक्षांवर यावी ही बाबही लोकशाहीच्या दृष्टीने लाजिरवाणीच ठरली आहे. कारण, विधिमंडळाच्या परंपरांची प्रतिष्ठा आमदारांच्या नैतिक आचरणावरून ठरत असते. आता आमदारांच्या नैतिक आचरणाचे मापदंडच ठरवावे लागणार आहेत आणि त्यासाठी विधिमंडळाची नीतिमूल्य समिती नेमावी लागणार आहे. अधिवेशनकाळात अभ्यागतांना प्रवेश दिला जाणार नाही आणि मंत्री वा आमदारांनी प्रवेशासाठी विनंती करू नये, असेही अध्यक्षांनी बजावले आहे. १४ कोटी जनतेच्या मालकीच्या या सदनात जनतेसही आता प्रवेसासाठी काटेकोर नियमांचे टप्पे ओलांडावे लागणार आहेत. दोघा आमदारांच्या समर्थकांतील हाणामारीचे असे अनेक परिणाम आता अनुभवावे लागणार आहेत. या दोघा अभ्यागतांवर काही गुन्ह्यांचीदेखील नोंद असल्याचे दिसते. आव्हाड समर्थकावर आठ गुन्हे दाखल आहेत, तर पडळकरांच्या समर्थकावर सहा गुन्हे दाखल आहेत. अशी मंडळी विधानभवनाच्या आवारात येऊन हाणामारी करतात, याची पुरेशी लाजिरवाणी भावना शुक्रवारी मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यातून उमटली आहे.

राजकीय कारणांवरून हाणामारी, राडे घडले की त्यामधील सहभागींचे राजकीय लागेबांधे, नेत्यांसोबतचे संबंध शोधण्याची स्पर्धा सुरू होते आणि या घटनांमागे कोणा नेत्याचा किंवा पक्षाचा हात असल्याचा आरोपवजा निष्कर्षही काढला जातो. गेल्या काही वर्षांत अशा अनेक घटनांमागे कोणा ना कोणा पुढाऱ्याचा किंवा राजकीय पक्षाचा संबंध जोडला जाण्याचे राजकारणही घडले आहे. त्यालाच कुरघोडीच्या राजकारणाचे रंग चढविले जातात आणि सूडाचा प्रवास सुरू होतो. अगोरदरच, राज्यातील जनतेस अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. गुन्हेगारी, भ्रष्टाचाराची मुळे खोलवर रुजली असल्याने कोणत्याही सत्ताकाळात त्याला आळा घालण्याचे प्रयत्न तोकडेच ठरलेले दिसून येतात. गुन्हेगारीसंदर्भात आकडेवारी मांडून गुन्ह्यांचे किंवा गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण कमी झाल्याचा दावा करण्याची एक प्रथा सभागृहात प्रत्येक सत्ताकाळात दिसून येते. गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण वाढले म्हणजे गुन्हेगारी कमी झाली असे मानले जात नाही. जुन्या सत्ताकाळातील गुन्हेगारीची आकडेवारी मांडणे आणि नव्या सत्ताकाळात गुन्हे सिद्ध होण्याची आकडेवारी मांडणे हे गुन्हेगारीस आळा घालण्याच्या प्रयत्नांचे समर्थन ठरत नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वत:च ते मान्यदेखील केले आहे. त्यामुळे, गुन्हे सिद्ध होण्याच्या प्रमाणाची आकडेवारी मोजण्यापेक्षा, गुन्हेगारीच्या घटनांची आकडेवारी अधिक महत्त्वाची ठरते. राज्यातील गुन्हेगारीचे प्रमाण आणि नागरिकांची सुरक्षितता हे परस्परांशी निगडित असलेले मुद्दे आहेत. जेथे गुन्हेगारी बोकाळते, तेथे विकासाच्या प्रकल्पांनाही खीळ बसते. नवे उद्योग सुरू करण्यास कोणी धजावत नाही आणि गुंतवणुकीचा ओघ थांबला की त्याच्या परिणामी रोजगाराच्या संधी गमावल्याने अर्थकारणासही खीळ बसते. एकंदरीतच, गुन्हेगारी ही समाजस्वास्थ्याला लागलेली कीड असल्याने, ती मुळापासून नष्ट करण्याकरिता ज्या लोकप्रतिनिधींची भूमिका प्रामाणिक असावी अशी जनतेची अपेक्षा असते, त्या लोकप्रतिनिधींच्या समर्थकांवरच गुन्हे दाखल असतील आणि असे समर्थक लोकप्रतिनिधींचे बोट धरून थेट विधानभवनाच्या प्रवेशद्वारात गुंडगिरीचे सामूहिक प्रदर्शन घडवत असतील, तर सभागृहाची प्रतिष्ठा आणि जनतेच्या लोकप्रतिनिधींकडून असलेल्या अपेक्षांचे मूल्य खालावले असेच म्हणावे लागेल. आमदार माजले आहेत, ही जनतेची भावना सभागृहात व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहास त्याची दखल घेणे भाग पाडले आहे. आता नव्याने स्थापन होणारी नीतिमूल्य समिती ही भावना संपुष्टात आणण्यासाठी कोणती पावले उचलणार हे पाहणे नक्कीच औत्सुक्याचे ठरेल.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### ज्येष्ठांनी आपले श्रेष्ठत्व जपावे

भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. भारत सरकारने वर्ष २०११ मध्ये केलेल्या सर्व्हेनुसार भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या १०.३९ कोटी होती. दरवर्षी ही संख्या ३६ टक्क्यांनी वाढते. दर १० वर्षांनी भारत सरकार सर्व्हे करून ज्येष्ठ नागरिकांची संख्या जाणून घेत असते. त्यानुसार वर्ष २०२१ मध्ये झालेल्या सर्व्हेनुसार ज्येष्ठ नागरिकांची संख्या १४.३२ कोटी झाली होती. पुढील १० वर्षांत म्हणजे वर्ष २०३१ पर्यंत ही संख्या १७.३२ कोटी झालेली असेल जी एकूण लोकसंख्येच्या १२.५० टक्के असेल.

त्या तुलनेत जन्मदर बराच कमी आहे. ० ते ६ वयोगटातील मुलांची संख्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत केवळ १३.१० टक्के होती. ज्येष्ठ नागरिकांची वाढती लोकसंख्या आणि घटत चाललेला जन्मदर हा चिंतेचा विषय आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या वाढत्या लोकसंख्येबरोबर समस्या देखील त्याच प्रमाणात वाढत आहेत. यावर बरेच विचारमंथन नियमित होत असते. पण त्यातून समाधानकारक मार्ग निघत नाही. आर्थिक कुचंबणा हे एक प्रमुख कारण असावे. आर्थिक स्वावलंबन गमावणे आणि दुसऱ्याच्या भरवशावर जीवन जगण्याची वेळ येणे यासारखे दुसरे दु:ख नाही असे भूक्तभोगी सांगतात. भारतात ज्येष्ठ नागरिकांची जी संख्या आहे त्यात नोकरी आणि व्यवसायातून निवृत होणाऱ्यांची संख्या केवळ ६ टक्के आहे. यांना निवृत्तीनंतर कमी जास्त प्रमाणात निवृत्ती वेतन (पेन्शन) मिळत आहे. त्यात जवळपास २० लाख ज्येष्ठ नागरिक असे आहेत ज्यांना १००० रुपये आणि त्यापेक्षा कमी पेन्शन मिळत आहे. त्यांना दुसरा आर्थिक स्रोत नाही. त्यामुळे परिवारात तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागतो हे कटु सत्य आहे. त्यात महिलांची संख्या अधिक आहे. विशेषतः विधवांची. या अल्प वेतनात वाढ व्हावी असा प्रयत्न वर्ष २०१४ पासून होत आहे पण यश मिळत नाही आहे. पण त्याहीपेक्षा चिंता त्या ९४ टक्के लोकांची आहे जे असंघटित क्षेत्रात काम करतात. त्यांची आर्थिक स्थिती अतिशय खराब आहे. वृद्धावस्थेमुळे ते काम करू शकत नाहीत, त्यांना पेन्शन पण मिळत नाही.

अशा परिस्थितीत ज्येष्ठांनी आपले ज्येष्ठत्व जपावे अशी आपली अपेक्षा आहे. खरे तर ही तारेवरची कसरत आहे. पण या अवस्थेतून गेलेली ज्येष्ठ मंडळी आपल्या अनुभवाच्या आधारावर सांगतात, हो आपण आपले श्रेष्ठत्व जपून ठेवू शकतो. ते सांगतात, आपण दुसऱ्यावर अवलंबून आहोत ही धारणा मनातून काढून टाकली पाहिजे. माझी माझ्या परिवाराला नितांत गरज आहे. ती गरज परिवारातील एक सदस्य या नात्याने मी भागविल असा आत्मविश्वास स्वत:मध्ये प्रथम आणि परिवारात निर्माण करीन ही खूणगाठ मनाशी बाळगावी लागेल. मी कोण होतो यापेक्षा आज मी कोण आहे याचा विचार केला तर समस्या उद्भवत नाहीत. उलट आपण आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिली, हा माझा परिवार आहे, माझ्या सुख-दु:खात हीच मंडळी उपयोगात येणार आहे ही भावना मनात जोपासावी लागेल. सर्व प्रश्न सुटतील. मुख्य म्हणजे वृद्धाश्रमाचे दरवाजे पाहावे लागणार नाहीत.

या सोबतच ६० ते ७० वयोगटातील नागरिकांनी स्वतःला वृद्ध समजू नये. निवृत्ती ही स्वाभाविक प्रक्रिया आहे. पण वरील वयोगटातील मंडळीत ऊर्जा कायम असते. ते परिवारात राहून समाजकार्य करू शकतात. आर्थिक गरज भागविण्यासाठी नव्हे तर चारचौघांत राहून समाजकार्य करण्याची इच्छा बाळगली तर अनेक मार्ग सापडतात. आपले आवडते क्षेत्र आपण शोधू शकतो. समाजात अनेक उपक्रम चालतात जिथे ६० ते ७० वयोगटातील लोकांची नितांत गरज आहे. त्यावरील वयोगटातील ज्येष्ठांनी निराश होण्याचे कारण नाही. कुटुंब प्रमुखाची भूमिका घरात राहून ते पार पाडू शकतात. आपले मोठेपण जपत पण त्याचे प्रदर्शन न करता आपण आपले कर्तव्य पार पाडू शकतो हा विश्वास मनात बाळगावा लागेल. आपले श्रेष्ठत्व जपत हळुवारपणे आपल्या कुटुंबाच्या मनात स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर आपणही आपले उर्वरित आयुष्य मानाने, आनंदाने जगू शकतो त्यासाठी दुसऱ्याच्या आनंदात आपला आनंद आहे हे आपल्या मनाला समजून सांगावे लागेल.

**वसंत पिंपळापुरे**/९४२२८०७०१३

●● ●●

### बाजारात वस्तू विक्रीसाठी खोटा प्रचार




ग्राहकांची फसवणूक ही आधुनिक मार्केटिंग पद्धत सुरू झाली आहे. आजच्या स्पर्धात्मक बाजारपेठेत उत्पादन विक्री करणे ही फक्त गुणवत्तेवर अवलंबून राहिलेली नाही. उत्पादन किती चांगले आहे यापेक्षा ते किती चांगले दाखवले जाते हे महत्त्वाचे झाले आहे. त्यामुळेच बाजारामध्ये खोट्या प्रचाराला प्रचंड उधाण आले आहे. जाहिराती, सोशल मीडिया, इन्फ्लुएन्सर्स, भडक पॅकेजिंग यांचा वापर करून ग्राहकांच्या भावनांचा खेळ केला जातो आहे. खोट्या प्रचाराची अनेक रूपे अतिशयोक्त जाहिराती, १० दिवसांत वजन कमी, पाच मिनिटांत केस गळती थांबवा, सगळ्यात स्वस्त किंमत अशा जाहिराती खरे तर अशक्य गोष्टी सांगतात, पण आकर्षकपणे मांडल्यामुळे लोक विश्वास ठेवतात. विविध कंपन्या सर्रास नकली सवलती व ऑफर्स देतात. फक्त आजच ५० टक्के डिस्काऊंट, लिमिटेड स्टॉक अशा घोषणा खऱ्या नसतात. स्टॉक भरपूर असतो, पण ग्राहकाला घाई करण्यास भाग पाडले जाते. सिने कलाकारांनी एखादे उत्पादन वापरताना दाखवले की लोक लगेच त्या गोष्टीवर विश्वास ठेवतात. पण अनेकदा त्या कलाकारांनी ते उत्पादन वापरलेले नसते. १०० टक्के नैसर्गिक केमिकल फ्री, डॉक्टर सर्टिफाईड असे शब्द वापरून ग्राहकांना फसवले जाते. प्रत्यक्षात उत्पादनात हानिकारक घटक असतात. निकृष्ट दर्जाची उत्पादने बाजारात टिकतात. प्रामाणिक उत्पादकांवर अन्याय होतो. यामुळे ग्राहकांनाच हळूहळू विश्वास हरवतो आणि बाजारपेठ बिघडते. प्रचारातील विविध जाहिरातींवर अंधश्रद्धा ठेवू नका. अनेक कंपन्यांच्या वस्तू ऑनलाईन रिव्ह्यू वाचून निर्णय ग्राहकांनी घेतले पाहिजेत. बाजारात वस्तू विकायच्या तर गुणवत्ता महत्त्वाची आहे, पण आता खोटे बोल पण रेटून बोल हे धोरण प्रचलित झाले आहे. अशा वेळी सजग आणि विचार करणारा ग्राहकच या फसवणुकीपासून स्वत:ला वाचवू शकतो. आपली जबाबदारी आहे की खरे आणि खोटे यातील फरक ओळखावा आणि योग्य वस्तूची निवड करावी. चमकदार जाहिरात ही गुणवत्तेची हमी नसते. विचारपूर्वक खरेदी हीच ग्राहकांची खरी बचत होऊ शकेल.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

●● ●●

### सुजाण नागरिकांनी संस्कृती-रक्षक व्हावे!

साद्यंत स्थितीत अस्तित्वात असलेली आपली सनातन संस्कृती चिरकाल टिकवण्यासाठी व्यक्तिगत आणि संघटित प्रयत्न अत्यावश्यक आहेत. विविध भौगोलिक प्रांत, भाषा, राहणीमान आणि धार्मिक आस्थांमध्ये भिन्नता आढळत असली तरी टिकून आहे याचे कारण आपण

व्यष्टी (व्यक्ती), समष्टी (समाज) आणि परमेष्ठी (परमात्मा) ही संकल्पना स्वीकारली आहे. आपल्या संस्कृतीचा संस्थापक नसल्याने निसर्गातील पंचमहाभूत म्हणजे ब्रह्मांड हेच आदी आणि अंत आहे याची ऋषी, मुनी आणि तपस्वी यांनी कठोर तपश्चर्या करून जाणीव करून दिल्याने सनातनचे आधी आणि नंतर काही नाहीच आणि हेच अंतिम सत्य, आता जगातील बुद्धिवंत वर्गाला पटत असल्याचे दिसत आहे.

पाश्चात्त्य देशातील अनेक संस्कृती संशोधक याकडे आकृष्ट होत असून नुकताच प्रयागराज महाकुंभमेळा यात तब्बल ४२ देशांतील विविध संस्कृती पालन करणाऱ्या संशोधक वृत्तीच्या बुद्धिवंत मंडळींनी प्रत्यक्ष उपस्थिती दर्शविली. या अभूतपूर्व घटनेचे आपण साक्षीदार असलो तरी संस्कृती घटक म्हणून आपली नैतिक जबाबदारी वाढली आहे. भावी पिढी ही विज्ञाननिष्ठा बाळगून शिक्षण घेणारी असल्याने

त्यांच्यात द्वंद्व किंवा शंकांचे डोंगर उभे राहणार नाही, याची काळजी घेणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे. त्यासाठी अस्तित्वात असलेले विविध शास्त्र, उपासना पद्धती, देवी-देवता आणि त्यांच्या मूर्ती, सणवार याबद्दल विकृत माहिती प्रसारित होत असेल तर त्याचे निराकरण आणि त्यावर त्वरित अंकुश ठेवण्यासाठी व्यक्तिगत आणि संघटित प्रयत्न अपेक्षित आहेत. शास्त्रातील कृतींचा अवलंब करताना ती आधुनिक विज्ञान आणि प्रकृतीशी किती सुसंगत आहे, हे आपण आधी पटवून घेतले आणि तसे आचरणात आणले तर त्याचा कित्येक पटीने प्रभाव जास्त पडतो, असे आढळले आहे.

आता चातुर्मासात अनेक व्रत-वैकल्य, सण, उत्सव साजरे होत असताना त्यांचा मूळ स्वरूपात समाजात संदेश प्रसारित झाल्यास नवीन पिढी आचरणात आणेल. या चातुर्मासातील आचरण आणि आपले व्यक्तिगत शारीरिक व मानसिक आरोग्य यांचा कसा अन्योन्य संबंध आहे, हे त्या त्या क्षेत्रांतील तज्ज्ञ, जाणकार व अधिकारी व्यक्तींनी पुढाकार घेऊन उपलब्ध समाज माध्यमातून प्रसारित केल्यास भावी पिढीच्या ज्ञानात निश्चित भर पडेल. उत्सवांचे मूळ स्वरूप हे बीभत्स व हिडीस प्रकारात येऊ नये, याची पण दखल घेतल्यास समाजात चांगला जाईल. आपल्या संस्कृतीत संगीत शास्त्र अत्यंत प्रगत आहे. शास्त्रीय गायन, भावगीत, सिनेमा संगीत लोकगीत, भजन, कीर्तन, वादन इ. कलांचे संवर्धन करणे, नूतन कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणे, आर्थिक मदत करणे यासाठी ज्येष्ठ कलाकारांनी परिसरातील समाज भवन संस्था, शैक्षणिक संस्था, मोठी मंदिरे यांच्या साह्याने कार्यक्रम आयोजित केल्यास या कला टिकून राहतील. 'योजकस्तु दुर्लभः' हे सूत्र असले तरी आयोजकांचा शोध अत्यावश्यकच आहे तेव्हाच संस्कृती टिकून राहील, असे वाटते.

**संजय पाठक**/नागपूर

●● ●●

### स्नॅक्सच्या दुनियेत हरविला सुदृढ बालक

शरीराची व मनाची सुदृढता व आरोग्य संपन्नता ही आपल्या आहार विहारावर अवलंबून असते. चाळिशीत जीवन जगणाऱ्या आजच्या या पिढीला आपलं बालपण आजच्या या स्नॅक्सच्या दुनियेत हरवलेल्या बालकांकडे बघून नक्कीच आठवत असावं. चार दशकांपूर्वी बाल्यावस्थेत असलेल्या बालकांचे खिसे नेहमी तिळ, शेंगदाणे, चिंचेचा मोहर, रानमेवा यांनी भरलेले असायचे. मित्रमंडळीत धिंगामस्ती करत एकमेकांशी वाटून खाण्यात खिसा केव्हा रिकामा व्हायचा ते कळायचं सुद्धा नाही. सकस आहार, मैदानी खेळ, निकोप मैत्री या दुनियेत वाढलेल्या बालकाची रोगप्रतिकारक्षमता कमालीची होती. रखरखत्या उन्हात गिल्ली दंडा, आट्यापाट्या, डाव डूबेल, तर पावसाच्या रिपरिपित बाण खुपसणे, तारांची रिंग, सायकलचे टायर, बांबूचे घोडे, कंचे, चिंचोके, आंब्याच्या कोया खेळत दिवसभर हुंदळूनसुद्धा चेहऱ्यावर थकव्याचे नामोनिशाण नसायचे. आईने लोखंडी तव्यावर भाजलेले चटकदार चणे, देशी गाईचं दूध, दुधावरची साय, दही, मक्याची कणसे, ज्वारीचा हुरडा या घरगुती स्नॅक्सपासून बालकांना पोषकत्व मिळायचं. त्यामुळे या पिढीचं आयुर्मान नक्कीच आजच्या स्नॅक्सच्या दुनियेत वाढत असलेल्या बालकाच्या तुलनेत अधिक आहे. चाळीस वर्षांपूर्वीची हीच पिढी आज शिक्षित व उच्चशिक्षित झाली, परंतु आहाराच्या बाबतीत स्वत:च्या निरक्षर आई-वडिलांनी जे गांभीर्य जपलं त्या गांभीर्यापासून मात्र कोसो दूर असल्याचे चित्र आज पाहायला मिळते. गाव-गल्लीत, पान टपऱ्यांवर, सार्वजनिक उद्याने, शाळा, महाविद्यालये वा फेरीवाल्याकडे आकर्षक पॅकिंगमध्ये लटकत असलेली चटक-



मटक यासारखे डझनांहून अधिक स्नॅक्स खरोखर बालकांच्या आरोग्यास पोषक आहेत का? एवढा विचार करण्याची फुरसत मात्र पालकांकडे नसल्याचं चित्र आज सर्रास आपणास दिसते. जिभेच्या स्वादापोटी कित्येक घातक रसायने स्नॅक्सच्या माध्यमातून बालकांच्या पोटात दररोज सर्रास चालली. याबाबत कोणीच गांभीर्याने विचार करताना दिसत नाही. उघड्या डोळ्यांनी पोटच्या गोळ्याला कुपोषित बनविण्याची मूकसंमती आपण देत आहोत. 'कळते पण वळत नाही' या उक्तीप्रमाणे मूग गिळून गप्प आहोत. बालकाची भूक मंदावणे, अल्पवयातील लठ्ठपणा, लवकर थकवा येणे, शरीराची अकार्यक्षमता व दिवसेंदिवस कमी होत चाललेली रोगप्रतिकारक क्षमता. ही दृश्य लक्षणे उघड्या डोळ्यांनी पाहूनसुद्धा प्रत्येक कुटुंबातील मुले सर्रास चटपटा स्नॅक्स खाताना दिसतात. या देशाचे रक्षण करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी या भावी पिढीवर आहे. भविष्यात खरेच या बालकांच्या मनगटात तेवढे सामर्थ्य राहील का, याचा विचार करणे नितांत गरजेचे आहे. वाढती लोकसंख्या व या भयंकर महागाईच्या काळात स्नॅक्सच्या जुन्या पद्धतीचा स्वीकार करणे थोडे अवघड नक्कीच आहे, परंतु अशक्य मात्र नाहीच.

**विनोद तात्याजी मडावी**/यवतमाळ

●● ●●

### नामांकन वापरण्याची सुविधा

अधूनमधून बँकिंग संस्था ग्राहक/गुंतवणूकदाराच्या फायद्यासाठी नामांकन सुविधेचा वापर करण्याचा आग्रह धरत असतात. मी या बाबतीत माझा प्रत्यक्ष अनुभव सामायिक करू इच्छितो की नामांकन सुविधेचा वापर अवश्य करावा. अलिकडच्या काळात माझ्या आईचे निधन झाले आणि त्यामुळे त्यांची बचत बँक खाती बंद करण्याचा आणि त्यातून पैसे काढण्याचा प्रश्न माझ्यासमोर आला. या उद्देशासाठी प्रक्रियात्मक औपचारिकता पूर्ण करण्यासाठी मी संबंधित राष्ट्रीयीकृत बँकेशी संपर्क साधला तेव्हा, अर्ज औपचारिकपणे सादर करताना संबंधित अधिकाऱ्याने मला कळवले की माझ्या आईच्या खात्यात त्यांच्या संगणकात उपलब्ध असलेल्या डेटानुसार नामांकन नाही आणि म्हणून त्यांना उत्तराधिकार/कायदेशीर वारस प्रमाणपत्र इत्यादी दाखल करण्याची दुसरी प्रक्रिया अवलंबावी लागेल, जी मला वाटली ती एक कठीण प्रक्रिया आहे. बँक अधिकाऱ्यांच्या सूचना स्वीकारण्यास मी अनिच्छुक असल्याने, बँक अधिकाऱ्यांना खाते उघडताना आईने दाखल केलेल्या मूळ अर्जाची कागदपत्रांसह पडताळणी करून खात्री करण्याचा आग्रह धरला. अधिकाऱ्यांनी माझी विनंती मान्य केली आणि एक किंवा दोन दिवस वाट पाहण्यास सांगितले आणि या प्रकरणात मदत करण्याचे आश्वासन दिले आणि माझ्या सेल नंबरवर पुढील प्रगती कळविण्यात येईल असे सांगण्यात आले. माझ्या विनंतीनंतर अधिकाऱ्यांनी एकत्रित प्रयत्न केले आणि काही तासांतच त्यांच्याकडून हे जाणून आश्चर्यचकित झाले की माझ्या आईने खाते उघडण्यासाठी केलेल्या मूळ अर्जात तिच्या मोठ्या मुलाच्या नामांकनाचा विशिष्ट उल्लेख आहे. तरीही अधिकारी दुविधेत होते की हे नामांकन बँक अधिकाऱ्यांकडून स्वीकारले जाईल की नाही. मी कोणतीही प्रतिक्रिया न देता अधिकाऱ्याला माझी विनंती खाती बंद करण्यासाठी आणि मृत खात्यातील उर्वरित रक्कम नामांकित व्यक्तीच्या खात्यात हस्तांतरित करण्यासाठी उच्च अधिकाऱ्यांकडे पाठविण्यास सांगितले.

येथे, मला हे सांगण्यास आनंद होतो की बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अर्जात केलेले नामांकन स्वीकारले आणि खाते बंद करण्यासाठी आणि नामांकित व्यक्तीच्या खात्यात रक्कम हस्तांतरित करण्यासाठी औपचारिकपणे सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या. अर्थात, मी अधिकाऱ्यांचा आभारी आहे आणि बँकेने नामांकनासंदर्भात दिलेल्या सुविधेबद्दलही तितकाच आभारी आहे. मी सर्व संबंधितांना विनंती करतो की त्यांनी मृत व्यक्तीचे खाते बंद करण्याशी संबंधित पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी नामांकन सुविधेचा नेहमीच वापर करावा.

**श्रीकांत हडप**/नागपूर

●● ●●

### मोबाईल पार्किंग एक उपाय

आजच्या युगात स्मार्ट फोन हा माणसाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. संवाद, शिक्षण, व्यवहार, मनोरंजन यासारख्या अनेक गरजा मोबाईलद्वारे पूर्ण केल्या जातात. परंतु या तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे अनेक गंभीर सामाजिक आणि वैयक्तिक समस्या निर्माण होताना दिसतात. मोबाईलच्या अतिवापरामुळे सर्वप्रथम आरोग्यावर परिणाम होताना दिसत आहेत. सततच्या मोबाईल वापरल्यामुळे मान, पाठ व हात दुखणे, मानसिक थकवा आणि नैराश्याची लक्षणे दिसून येतात. झोपेच्या वेळेचे उल्लंघन आणि स्क्रीनकडे सतत पाहिल्यामुळे डोळ्यांचे आणि मेंदूचे नुकसान होण्याची शक्यता जास्त आहे. यासोबतच शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवरही त्याचा विपरीत परिणाम होऊन मानसिक तणावामुळे अभ्यासाऐवजी मोबाईलवरील गेम्स आणि सोशल मीडियाकडे त्यांचे लक्ष जास्त जाते. शिक्षणासाठी इंटरनेट गरजेचे असले तरी त्यात दुष्परिणाम होण्याचे प्रमाण अधिक असते. अनेक वेळा मुले ऑनलाईन क्लासच्या नावाखाली मोबाईलवर गेम्स खेळताना दिसतात, ते चिंताजनक आहे.

मोबाईलमुळे कुटुंबातील संवाद कमी होत आहे. प्रत्येक जण आपल्या मोबाईलमध्ये व्यस्त असल्याने घरातील सदस्यांमध्ये नातेसंबंध ढासळतात. जेवणाच्या वेळी किंवा एकत्र बसण्याच्या क्षणी देखील मोबाईलचा अडथळा येऊन त्याचा परिणाम कौटुंबिक नात्यांवर होतो. मुलं आणि प्रौढ दोघेही सोशल मीडियावर, गेमिंगमध्ये अथवा व्हिडीओ पाहण्यात तासन्तास घालवतात. अनेक वेळा घरातील सदस्य खाजगी माहिती ऑनलाईन शेअर करतात, ज्याचा गैरवापर होण्याचा धोका असतो. या समस्येवर उपाय म्हणून 'मोबाइल पार्किंग' ही संकल्पना अत्यंत उपयुक्त ठरू शकते. घरामध्ये एक ठरावीक जागा आणि वेळ मोबाईल ठेवण्यासाठी ठरवणं म्हणजे मोबाईल पार्किंगमुळे अनेक फायदे होऊ शकतात. मोबाईल पार्किंगमुळे वेळेचे योग्य नियोजन करता येते. जेवणाच्या वेळेस, झोपण्याच्या आधी आणि कौटुंबिक वेळेत मोबाईलचा वापर टाळता येतो. यामुळे मोबाईल वापरावर वेळेची मर्यादा आपोआप लागू होईल. पालकांनी स्वतः मोबाईल शिस्तीत वापरून मुलांसमोर आदर्श ठेवणे आवश्यक आहे, कारण सांगण्यापेक्षा दाखवलेला आदर्श अधिक प्रभावी असतो. मोबाईल पार्किंगमुळे कौटुंबिक संवाद वाढवण्यास मदत होते. दिवसातून एकदा तरी संपूर्ण कुटुंबाने एकत्र बसून संवाद साधल्यास मोबाईलमुळे निर्माण झालेले अंतर भरून निघेल आणि पालक व मुलांमध्ये संवादाचे बंध अधिक घट्ट होतील. रात्री झोपण्याच्या एक तास आधी मोबाईल पार्किंगमध्ये ठेवण्याची सवय लावल्यास डोळ्यांचे आणि मानसिक आरोग्याचे रक्षण होईल. तसेच अनावश्यक नोटिफिकेशन्स बंद करून सतत मोबाईलकडे लक्ष जाण्याची सवय कमी करता येईल. मोबाईल पार्किंगमुळे स्क्रीन टाईमवर व विविध ॲप्सच्या साहाय्याने कोणत्या ॲप्सवर किती वेळ खर्च होतो हे लक्षात घेऊन त्यावर नियंत्रण ठेवता येईल. मुलांना गेम्स ऐवजी शैक्षणिक, सर्जनशील ॲप्स वापरण्याचे प्रोत्साहन देऊन मोबाईल शिवाय करमणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध करून देता येऊ शकतात. जसे की खेळ, वाचन, बागकाम, हस्तकला इत्यादी. यामुळे मुलांमध्ये सर्जनशीलता वाढते.

मोबाईल उपयुक्त आहे, पण त्याचा अतिवापर आपल्या आरोग्याचे, नातेसंबंधांचे आणि भविष्याचे नुकसान करू शकतात. यावर उपाय म्हणून घराघरात मोबाईल पार्किंगची अंमलबजावणी केली पाहिजे. ही संकल्पना योग्य पद्धतीने राबवली तर मोबाईलचा दुरुपयोग निश्चितच कमी करता येईल. त्यामुळे मोबाईलचा शिस्तबद्ध आणि उद्देशपूर्ण वापर ही काळाची गरज आहे.

**समीर मुकुंदराव थोडगे**/९२२६५८७१७८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### जिल्हा मध्यवर्ती शाखेकडून दिलीपराव देशमुख यांचा अमृत महोत्सव साजरा

**शिरूर अनंतपाळ, दि.२० जुलै -**

लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक व कै. बब्रुवान विठ्ठलराव काळे आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या ७५ व्या अमत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा शिरूर अनंतपाळ येथे सर्व बँक खातेदार व सभासद यांच्यासाठी सर्व रोगनिदान उपचार शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी १२५ रुग्णांची सर्व रोगनिदान व उपचार करून मोफत औषधोपचार करण्यात आले. यावेळी डॉ. अनंत पवार व टीमने उपचार तपासणी काम केले. याप्रसंगी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक व्यंकटराव पाटील बिरादार, रामकिशन गड्डिमे त्यांच्याकडून याप्रसंगी या कार्यक्रमात विशेष असे लक्ष देण्यात आले. यावेळी अनंतराव शिंदे, राम जाधव, हणमंत पवार, औदुंबर शिंदालकर, गुरुलिंग शिवणे, सुरेश बिराजदार, फकरोदीन मुजेवार, नारायण नरवटे, सुरेश तोंडाने, नामदेव लोंखडे यांच्यासह खातेदार रुग्ण उपस्थित होते.



### शिवनेरी महाविद्यालयात महिलांच्या आरोग्य आणि स्वच्छतेवर मार्गदर्शन

**शिरूर अनंतपाळ, दि.२० जुलै -**

शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ येथे महिला सक्षमीकरण आणि लैंगिक समानता सेल तसेच अनंतपाळ महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांचे आरोग्य आणि स्वच्छता या विषयावर जागरूकता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेच्या माध्यमातून महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांवर प्रकाश टाकण्यात आला, तसेच स्वच्छतेचे महत्त्व समजावण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. अरुण धाळगडे यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून सेवाभावी संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. सई देवंग्रे यांनी उपस्थित महिलांना आणि विद्यार्थिनींना दैनंदिन जीवनातील आरोग्यसंबंधी काळजी कशी घ्यावी यावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्निकिता लोहार हिने तर आभार प्रदर्शन डॉ. मलिकार्जुन वाकडे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर डॉ. जयश्री शिंदे, सुनीता जाधव, डॉ.डी.के. धुमाळे, आणि आक्यूएसी समन्वयक डॉ. सतीश कुंडलवार यांची उपस्थिती होती.

# औसा बाजार समितीत शेतकरी भवनास प्रशासकीय मंजुरी

▶▶ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज योजनेंतर्गत लाभ... ▶▶ ४ कोटी १५ लाख रुपयातून उभारणार भवन...




**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२० जुलै -**

औसा बाजार समितीत शेतकरी भवन बांधण्यास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असून आ. अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे.सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा. भिमाशंकर राचट्टे, सचिव संतोष हुच्चे, संचालक व व्यापाऱ्यांनी शासनाकडून मिळालेल्या मंजुरीचे एकमेकांना पेढे भरवून स्वागत केले आहे. महाराष्ट्र सरकार व औसा बाजार समिती यांच्या भागीदारीतून, ४ कोटी १५ कोटी रुपये खर्चून अत्यंत देखणे शेतकरी भवन सर्वसोयी युक्त औशात उभारले जाणार आहे.

आमदार अभिमन्यू पवार यांच्या नेतृत्वाखाली औसा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने पदभार स्विकारल्यापासून औसा बाजार समितीच्या सर्वांगीण विकासासाठी व बाजार समितीला मराठवाड्यातील सर्वोत्तम बाजार समिती म्हणून नावारूपास आणण्यासाठी अत्यंत नियोजनबद्धपणे काम केले जात आहे. मागच्या तीन वर्षांमध्ये शेतमालाची आवक आणि बाजार समितीचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. दररोज शेकडो शेतकरी बाजार समितीत कष्टाने काढलेला शेतमाल घेऊन येतात.

औसा बाजार समितीत येणाऱ्या शेतकऱ्यांना सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही बाजार समितीची जबाबदारी आहे. याच जबाबदारीच्या भावनेतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेअंतर्गत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती असलेल्या ठिकाणी शेतकरी बांधवांना मुक्कामाची सोय व्हावी. तसेच शेतकऱ्याच्या मूलभूत सुविधा देखील त्याच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात. या दृष्टीने औसा बाजार समितीने नव्याने शेतकरी भवन बांधण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.या प्रस्तावास आमदार पवार यांच्या पाठपुराव्याने व शासकीय वाट्याच्या तरतुदीसह औसा बाजार समितीत शेतकरी भवन बांधण्यास प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. महाराष्ट्र सरकार व औसा बाजार समिती यांच्या भागीदारीतून, ४.१५ कोटी रु. खर्चून अत्यंत देखणे असे शेतकरी भवन आपल्या औसात उभारले जाणार आहे.

आमदार अभिमन्यू पवार यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा. भिमाशंकर राचट्टे, सचिव संतोष हुच्चे व संचालक मंडळाची भक्कम साथ मिळत असल्याने औसा बाजार समिती अंतर्गत शेतकऱ्यांच्या दृष्टीने अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. पारदर्शक कारभारातून औसा बाजार समितीने आपला उत्तम कामाचा ठसा उमटविला आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेअंतर्गत औसा बाजार समितीत शेतकरी भवन बांधकाम करण्यास प्रशासकीय मंजुरी मिळाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, पालकमंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले व आ. पवार यांचे आभार मानले आहेत.

### शेतकऱ्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणार : आ. अभिमन्यू पवार

औसा बाजार समितीला दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची पूर्तता करण्याचे काम सुरू आहे. बाजार समिती अंतर्गत सिमेंट रस्ते, शौचालय आदी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम केले गेले आहे. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देत असताना पारदर्शक कारभारातून बाजार समिती प्रगती साधत आहे, असे मत आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केले.

## औसा बसस्थानकाने पटकावला मराठवाड्यात पहिला, राज्यात दुसरा क्रमांक

▶▶ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत गौरव...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२० जुलै -**

मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी २५ वर्षांचा व्हिजन ठेवून कार्यरत असलेल्या आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नातून औसा शहरात नव्याने उभारण्यात आलेल्या बसस्थानकाने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानात राज्यात दुसरा आणि मराठवाड्यात पहिला क्रमांक पटकावला आहे.

या अभियानांतर्गत राज्यभरातील 'अ' वर्गवारीतील बसस्थानकांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. यामध्ये औसा बसस्थानकाने आपली योजना, रचना, स्वच्छता आणि सेवा सुविधांमुळे आदर्श निर्माण करत संपूर्ण राज्यात दुसरा क्रमांक मिळवला आहे. औसा बसस्थानकाने बारामतीच्या खालोखाल ही गौरवाची पायरी गाठली आहे.



औसा डेपोच्या व्यवस्थापनाने बसस्थानक केवळ बांधून न थांबता त्याची देखभाल, स्वच्छता आणि सेवा गुणवत्ता याकडे सातत्याने लक्ष दिले. त्यामुळेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या या मान्यतेत औसाने अग्रस्थान मिळवले आहे.

याच अभियानांतर्गत 'क' वर्गवारीतील बसस्थानकांमध्ये लामजना बसस्थानकाने मराठवाड्यात तिसरा क्रमांक मिळवला आहे. औसा, लामजना आणि कासार सिरसी येथील बसस्थानकांसाठी निधी उपलब्ध करून त्यांची प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करत, गुणवत्ता व दर्जा राखून ती कार्यान्वित करण्यात आली.

या यशाबद्दल आमदार अभिमन्यू पवार यांनी औसा डेपोचे व्यवस्थापक आणि सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करताना म्हटले की, हे पारितोषिक त्यांच्या मेहनतीचे फलित आहे. त्यांच्या योगदानामुळे औसा शहराचे नाव संपूर्ण राज्यात उंचावले आहे. प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या दर्जेदार व स्वच्छतेच्या सेवा हीच खरी ओळख बनली आहे.

या यशामुळे औसेकरांच्या दैनंदिन प्रवासाच्या सुविधा सुसज्ज झाल्या असून, शहराच्या विकासात एक महत्त्वाची भर पडली आहे.

## शिवसेनेची संघटनात्मक बैठक संपन्न

**आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आढावा, संघटन बांधणीवर भर...**

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२० जुलै -**

शिवसेनेचे मुख्य नेते व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री सन्माननीय एकनाथराव शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार, तसेच शिवसेना सचिव संजय मोरे, उपनेते आनंदराव जाधव, मराठवाडा विभागीय सचिव अशोकराव पटवर्धन, जिल्हा संपर्कप्रमुख बालाजीराव काकडे आणि महिला आघाडीच्या जिल्हा संपर्कप्रमुख रंजना कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर अनंतपाळ तालुक्यात प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली.

ही बैठक दि.१८ जुलै रोजी शिरूर अनंतपाळ येथे झाली. अध्यक्षस्थानी लातूर जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने होते. बैठकीत शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीसह आगामी निवडणुकांसाठी पक्षाची तयारी, सक्रिय सदस्य नोंदणी, गावपातळीवरील शाखा विस्तार यावर सविस्तर चर्चा झाली.

या प्रसंगी जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने म्हणाले,



शिवसेनेची घोडदौड दिवसेंदिवस वाढत असून, हा पक्षवाढीचा वेग हे एकनाथ शिंदे यांच्या जनहितवादी निर्णयांचे फलित आहे. त्यांनी मुख्यमंत्री म्हणून अडीच वर्षांच्या कार्यकाळात जे ऐतिहासिक निर्णय घेतले, ते सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून घेतले गेले. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेने महायुतीच्या बाजूने कौल दिला.

बैठकीस निलंगा विधानसभा प्रमुख सोमनाथ स्वामी डिगोळकर, तालुकाप्रमुख विकास शिंदे, भास्करराव कुलकर्णी, ॲड. वर्षा शिंदे, मुरलीधर शिंदे, मन्मथ सुगावे, विनोद धुमाळे, सुप्रिया सांगोले, धनराज माने, शुभम शेरखाने, तुषिकांत सांगोले, रविशंकर शिवणे, मुकंदर, पांडुरंग शिंदे आदींसह असंख्य शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

## भंगार चिंचोली येथे महिलांसाठी रोजगार प्रशिक्षण शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२० जुलै -**

निलंगा तालुक्यातील मौजे भंगार चिंचोली येथे स्वयंम शिक्षण प्रयोग संस्था, लातूर आणि ॲक्सिस बँक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी पाच दिवसीय शेतीपूरक व्यवसाय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

स्वयंम शिक्षण प्रयोग ही संस्था सन १९९३ पासून कार्यरत असून देशातील सात राज्यांतील ३२ जिल्ह्यांमधील ३ हजार २७४ गावांमध्ये या संस्थेचे कार्य सुरु आहे. आतापर्यंत सुमारे ६० लाख महिलांना विविध प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ३ लाख ५० हजार महिलांनी या प्रशिक्षणाच्या आधारे रोजगार मिळवला आहे.

निलंगा तालुक्यातील १०० गावांमध्ये ॲक्सिस बँक फाउंडेशनच्या सहाय्याने प्रशिक्षण प्रकल्प राबवला जात आहे. याच अंतर्गत भंगार चिंचोली येथे आयोजित शिबिरात महिलांना शेतीला पूरक व्यवसाय जसे की दुग्ध व्यवसाय, शेळी पालन, कुक्कुटपालन याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणामध्ये डॉ. प्रसाद कदम यांनी प्रात्यक्षिकांसह जनावरांचे लसीकरण, चारा नियोजन, गोठा व्यवस्थापन आदी विषयांवर मार्गदर्शन केले. प्रकल्प समन्वयक दीपक लांडगे यांच्या देखरेखीखाली निलंगा, औसा आणि देवणी या तीन तालुक्यांमध्ये सदर उपक्रम राबवण्यात येत आहे.

सुनील काळुंके यांनी स्वयंम शिक्षण प्रयोग संस्थेच्या कार्याची तसेच प्रकल्पाअंतर्गत चालणाऱ्या विविध प्रशिक्षण उपक्रमांची माहिती दिली.

## तालुका, जिल्हा क्रिडा स्पर्धेपुर्व शिवलिंगेश्वर फार्मसीत बैठकीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२० जुलै -**

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील तालुका व जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धेच्या नियोजनासाठी औसा तालुक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीत जिल्हा क्रिडा अधिकारी महादेव कसगावडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, तालुका क्रिडा अधिकारी जयराज कसबे, विस्तार अधिकारी गोविंद राठोड, क्रीडा मार्गदर्शक चंद्रकांत लोदगेकर, क्रीडा अधिकारी कैलास लटके, कृष्णा केंद्रे, बाळासाहेब इंगोले, तालुका क्रिडा समन्वयक रंगनाथ आंबुलगे, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कुलच्या प्राचार्या स्वाती कापसे, क्रीडा शिक्षक मंजुरपाशा शेख इत्यादी उपस्थित होते.



औसा तालुक्यातील विविध क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत सविस्तर चर्चा करुन आश्रमशाळा देवताळा येथे कबड्डी, जिल्हा परीषद प्राथमिक शाळा लामजना येथे मैदानी स्पर्धा, श्री रामनाथ विद्यालय आलमला येथे- खो-खो, कुस्ती, योगा व बॅडमिंटन, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कुल आलमला येथे-क्रिकेट, श्री नेताजी विद्यालय शिंदाळा येथे बुध्दीबळ, श्री हनुमान विद्यालय शिवली येथे व्हॉलीबॉल व ईमॅन्युअल पब्लीक स्कुल, दापेगाव येथे फुटबॉल इत्यादी ठिकाणी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच यामध्ये काही बदल वेळेनुसार करण्यात येतील असे सांगण्यात आले.

या बैठकीत जिल्हा क्रिडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी मार्गदर्शन केले तर प्रास्ताविक महादेव खिचडे यांनी केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सावंत सर आणि आभार कैलास लटके यांनी मानले.

## धाराशिवमध्ये वाहतूक पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जुलै -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलिस ठाण्यांनी १९ जुलै रोजी मोटार वाहन कायद्या अंतर्गत नियमभंग करणाऱ्या वाहन चालक- मालका विरोधात ३०४ कारवाया करून एकूण २ लाख ५६ हजार ४०० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल केले आहे.

या कारवाहीत धाराशिव शहर व तालुक्यातील वाहतुक पोलिसांचे सहकार्य लाभले.

## म्हेत्रे वमोदाळे यांचा लोकजागृती शिक्षण संस्थेच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२० जुलै -**

लोकजागृती शिक्षण संस्था, वलांडी अंतर्गत कार्यरत असलेल्या घटक शाळांमधून प्रदीर्घ सेवा करून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या लिपिक बाबुराव राजाराम म्हेत्रे (तळेगाव, वलांडी, देवणी शाळा) व सेवक भागवत मोदाळे (श्री व्यंकटेश विद्यालय, वलांडी) यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा नुकताच श्री व्यंकटेश विद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात अत्यंत उत्साहात पार पडला.

या गौरव सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून लोकजागृती शिक्षण संस्थेचे सचिव भगवानदादा पाटील तळेगावकर, संस्थाध्यक्ष व्यंकटराव पाटील वलांडीकर, उपाध्यक्ष अण्णाराव पाटील, सहसचिव नागोराव भोसले, कोषाध्यक्ष शंकरराव पाटील, चेअरमन



भरतभाऊ चामले, बाजार समिती सभापती सदाशिव पाटील, पोलिस पाटील संभाजी पाटील, पतसंस्थेचे चेअरमन तानाजीभैय्या पाटील यांच्यासह संस्थेचे संचालक मंडळ, आजी-माजी पदाधिकारी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात प्राचार्य नंदकुमार पटवारी, डॉ. रामरतन शिंदे, माधव मांजिबाळे, मुख्याध्यापक राजकुमार बिरादार, शाम हरमुंजे, वागंबर कांबळे, विनायकराव पाटील, पर्यवेक्षक दत्ताजी अचवलकर व रणजित पाटील यांनी उपस्थित राहून दोन्ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ, सन्मानपत्र आणि भेटवस्तू देऊन यथोचित गौरव केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वास आळंदीकर यांनी तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक रणजित पाटील यांनी केले.

## महाराष्ट्र महाविद्यालयातील एनसीसी विद्यार्थ्यांची यशाची परंपरा कायम



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२० जुलै -**

निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयातील एनसीसी विभागाने यंदाही आपली यशाची परंपरा कायम ठेवत बी व सी सर्टिफिकेट परीक्षेत शंभर टक्के निकालाची नोंद केली आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचा आणि शिस्तप्रियतेचा हा परिपाक असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमात करण्यात आले.

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय छात्र सेनेद्वारे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या बी आणि सी सर्टिफिकेट परीक्षेत यावर्षी महाराष्ट्र महाविद्यालयातील १६ विद्यार्थ्यांनी बी सर्टिफिकेट तर १५ विद्यार्थ्यांनी सी सर्टिफिकेट परीक्षा दिली होती. विशेष म्हणजे सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व प्रमाणपत्र वितरण समारंभ महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. गायकवाड होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून निलंगा पोलीस स्टेशनचे एपीआय सदा वाघमारे आणि ५३ महाराष्ट्र बटालियनचे हवालदार सुनील काळे व हवालदार शिवाजी होळकर उपस्थित होते.

उपप्राचार्य डॉ. प्रशांत गायकवाड, डॉ.डी.एस. चौधरी, एनएसएस कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही.पी. सांडूर आणि एनसीसी अधिकारी डॉ.एस.पी. बसुदे यांनीही आपली उपस्थिती व मार्गदर्शन कार्यक्रमात दिले. प्रास्ताविक डॉ. बसुदे यांनी केले.

## शिरूर अनंतपाळ तालुक्यासाठी नाफेड खरेदी केंद्र व शेतकरी भवनासाठी पाठपुरावा

**शिरूर अनंतपाळ, दि.२० जुलै -**

शिरूर अनंतपाळ तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने काम करणारे, आमदार संभाजी पाटील-निलंगेकर यांचे एकनिष्ठ व शेतकरी हितासाठी लढणारे कार्यकर्ते गोविंद चिलकुरे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह मुंबई येथे आ. निलंगेकर यांची भेट घेतली. त्यांनी विविध विकास कामांबाबत चर्चा करून त्यांच्या मार्गदर्शनानुसार पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या. या भेटीतकृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून नाफेड हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यास परवानगी देण्यात यावी, तसेच बाजार समितीच्या आवारात शेतकरी भवन बांधण्यासाठी निधी मंजूर करावा, या दोन मुख्य मागण्या करण्यात आल्या.

## बोरवेलच्या पाईपची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जुलै -**

कोल्हेगाव शिवारातील शेतातून बोरवेलच्या मोटारीचे ३४ पाईप अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अशोक बळीराम साठे (वय ४५, रा. देवळाली) यांच्या फिर्यादीवरून ढोकी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३७९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरीची घटना १८ ते १९ जुलैदरम्यान घडली असून, पुढील तपास सुरू आहे.

# शेतकऱ्यांना दिवसा वीज देणार : आ. संजय बनसोडे

▶▶ 'शेतकरी भवन'साठी पाच कोटींचा निधी मंजूर करण्याची ग्वाही...

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२० जुलै -**

शेतकरी हा देशाचा कणा असून त्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध आहोत, असे स्पष्ट करत माजी मंत्री आणि आमदार संजय बनसोडे यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी दिवसा वीज देण्यासाठी मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जा प्रकल्प राबवले असून डिसेंबर २०२६ पर्यंत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळेल, अशी ग्वाही दिली. उदगीर शहरातील आडत व्यापारी वेल्फेअर असोसिएशन व सर्व व्यापाऱ्यांच्या वतीने आयोजित सत्कार व परुषा कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमात माजी आमदार गोविंदराव केंद्रे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी नगराध्यक्षा उषा कांबळे, प्रा. शाम डावळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले पाटील, कार्याध्यक्ष वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, सागर महाजन, शिवकुमार गुळंगे, कल्पेश बाहेती, भाजपा शहराध्यक्ष अमोल अनकले यांच्यासह विविध पक्षांचे नेते, व्यापारी, हमाल बांधव आणि नागरीक उपस्थित होते. आपल्या भाषणात



आ. बनसोडे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी देण्यासाठी वीजेअभावी अडचणींचा सामना करावा लागू नये म्हणून मतदारसंघात सौर ऊर्जेचे अनेक प्रकल्प कार्यान्वित केले आहेत.

यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार आहे.

तसेच त्यांनी पुढे सांगितले की, शेतकरी भवनासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करून उभारणी केली जाईल. याशिवाय हमाल बांधवांसाठी स्वतंत्र योजना, तिरु बॅरेजसारखी पाणीसाठा व्यवस्था, आणि इतर पायाभूत सुविधांचा विकास सुरूच राहील. माजी मंत्र्यांनी त्यांच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात प्रशासकीय इमारत, शासकीय विश्रामगृह, छत्रपती शिवाजी महाराज भवन, शादी खाना, अण्णाभाऊ साठे सभागृह, बसस्थानक, पाणीयोजना, पानंद रस्ते, सीसी रस्ते आदींसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी दिल्याचे सांगितले.

या कार्यक्रमात अनेक व्यापारी, नागरीक, व हमाल बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत माजी मंत्र्यांच्या कार्याचे कौतुक केले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होणार स्टेडीयमचे भूमीपूजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जुलै -**
मराठवाड्यासाठी भव्य अशा विभागीय स्टेडीयमला मान्यता पूर्वीच मिळाली असून या कामाची टेंडर प्रक्रीयाही पूर्ण झाली असून सदरील विभागीय स्टेडीयम कव्हा येथेच करण्याचा व ३१ मे २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश उच्च न्यायालय, छत्रपती संभाजीनगर यांनी दिल्यामुळे शासनाने पहिल्या टप्प्यात २५ कोटीचा निधी दिलेला आहे. विभागीय स्टेडियमचे काम १०० कोटीपेक्षा अधिक रूपयाचे २६ एकर जमिनीमध्ये होणार आहे.

याबरोबर एनआरएचएम अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र कव्हा येथे करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष बाब म्हणून मान्यता देण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस केली होती. त्याप्रमाणे केद्रीय मंत्री जे.पी.नड्डा यांनी त्यास साडेआठ कोटीची मान्यता दिली असून अतिभव्य असे हॉस्पिटल व मेडिकल ऑफीससह १५ कर्मचाऱ्यांचा स्टाफ, मेडिकल ॲम्बूलंन्स व वैद्यकीय साहित्य मंजूर करून कार्यान्वित केले आहे. याबरोबरच तावरजा नदीवर बॅरेज कव्हा शिवारात उभारण्याची मान्यता पाटबंधारे विभागाने दिलेली आहे. त्याचे भूमिपूजन ना.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते होणार आहेत. ना.शिवेंद्रराजे भोसले हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे मामा, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर, आ.संभाजीराव पाटील निलंगेकर, आ.संजय बनसोडे, आ.अभिमन्यू पवार, आ.रमेश कराड, आ.विक्रम काळे, बसवराज पाटील मुरूमकर, भाजपाचे मराठवाडा समन्वयक संजय कोंडगे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत अशी माहिती माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेंकर यांनी दिली आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## मनपा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रेबीज प्रतिबंधक लस उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जुलै -**
लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रेबीज प्रतिबंधक लस उपलब्ध करून देण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी दिले होते . त्यानुसार मनपा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रेबीज प्रतिबंधक लस उपलब्ध करण्यात आली आहे.
शहरातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र इंडिया नगर, तावरजा कॉलनी, मंठाळे नगर, गौतमनगर व प्रकाशनगर येथील आरोग्य केंद्रामध्ये सदरील लस विनामूल्य उपलब्ध आहे. श्वानानी चावा घेतल्यानंतर रेबीज या रोगापासून बचाव होण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आणि त्यासोबत रेबीज प्रतिबंधक लस घेणे अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे लातूर शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही प्राण्यांनी चावा घेतल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष करू नये, अशावेळी झालेली जखम भरपूर प्रमाणामध्ये साबणाचा वापर करून नळाखालील वाहत्या पाण्याचा वापर करून स्वच्छ धुवावी आणि आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत असणाऱ्या जवळच्या आरोग्य केंद्रामध्ये जाऊन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार रेबीज प्रतिबंधात्मक लस घ्यावी. तरी लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत वरील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रेबीज प्रतिबंधक लस विनामूल्य उपलब्ध असून गरजू रुग्णानी या सेवेचा लाभ घ्यावा असे आव्हान मनपा प्रशासनाने केले आहे.

## प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती स्वच्छता विभागाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जुलै -**
लातूर शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने गंजगोलाई येथे सिंगल यूज प्लास्टिक बंदी ची जनजागृती करण्यात आली. मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या आदेशानुसार व उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या उपस्थितीत स्वच्छता विभागाने जनजागृती करण्यात आली.
यावेळी उपस्थित नागरिकांना सिंगल यूज प्लास्टिक न वापरण्याची व त्याचे पर्यावरणावर व मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम यांची माहिती देण्यात आली . तसेच भाजीपाला विक्रेत्यांना व ग्राहकाना कापडी पिशव्या देवून त्यांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले . महापालिकेकडून प्रतिबंधित प्लास्टिक बंदीच्या अंमलबजावणीसाठी सातत्याने उपाययोजना राबविण्यात येत असून, अनधिकृतरित्या प्लास्टिक साठवणाऱ्या व विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात आहे. सिंगल यूज प्लास्टिक बंदी असून येत्या काळात आस्थापनांवर धडक कार्यवाही करण्यात येणार असून ही मोहीम अधिक तीव्र करण्याचे निर्देश उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी सर्व स्वच्छता निरीक्षक याना दिले आहेत .तसेच प्लास्टिकमुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळावा, असे आवाहन देखील उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.. यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख पिडगे , मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे, अक्रम शेख यांच्या सह स्वच्छता कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## दयानंद महाविद्यालयात आनंददायी उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जुलै -**
दयानंद कला महाविद्यालयात प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत कथेतून अध्यापन या अनुषंगाने मभगवान गौतम बुद्ध : एक आनंद यात्राफ या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत भगवान बुद्धांच्या जीवनाचा प्रेरणादायी प्रवास उलगडून दाखवला.

डॉ. नागरगोजे यांनी सांगितले की, इसवी सन पूर्व ५६३ मध्ये भगवान बुद्धांचा जन्म राजा शुद्धोधन आणि राणी महामाया यांच्या पोटी झाला. लहानपणीच आईचे निधन झाले. मात्र एके दिवशी त्यांनी वृद्ध, रोगी आणि मृत व्यक्ती पाहिल्यानंतर त्यांना मानवी जीवनातील दुःखाची तीव्र जाणीव झाली. ही जाणीव त्यांच्या अंतर्मनाला भिडली आणि त्यांनी संसाराचा त्याग करून तपश्चर्या सुरू केली. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञान आणि प्रेरणा देणारा ठरला. यावेळी अनेका प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

# चुकीचे इंजेक्शन घेत तरुणाने मरणाला कवटाळले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जुलै -**
शहरातील बार्शी रोडवरील एका - खासगी रुग्णालयात काम करणाऱ्या २९ वर्षीय तरुणाने आपल्या वडिलांना मी आज घरी येणार नाही, रुग्णालयात झोपणार आहे, असे सांगितले. रात्री चुकीचे इंजेक्शन घेत मरणाला कवटाळल्याची घटना शनिवारी सकाळी १० वाजण्याच्या समोर आली. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी सांगितले, हासेगाव (ता. औसा) येथील बळीराम सुधाकर लाळे हा लातुरातील बार्शी रोडवर असलेल्या एका खासगी रुग्णालयात काम करत होता. दरम्यान, रात्री वडिलांना फोन करुन त्याने सांगितले.

मी आज घरी येणार नाही, रुग्णालयातच झोपणार आहे. त्यानंतर पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास त्याने स्वतः कुठलेतरी चुकीचे इंजेक्शन घेतले आणि झोपी गेला. सकाळी १० वाजले तरी तो उठला नाही. त्यामुळे रुग्णालयातील इतरांनी त्याला उठवण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो कुठलाही प्रतिसाद देत नव्हता. दरम्यान, याबाबतची माहिती एमआयडीसी पोलिस ठाण्याला देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेहाचे शवविच्छेदन लातूर येथील शासकीय रुग्णालयात करण्यात आले.

याबाबत मयत तरुणाचे वडिल सुधाकर शंकर लाळे (वय ५५ रा. हासेगाव) यांनी दिलेल्या माहितीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात शनिवारी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलिस अमलदार दयानंद आरदवाड हे करीत आहेत.

मयत बळीराम याचा दोन वर्षांपूर्वीच विवाह झाला होता. त्याला ८ महिन्याचे मूल आहे. तो लातुरातील एका खासगी रुग्णालयात काम करुन आपला उदनिर्वाह भागवित होता.

त्याने स्वतः इंजेक्शन का घेतले? याचा तपास पोलिस करीत आहेत. शेवटचा कॉल हा त्याने वडिलांना केला असल्याचेही पोलिसांनी सांगितले.

कोणत्या कारणामुळे त्याने हे टोकाचे पाऊल उचलले, याचा शोध पोलिस घेत आहेत.

**इंजेक्शन घेतल्याचे सीसीटीव्हीत दिसून आले; पोलिसांकडून तपास**

पहाटे वाजण्याच्या सुमारास तो स्वतः इंजेक्शन घेत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येत आहे. ही घटना पहाटे ३ ते सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान घडली. बळीराम या तरुणाने असे का केले? याचा तपास आम्ही करीत आहोत. चुकीचे इंजेक्शन घेत त्याने आत्महत्या केल्याचे समोर आले आहे अशी माहिती पोलीस निरीक्षकांनी दिली आहे.

## गुणवंत विद्यार्थी गौरव व शिष्यवृत्ती प्रदान सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जुलै -**
श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्था अंतर्गत आठ शाळांमधून दहावी बोर्ड परीक्षा तसेच पाचवी व आठवी स्कॉलरशिप मध्ये मेरिट आलेल्या गुणवंतांचा गुणगौरव पुरस्कार सोहळा लातूरचे नुतन पोलिस उपाधिक्षक अरविंद रायबोले यांच्या हस्ते दयानंद सभागृहात संपन्न झाला.

संस्थाअंतर्गत सर्व आठ शाळांमधील दहावी बोर्ड परीक्षेत ९५% हून अधिक गुण प्राप्त केलेली गुणवंत विद्यार्थी तसेच ५वी व ८वी स्कॉलरशिप स्पर्धेत मेरिट आलेले, इयत्ता ४थी व ९वी मध्ये शाळेत प्रथम आलेल्या गुणवंतांचा सत्कार संस्थेमार्फत करण्यात आला. गुणवंतांना रौप्यपदक प्रशस्तीपत्र तसेच रोख रकमा देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी सर्व शाळांमधील इयत्ता १०वी मध्ये शिकणारे सर्व पाल्य त्यांचे पालक तसेच संस्थेअंतर्गत शाळातील सर्व गुरुजन उपस्थित होते.

संस्थेचे सचिव आशिष बाजपाई यांनी प्रास्ताविकातून संस्थेने सर्व शाळांना दिलेल्या भौतिक सुविधा तसेच आगामी काळात संस्थेने विद्यार्थ्यांसाठी काय योजना आखल्या आहेत याची विस्तृत माहिती दिली. संस्था अध्यक्ष यांनी आपल्या मनोगतातून गुणवंतांना शुभेच्छा दिल्या नवनवीन शैक्षणिक आव्हाने मुलांनी कशी आत्मसात करावी याविषयीचे मार्गदर्शन पालकांना मुलांना दिले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जे कालच लातूरला डीवायएसपीचा पदभार स्वीकारण्यासाठी आले होते त्यांनी मुलांना व पालकांना शिक्षण पद्धतीतील बदल व त्याला कसे सामोरे जावे याची कल्पना दिली. ऑनलाइन गेम , सायबर गुन्हे कसे होतात त्यासाठी पोलीस विभाग कसे कार्य करतो कसे मदत करतो व हे गुन्हे न होण्यासाठी पालकांनी व मुलांनी काय करावे याचे मार्गदर्शन देखील दिले.

मुलांना मोबाईल वापरण्याचे धोके त्यांनी सोप्या भाषेत समजून सांगितले. अभ्यास कसा करावा व नोकरीसाठी कोणकोणती क्षेत्र आहेत त्याची त्यांनी समर्पक माहिती मुलांना व पालकांना दिली.

याप्रसंगी संस्थेच्या मारवाडी राजस्थान विद्यालयाच्या मुलींच्या चमूने सुंदर असे प्रेरणागीत सादर केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्रकुमार मालपाणी, आशिष बाजपाई, ईश्वर प्रसाद डागा त्यांनी देखील गुणवंतांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी संस्थेअंतर्गत सर्व शाळांचे शालेय समितीचे अध्यक्ष, मुख्याध्यापक हेही उपस्थित होते. गोविंद प्रसाद चांडक यांनी त्यांच्या पत्नीच्या नावाने गोदावरी देवी लाहोटी कन्या विद्यालयात देणगी देऊन त्यातून मुलींसाठी कलादालन विकसित झाले त्याबद्दल त्यांचा सत्कार रायबोले यांच्याकडून झाला. कार्यक्रमाचे आभार संस्थेचे उपसहसचिव श्री लक्ष्मीकांत कर्वा यांनी केले तर सूत्रसंचालन श्रीमती योगिता संधीकर व श्री आनंद कुलकर्णी यांनी केले.

## नंदनवन नागरी बेघर निवारास आयुक्तांची भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जुलै -**
लातूर शहर महानगरपालिका, नंदनवन नागरी बेघर निवाऱ्यास मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी शुक्रवारी भेट देऊन पाहणी करून सूचना केल्या. निवा-यामध्ये वास्तव्यास असणाऱ्या लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती घेतली. तसेच येथे आणखीन काही आवश्यक सुविधा देण्याबाबत चर्चा केली.



लातूर शहर महानगरपालिका, केंद्र शासन पुरस्कृत, दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान नागरी बेघरांसाठी निवारा घटका अंतर्गत शहरातील बेघर नागरिकांसाठी बस स्थानक, रेल्वे स्टेशन , फुटपाथ, सार्वजनिक ठिकाणे, धार्मिक स्थळे, कारखाना व कंपनी परिसर, रस्त्याच्या कडेला, पुलाखाली, बांधकाम साईट, मंदिर मस्जिद अशा ठिकाणी आश्रय घेणारे वृद्ध, अपंग, भिकारी, बालके, महिला, आजारी व्यक्ती, निराश्रित व्यक्ती, बेवारस आणि ज्यांना पूर्णतः उघड्यावर आश्रय घ्यावा लागतो अशा लोकांसाठी ठाकरे चौक येथे नंदनवन नागरी बेघर निवारा सुरु करण्यात आला आहे.


येथे बेघर बांधवांसाठी चहा, नाश्ता, जेवण, आरोग्य तपासणी अशा सुविधा देण्यात येते. या निवा-यामध्ये पुरुष कक्ष, महिला कक्ष व दिव्यांग कक्ष अशी वेगवेगळी राहण्याची सोय करण्यात आली आहे. सदरील निवारा हा सी. सी. टी. व्ही. च्या निगराणीखाली असून याचे देखभाल व सनियंत्रण सलात अल्पसंख्यांक बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून करण्यात येत आहे. येथे वास्तव्यास असलेल्या बेघर बांधवांपैकी कोणी आजारी असेल तर त्यांना शासकीय रुग्णालयामध्ये मोफत वैद्यकीय उपचार उपलब्ध करून दिले जाते.

तरी शहरातील नागरिकांनी शहरामध्ये बेघर नागरिक आढळून आल्यास त्यांना नंदनवननागरी बेघर निवारा, ठाकरे चौक, झोन कार्यालयाशेजारी विवेकानंद हॉस्पिटलच्या पाठीमागे किंवा ९९२३४५३६५७, ८५०२०३२११ या नंबर वर संपर्क करावे जेणेकरून अशा बेघर नागरिकांना सुरक्षितपणे नागरी बेघर निवारा येथे आश्रय घेता येईल. असे आवाहन महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

## ग्रामपंचायत इमारतींसाठी सव्वा कोटीचा निधी मंजूर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जुलै -**
लातूर ग्रामीण मतदारसंघातील कामखेडा, चिंचोली (ब.), चिंचोलीराववाडी, गातेगाव आणि गाधवड या पाच ग्रामपंचायतींच्या नवीन इमारत बांधकाम व नागरी सुविधा केंद्र खोली बांधकामासाठी प्रत्येकी २५ लाख रुपये याप्रमाणे सव्वा कोटी रुपयांचा निधी भाजपचे नेते आमदार रमेश कराड यांच्या प्रयत्नातून ग्रामविकास विभागाने मंजूर केला आहे.



लातूर ग्रामीण मतदारसंघातील विविध गावांतील ग्रामपंचायतींच्या सुसज्ज इमारती उभ्या रहाव्यात यासाठी आमदार रमेश कराड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे पाठपुरावा केला. याला यश आले असून, १८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील १७ ग्रामपंचायत नवीन इमारत बांधकामासाठी शासनाने मंजुरी दिली आहे. त्यात लातूर ग्रामीण मतदारसंघातील ५ ग्रामपंचायतींचा समावेश असून, या ग्रामपंचायतींना प्रत्येकी २५ लाख रुपये याप्रमाणे सव्वा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सदरील निधीत केंद्र शासनाचे ६० टक्के आणि राज्य शासनाचे ४० टक्के प्रमाण आहे. ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी निधी मंजूर करून दिल्याबद्दल आमदार रमेश कराड यांचे सरपंच, उपसरपंचासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात काँग्रेसची निदर्शने

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जुलै -**
राज्य शासनाने संमत केलेल्या जनसुरक्षा कायद्यातील तरतुदी ह्या लोकशाही प्रणालीविरुध्द आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या स्वातंत्र्याची व नागरी हक्कांची पायमल्ली होणार आहे, असे म्हणत काँग्रेसच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हातात फलक घेऊन निदर्शने करण्यात आली.




माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूर जिल्हा बँकेचे चेअरमन माजी आमदार धीरज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा दिल्या. त्यानंतर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांना जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात निवेदन देण्यात आले. जनसुरक्षा विधेयक सरकारने मागे घ्यावे अन्यथा त्याविरुध्द काँग्रेस पक्ष आक्रमकपणे जनआंदोलन उभारेल, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी काँग्रेसचे प्रदेश सचिव अभय साळुंके, शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, गोरोबा लोखंडे, दगडू मिटकरी, माजी उपमहापौर कैलास कांबळे, ॲड. फारुख शेख, प्रा. सुधीर अनवले, प्रा. प्रवीण कांबळे, सुंदर पाटील, इमरान सय्यद, सहदेव मस्के, व्यंकटेश पुरी, सिकंदर पटेल, नागसेन कामेगावकर, हमीद बागवान, इसरार सगरे, ॲड. विजय गायकवाड, यशपाल कांबळे, व्यंकट पुरी, जालिंदर बर्डे, संजय ओव्हाळ, असलम शेख, जी. ए. गायकवाड, भाऊसाहेब भडीकर, अशोक सूर्यवंशी, राजू गवळी, राहुल डुमणे, अजय वागदरे, श्रीकांत गर्जे, शैलेश भोसले, नितीन कांबळे, ॲड. गणेश कांबळे, पवनकुमार गायकवाड, राजकुमार माने, किरण बनसोडे, राजाभाऊ गायकवाड, अभिजित इगे, अकबर माडजे, पिराजी साठे, युनूस शेख, सोमेन वाघमारे, करुणा शिंदे, भास्कर शिंदे, अभिषेक देशमुख, रामराजे जाधव, अविनाश बट्टेवार, बाबा शेख, काशिनाथ वाघमारे यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आगामी पालिका निवडणुकीसाठी सज्ज राहा

### दिलीपराव देशमुख यांचे काँग्रेस पदाधिकाऱ्यांना आवाहन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जुलै -**
आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाचे पक्ष संघटन, जनसंपर्क, आपण केलेल्या विकासकामांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी कार्य करावे. त्यासाठी आतापासून पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केले आहे.

लातूर शहर काँग्रेसच्यावतीने आगामी काळात होणाऱ्या महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने नियुक्त केलेले नूतन झोन अध्यक्ष यांनी 'आशियाना' निवासस्थानी शुक्रवारी दिलीपराव देशमुख यांची भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी झोन 'अ'चे अध्यक्ष ॲड. फारुक शेख, झोन 'ब'चे अध्यक्ष माजी उपमहापौर कैलास कांबळे, झोन 'क'चे अध्यक्ष सूर्यकांत कातळे यांनी दिलीपराव देशमुख यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले.यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने सूचना दिल्या. तसेच वॉर्डात जनसंपर्क बैठका घेऊन नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत.

काँग्रेसची भूमिका व आपल्या माध्यमातून शहरात ठिकठिकाणी जी विकासकामे झाली आहेत, जी विकासकामे राहिली आहेत, यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पाठपुरावा करावा. त्यासाठी आतापासून कामाला लागावे, असे आवाहन केले. यावेळी शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव, माजी महापौर ॲड. दीपक सूळ, धोंडीराम यादव, प्रा. प्रवीण कांबळे, व्यंकटेश पुरी, इसरार सगरे आदी उपस्थित होते.

## शहरातील केशवराज विद्यालयात वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जुलै -**
येथील श्री केशवराज विद्यालयात विस्तार सेवासमिती अंतर्गत वृक्षारोपण - वृक्षसंवर्धन , प्लास्टिक मुक्त परिसर व इ - कचरा संकलन पंधरवडा साजरा करण्यात आला. यात दैनंदिन वापरातील निरुपयोगी प्लास्टिक कचरा, क्रीबॅग याचा मानवी जीवनावर होणारा परिणाम लक्षात घेता त्याचे टाकाऊ पाणी बॉटलमध्ये संकलन करण्यात आले.

त्याचबरोबर नादुरुस्त इ - कचरा संकलन करण्यात आला. मोकळ्या मैदानावर, घराच्या परिसरात वड, पिंपळ , चिंच, लिंब यांसारख्या वृक्षांची लागवड करून त्यांचा वाढदिवस साजरा करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. या उपक्रमात शाळेतील ५७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

# विभागात सर्वात कमी पाऊस लातुरात

### २९ दिवसांची उघडीप : खरिपातील सर्वच पिकांवर परिणाम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जुलै -**
यंदा मान्सूनपूर्व पावसाने सर्व रेकॉर्ड मोडले होते. १२ मे ते १५ जूनपर्यंत पावसामध्ये सातत्य होते. त्यामुळे हंगामपूर्व कामेही शेतकऱ्यांना करता आली नाहीत. पावसाला दणक्यात सुरुवात झाली असताना आता याच अनिश्चित आणि अनियमित मान्सूनने आपले रंग दाखविण्यास सुरुवात केली आहे. गेल्या २९ दिवसांपासून पावसाची उघडीप असल्याने पिके जगतील कशी असा सवाल उपस्थित झाला आहे.

लातूर विभागातील लातूर, धाराशिव, हिंगोली, परभणी आणि नांदेड जिल्ह्यांचा समावेश आहे. या विभागात पावसाची वार्षिक सरासरी ही ८१३. ३८ मिमी एवढी आहे. १ जून ते १८ जुलै या कालावधीत १६८.४२ म्हणजेच वार्षिक सरासरीच्या तुलनेत केवळ २० टक्के पाऊस झाला आहे. यामध्ये सर्वात कमी पाऊस लातूर जिल्ह्यात १४. ३१ टक्के झाला आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यातील पावसाचे सातत्य पाहता यंदा विक्रमी पाऊस होणार असे चित्र निर्माण झाले होते. मात्र, खरिपातील पेरणी होताच पाऊस गायब झाला आणि आता खरिपातील पिके धोक्यात आहेत.

**उपलब्ध पाणीसाठ्यावर**

ही पिके जोपासण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. हलक्या आणि मध्यम प्रतीच्या जमिनीवरील पिकांनी माना टाकल्या आहेत तर वाढही खुंटली आहे. याचा परिणाम उत्पादनावर होणार असल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. तर सततच्या ढगाळ वातावरणामुळे पिकांवर किडीचा प्रादुर्भाव वाढला आहे. लातूर विभागात खरिपाचे सरासरी क्षेत्र हे २८ लाख ३० हजार ७०५ हेक्टर असून त्यापैकी २६ लाख ६० हजार ५३५ हेक्टरवर पेरा झाला आहे. उर्वरित क्षेत्रावरील पेरण्या या जमिनीत ओल नसल्याने रखडल्या आहेत. एकरी ५ ते ६ हजार रुपये खर्च करुन शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत. आता योग्य वेळी पाऊस न झाल्यास सर्व काही मातीत अशीच स्थिती शेतशिवारात झाली आहे. लातूर विभागातील पाचही जिल्ह्यांत सर्वाधिक पेरा हा सोयाबीनचा झाला आहे. सध्याच्या ढगाळ वातावरणाचा धोकादेखील याच पिकाला असून, वेळेत पाऊस न झाल्यास शेतकऱ्यांचे न भरून निघणारे नुकसान होणार आहे.

# महिला व बालकांचे संरक्षण ही सामूहिक जबाबदारी-ॲड.सौ.अश्विनी धन्नावत

## कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात पॉश व पोस्को कायद्यावर मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

कामाच्या ठिकाणी महिलांचा सन्मान आणि बालकांचे संरक्षण ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून सामाजिक बांधिलकी आहे, असे मत बाल न्याय मंडळाच्या सदस्या ड. अश्विनी धन्नावत यांनी व्यक्त केले.



जालना शहराजवळील टी. व्ही. सेंटर भागातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात आयोजित पॉश व पोस्को या कायद्यासंदर्भातील मार्गदर्शन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एम. के. पवार यांची उपस्थिती होती.

ड. धन्नावत यांनी पॉश कायद्याची माहिती देताना स्पष्ट केले की, महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण मिळावे ही प्राथमिक अपेक्षा आहे. अंतर्गत तक्रार समिती, तक्रार प्रक्रियेची पारदर्शकता आणि कायद्यातील जबाबदाऱ्या याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. पोस्को कायद्यासंदर्भात बोलताना त्यांनी बालकांवरील अत्याचार प्रकार, त्यांना ओळखण्याची लक्षणे, तक्रार दाखल करण्याची बंधनकारक जबाबदारी, आणि शिक्षण संस्थेची भूमिका यावर प्रकाश टाकला. बालकांच्या हितासाठी आपण सर्वांनी सजग असणे आवश्यक आहे, असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका के. एस. दाभाडे, ए. आर. सूर्यवंशी, एस. आर. गायकवाड, टी. एस. कुंटे, एस. डी. पिसाळ, एस. आर. तसेवाल, एस. आर. माटोले, एस. एम. शिंदे, व्ही. आर. भोरे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी दीडशे विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका के. एस. दाभाडे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार मुख्याध्यापिका एम. के. पवार यांनी मानले.

## अजितदादांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात

# सर्वच जाती-धर्माला समान सन्मान -प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे



तभा वृत्तसेवा
परतूर /प्रतिनिधी

राज्यातील व केंद्रातील प्रगतीचे शिखर गाठणारी महायुती सरकार यामध्ये उपमुख्यमंत्री अर्थमंत्री व राष्ट्रवादीची धुरा सांभाळणारे अजित दादा पवार हे राज्यात काम करत असताना सर्व समाजातील घटकांना समान हक्क न्याय व सन्मान मिळावा यासाठी कार्य करत असल्याची प्रतिपादन खासदार तथा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केले.

माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांच्या पुढाकाराने वाटुर येथे आयोजित राष्ट्रवादी कार्यकर्ता मेळाव्याला ते संबोधित करत होते. यावेळी व्यासपीठावर महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण,आनंद परांजपे,ओबीसी प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे,प्रदेश सरचिटणीस लतीफ तांबोळी, आ. विक्रम काळे,जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण,जालना महानगराध्यक्ष रशीद भाई पैलवण, अल्प संख्याक जिल्हाध्यक्ष शहाआलम खान,बळीरामजी कडपे,रवींद्र तात्या तौर, जि.प.अध्यक्ष महेंद्रजी पवार, जयमंगलदादा जाधव,युवा जिल्हाध्यक्ष माऊली सरकटे,विधानसभा अध्यक्ष संभाजी खंदारे,जि.प. सदस्य दत्ताजी बनसोडे, इंद्रजित घनवट,महिला प्रदेश सरचिटणीस वंदना खांडेभराड मॅडम, महिला जिल्हाध्यक्ष मंगलताई पाटील,जालना निरीक्षक वैद्य मॅडम यांची उपस्थिती होती. यावेळी आपल्या प्रमुख मार्गदर्शन मनोगतात पुढे बोलताना खासदार तटकरे यांनी आमदार सुरेश कुमार जेथलिया यांचे कौतुक करत म्हटले की दौऱ्यावर कार्यक्रमानिमित्त मी आलो होतो सहसा माझ्या ठरलेल्या कार्यक्रमामध्ये मी इतर कोणताही कार्यक्रम सहभागी करत नसतो मात्र जेथलिया यांनी वाटूर येथे केवळ एक ते दोन तास थांबण्याची विनंती केली या कार्यक्रमाला गर्दी पाहता त्यांच्या कार्याची प्रचिती लक्षात येते असे ते म्हणाले. जालन्या जिल्ह्यामध्ये दुर्दैवाने महायुतीमध्ये राष्ट्रवादीला जागा जरी सुटली नाही तरी या परिसरामध्ये राष्ट्रवादी पक्ष बळकट असल्याचे ते म्हणाले. जेथलिया यांच्या नेतृत्वाखाली या मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी पक्षाला वेग निर्माण झाला असल्याची देखील कबुली त्यांनी दिली. अजित दादा यांचे नेतृत्व सर्व जातीचा सन्मान करणारे असून अल्पसंख्यांक समाजाला देखील विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीने ५८ जागा पैकी तब्बल सहा जागांची उमेदवारी अल्पसंख्यांक उमेदवाराला देण्याची व त्यांना निवडून आणण्याची धमक दाखवली असल्याचे ते म्हणाले .आज अनेक अल्पसंख्यांक व बहुजन लोकप्रतिनिधी आमच्या या आमदाराच्या यादीमध्ये असून यावरूनच अजित दादा यांच्या सर्व समाजा बद्दल दूरदृष्टी लक्षात येते असे ते म्हणाले राज्यांमध्ये अर्थसंकल्प सादर करताना सर्वच समाजाला न्याय मिळेल ही भावना ठेवून अजित दादा यांनी आपली भूमिका मांडली व सदरील अर्थसंकल्प यशस्वीरित्या राबवला असल्याचे ते म्हणाले. सर्वात जास्त वेळेस अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम देखील दादांच्या नावे असल्याचा ते म्हणाले. स्थानिक पातळीवर स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये स्थानिक नेत्यांना विचारात घेऊनच युतीबाबत चर्चा होईल असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त करत जेथलिया यांनी परतूर मतदारसंघामध्ये पक्ष वाढवण्यासाठी पुढाकार घ्यावा स्थानिक स्वराज्य निवडणुकीमध्ये निर्णय घ्यायचे निश्चित त्यांना आम्ही अधिकार देऊ अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

दरम्यान आपल्या प्रास्ताविकात युवक राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव नितीन कुमार जेथलिया यांनी म्हनाले की स्थानिक स्वराज्य निवडणुकीमध्ये आम्हाला युती करताना सर्व अधिकार द्यावे जेणेकरून आम्हाला त्रास देणाऱ्या आमच्या मित्र पक्षाशी आम्ही युती करावी की नाही याबाबत आम्हाला निर्णय घेता येईल कारण त्यांची निवडणुकीमध्ये महायुती असताना देखील ते आमची उमेदवार पाडण्याचे नेहमीप्रमाणे कटकारस्थान करतील व कार्यकर्ते देखील काम करण्यास धुसफूस करतील अशी चिन्ह दिसतात. मात्र तरीही तुमचा आदेश आला तर आम्ही युती करू अशी देखील ग्वाही त्यांनी दिली. आपल्या मनोगतात माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी म्हणाले की गेल्या अनेक काळापासून मी या मतदार संघाची जबाबदारी हाताळत आलो असून एकेकाळी २५ वर्षापासून नगराध्यक्षाच्या माध्यमातून मी शहराचा व दहा वर्षाच्या कार्यकाळात परतुर मंठा मतदार संघाचा कायापालट करून दाखवला अनेक महत्वकांशी योजना या मतदार संघात आम्ही खेचून आणल्या होत्या त्याकाळी दादा जलसंपदा मंत्री असतांना पूर्णा नदीवरील बंधारे देखील मंजूर केले होते. परंतु काही लोकांमुळे दादांवर खोटे आरोप झाले व त्या बांधाऱ्यांना स्थगिती आली.अजित दादा व सुनील तटकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली असलेल्या राष्ट्रवादी पक्ष मतदारसंघात एक नंबरचा पक्ष बनेल ही ग्वाही त्यांनी या वेळेस दिली.आणि ते आम्ही येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीमध्ये ते आम्ही सिद्ध करून दाखवू असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. यासाठी या निवडणुकीचे अधिकार आम्हाला द्यावे असे वरिष्ठांना माझी विनंती असल्याची विनवणी त्यांनी आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केली. यावेळी परतुर मंठा नेर सेवली व प्रत्येक विभागातून मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. याच मेळाव्यात अनेकांनी राष्ट्रवादी अजितदादा गटात जाहीर प्रवेश केला तर परत तालुका राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदी बाबासाहेब गाडगे,मंठा तालुका अध्यक्षपदी दिलीप चव्हाण व युवक विधानसभा अध्यक्षपदी लक्ष्मण शिंदे यांना नियुक्ती पत्रक देऊन त्यांची निवड घोषित करण्यात आली यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या निवडी याच कार्यक्रमात संपन्न झाल्या.

## संक्षिप्त

### विवाहितेची आत्महत्या, चार जणांवर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

मंठा शहरातील मारवाड गल्ली येथील एका विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे घटना घडली आहे. याप्रकरणी निकिता उमेश मोहता वय ४० वर्षे व्यवसाय घरकाम रा.इंदेवाडी, जालना ता. जि. जालना यांच्या फिर्यादीवरून आरोपी-१ संकेत कैलास मनियार २. कैलास रामेश्वर मनियार ३. किरण कैलास मनियार सर्व रा. मारवाड गल्ली मंठा ता. मंठा जि. जालना ४. अंकिता भुतडा रा. माजलगाव जि.बीड त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मयत मुलीचे सृष्टी संकेत मनियार वय २१ वर्ष रा. मारवाड गल्ली मंठा ता. मंठा जि. जालना असे नाव आहे.

याप्रकरणी अधिक माहिती अशी की , आरोपीतांनी संगनमत करुन नवीन व्यवसाय टाकणे करिता माहेरकडुन पैसे घेवुन ये या कारणावरुन तीस सतत मारहाण करत असे व तीस सासरचे मंडळी ससत शारिरीक व मानसिक त्रास दिल्याने फिर्यादीची मुलगी सृष्टी हीने दिनांक १७/०७/२०२५ रोजी रात्री १०.३० वाजता त्रासाला कंटाळुन गळफास घेवुन आत्महत्या केली वगैरे मजकुराचे फिर्यादीवरून वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक केंद्रे करत आहे.



तभा वृत्तसेवा
पारध/प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील पारध पोस्टे हद्दीतील सेलुद येथे आज दि१९-७-२०२५ रोजी पाण्याच्या टाकीजवळ जंगलामध्ये विनापरवाना बेकायदेशीर रित्या गावठी हातभट्टीची दारू बनवित असलेल्या अड्ड्यावर पोलीस निरीक्षक संतोष माने , तसेच जमादार प्रकाश शिनकर, पोकॉ अनुराज वाठोरे, पोकॉ भगत इत्यादींनी धाड टाकुन आरोपी मामूर अकोस तडवी यांच्याविरुद्ध गुरन१८१/२०२५ कलम६५ फ दारूबंदी कायदा प्रमाणे गुन्हां दाखलं केला आरोपी फरार आहे पुढीलं तपासं

### मराठवाडा चेंबर ट्रेड अँड कॉमर्सची उद्या व्यापार परिषद

#### २८ वा वर्धापन दिननिमित्त छत्रपती संभाजीनगरमध्ये कार्यक्रमाचे आयोजन

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

मराठवाडा चेंबर ट्रेड अँड कॉमर्स या मराठवाडा व्यापी संघटनेचा येत्या २० जुलै रविवार रोजी २८ वा वर्धापन दिन साजरा होणार आहे. त्यानिमित्त मराठवाड्यातील सर्व व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसाठी व्यापार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री संजय शिरसाट, मंत्री अतुल सावे ,तर चेंबरचे वरिष्ठ मार्गदर्शक सत्यनारायण लाहोटी व व्यापार परिषद कार्यक्रमाचे अध्यक्ष मानसिंह पवार उपस्थित राहणार आहेत. या व्यापारी परिषदेत मराठवाड्यातील विविध व्यापारी संघटनेचे जवळपास तीनशे प्रतिनिधी उपस्थित राहतील. या परिषदेत मराठवाड्यात व्यापार /उद्योग करताना येणाऱ्या अडचणीवर चर्चा करण्यात येणार असून काही ठराव घेण्यात येणार आहे. राज्यात मराठवाडा विभाग हा मागासलेला विभाग म्हणून परिचित आहे. तसे पाहता मराठवाड्यात पर्जन्यमान कमीच असते. त्यामुळे पाण्याचा नेहमीच अभाव असतो ज्यामुळे व्यापारी/उद्योजक वर्गाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शासनाचे विविध कर भरून सुद्धा मराठवाड्यातील व्यापारी/ उद्योजकाला विशेष सुविधा मिळत नाही. नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी केंद्र व महाराष्ट्र सरकारने संपूर्ण मराठवाड्यात पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्यायला हव्यात. पण असे काही होत असताना दिसत नाही. जीएसटी रचना आल्यानंतर वन नेशन वन टॅक्सची घोषणा करण्यात आली तरी आजही औचित्य नसलेले कर व्यापारी वर्गावर लादले जातात. त्याविरुद्धही या परिषदेचे माध्यमातून आवाज उठविण्यात येणार आहे . इतर राज्यापेक्षा महाराष्ट्रात विजेचा दर जास्त असल्याने उत्पादन व विक्री किंमत वाढत असल्यामुळे इतर राज्याच्या उद्योजकांच्या स्पर्धेत येथील उद्योग टिकत नाही . तसेच वीज नियामक आयोगाने सोलार उत्पादित विद्युत वर आणलेली बंधने या विषयावर ही या परिषदेत चर्चा करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील व्यापारी/ उद्योजक वर्गाच्या दैनंदिन समस्या सोडवण्यासाठी व या विभागातील व्यापारी/ उद्योजकांचे प्रश्न जाणून त्यांना योग्य ती मदत करणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# जि.प. व पं.स. निवडणुकीमध्ये ताकद पणाला लावून अउमेदवार निवडून आणा -भुतेकर

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी




शिवसेनेचा जन्म केवळ निवडणुकीपुरताच झाला नसून राजकारणाला समाजकारणाची जोड मिळाल्याने लोकांच्या मनात शिवसेना रुजली. आगामी जि.प. व पं.स. निवडणुकीत ताकद पणाला लावून आपला उमेदवार निवडून आणा असे आवाहन संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर यांनी केले.

मंठा येथे शनिवार ता.१९ रोजी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा पार पडला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला शिवसेना जिल्हाप्रमुख तथा सभापती ए. जे. बोराडे, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, किसनराव मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री भुतेकर म्हणाले की, लोकांमध्ये मिसळून सातत्याने काम करणारा व लोक हिताचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाच या निवडणुकीत संधी देणार असल्याचे सांगून चांगल्या कार्यकर्त्याला न्याय मिळाला पाहिजे ही शिवसेनेची भूमिका आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, मागील ३०-३५ वर्षापासून समाजकारण व राजकारण करत असताना सर्वसामान्य लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. पक्ष फोडण्याची भाषाविरोधक करतात, मात्र शिवसेनेच्या जीवावर चालू असलेला हा झंझावात कदापिही थांबणार नाही असे सांगून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वतंत्र लढण्यासाठी कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे असे आवाहन त्यांनी केले.

हा मतदारसंघ शिवसेनेचा बालेकिल्ला असून या निवडणुकीत शिवसैनिक भाजपचा सुफडा साफ केल्याशिवाय स्वस्त बसणार नाही अशी ग्वाही दिली. या कार्यक्रमात बोलताना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी परतूर मतदारसंघात जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन केले. या मेळाव्याला माऊली वायाळ, पिराजी पवळे, भगवान बोराडे, शुभम गुंड यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अक्षय वाघमारे मित्र मंडळासह हजारो कार्यकर्त्यांना शिवसेनेत प्रवेश केला.

# जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून तरण्यासाठी नामस्मरण करा - ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली शेलुदकर



तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

मराठवाडा व विदर्भ यांच्या समन्वयाने सुरू असलेल्या फिरती चतुर्थी उपक्रमांतर्गत मौजे शेलूद (खालचे) ता.भोकरदन जि.जालना येथे आयोजित कार्यक्रम प्रसंगी ह भ प ज्ञानेश्वर माऊली शेलुदकर यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.

महाराजांनी किर्तन सेवेसाठी म्हणउनि शरण जावे सर्वभावे देवाशी ।।१।। तो हा उतरतील पार भवदुस्तर नदीचा ।।२।।या अभंगावर बोलतांना जगद्गुरु संत तुकाराम महाराज सांगतात की,आपण आपल्या मनापासून, शरीराने आणि वाणीने भगवंताला शरण गेले पाहिजे.भगवंत दयाळू आहे आणि तो भक्तांना नेहमीच या भवसागरातून म्हणजे जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून नक्कीच पार करेल.तो अनंत आहे, त्याचा अंत नाही, असा तो भगवंत आपल्यावर नेहमी कृपा करतो. आणि म्हणूनच भगवंताची कृपा होण्यासाठी नेहमी नामस्मरण हे करणे गरजेचे असून नामस्मरणाने आपला देह पवित्र होतो आणि वाणी पुण्यवंत व्हायला वेळ लागत नाही म्हणून अशा परमात्म्याचे चिंतन मनोभावे केल्यास निश्चित फलप्राप्ती झाल्याशिवाय राहत नाही असेही भावोद्गार महाराजांनी किर्तन प्रसंगी व्यक्त केले कार्यक्रमासाठी परिसरातील आदरणीय गायक वादक व गुनिजन महाराज मंडळी तसेच टाळकरी व पंचक्रोशीतील वारकरी तसेच समस्त गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुढील येणारी चतुर्थी मौजे देहेड ता.भोकरदन जि. जालना येथे होणार असल्याचे हभप विष्णू महाराज सास्ते यांनी सांगितले.

# उपजिल्हा रुग्णालयाला १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्या -आ.बबनराव लोणीकर

तभा वृत्तसेवा
जालना/ प्रतिनिधी

राज्य शासनाकडून जालना जिल्ह्यातील मंठा व परतुर या दोन्ही तालुक्याच्या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात आले आहेत. हे दोन्ही तालुक्याची ठिकाणे असून जालना-नांदेड व शेगाव-पंढरपूर (दिंडी मार्ग) या दोन राष्ट्रीय महामार्गाने जोडलेले आहेत. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघात होत असतात परिणामी अत्यावश्यक सेवा म्हणून लागणारे आयसीयू किंवा ऑक्सिजन यासारख्या सुविधा येथे लवकर उपलब्ध होत नाहीत. या सर्व आरोग्य सुविधा देण्यासाठी या दोन्ही उपजिल्हा रुग्णालयांना मंजुरी देण्यात आली आहे. हे दोन्ही उपजिल्हा रुग्णालयाला तत्कालीन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांच्या हाय पावर कमिटीची मान्यता होती, वारंवार त्यासाठी मंत्री महोदयांच्या दालनात बैठका घेण्यात आल्या होत्या. राज्य सरकारकडून निधी मंजूर करून त्या संदर्भातील जीआर काढण्यात आला. परंतु या दोन्ही उपजिल्हा रुग्णालयासाठी लागणारा निधी उपलब्ध झाला नाही. या दोन्ही उपजिल्हा रुग्णालयासाठी प्रत्येकी ५० कोटी रुपये प्रमाणे १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी अवचित त्याच्या मुद्द्याद्वारे आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत केली.



पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, राष्ट्रीय आरोग्य अभियान अतर्गत यापूर्वी २ वेळा डीपीआर पाठवण्यात आला होता. आता देखील पुन्हा एकदा राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नव्याने डीपीआर पाठवण्यात आला आहे. दिनांक २६ जुलै २०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन नियमाप्रमाणे मंठा येथील ३० खाटांवरुन ५० खाटांचे श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालयाचे मुख्य इमारत बांधकामाचे रु.२७.१० कोटी व अधिकारी/कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे बांधकामाचे रु.२२.६० कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. या दोन्ही उपजिल्हा रुग्णालयाच्या मुख्य इमारत कर्मचारी निवासस्थान संरक्षण भिंत अंतर्गत रस्ते यासह इतर बाबींसाठी प्रत्येकी ५० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे असेही लोणीकर यावेळी म्हणाले. चारही प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रत्येकी १० कोटी रुपये प्रमाणे ४० कोटी रुपये निधी द्या- आ. लोणीकर राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जालना जिल्ह्यातील परतूर मंठा मतदार संघात सन २०२३-२४ मध्ये एकूण ४ प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आले होते. सदरील आष्टी, वाटूर, दहिफळ खंदारे व ढोकसाळ चार प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्रत्येकी १ कोटी ४३ लक्ष असा निधी मंजूर करण्यात आला होता परंतु सदरील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र हा निधी अपुरा आहे. सदरील चारही प्राथमिक आरोग्य केंद्रास प्रत्येकी १० कोटी रुपये प्रमाणे ४० कोटी रुपये निधी मुख्य इमारत व कर्मचारी निवासस्थान याकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर करावा अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी औचीत्याच्या मुद्याद्वारे आज विधानसभेत मागणी केली. केंद्र सरकारने दिलेला प्राथमिक आरोग्य केंद्राचा १ कोटी ४३ लाख रुपये निधी परिपूर्ण परिपूर्ण प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यासाठी कमी पडत असला जो निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे त्या निधीची अद्याप पर्यंत निविदा न झाल्यामुळे तो निधी परत जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री, अर्थमंत्री व सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांनी पुढाकार घेऊन संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी मंजूर असलेल्या निधीची तात्काळ निविदा करावी, जेणेकरून ही रक्कम परत जाणार नाही. उपलब्ध रकमेतून जेवढे होईल तेवढे काम पूर्ण करून उर्वरित कामासाठी लागणारी रक्कम लवकरात लवकर मंजूर करावी असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

# गणेशोत्सव मंडळांकरिता राज्यस्तरीय स्पर्धा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२० जुलै -**

पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. सदर स्पर्धेचा अर्ज पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलद्वारेच २० जुलै पासून २० ऑगस्ट २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील.



सदर स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट,ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.

२७ ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी 'गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख 'रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांनी केले आहे.

# नवीन फॉल्टी मीटर विरोधात शिवसेनेचा जन आंदोलनाचा इशारा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.१९ जुलै -**

तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंगल फेज विद्युत पुरवठा मिळत नसल्याने तसेच नवीन फॉल्टीमीटरच्या विरोधात शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली असून वीस ग्राहकांच्या न्यायासाठी उबाठा शिवसेनेच्या वतीने जन आंदोलन छेडण्याचा इशारा लेखी निवेदना द्वारे महावितरण कंपनीला देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना फक्त आठ तास थ्री फेज वीज पुरवठा केला जातो. परंतु १६ तास शेतातील आखाड्यावर विद्युत पुरवठा नसल्याने अनेक



अडचणीला तोंड द्यावे लागत आहे सध्या बिबट्या अवतरला असल्याने अंधारामुळे त्याने अनेक जनावराचा फरशा पडला आहे यामुळे आखाड्यावर सालगडी राहत नसून रात्रीच्या वेळेला शेतात कुणीही काम करण्यास तयार नाही शेतीला जोड व्यवसाय म्हणून कुक्कुटपालन दुग्धव्यवसाय शेळीपालन. वराह पालन. यावर परिणाम होत आहे सिंगल फेज सुरू करण्यात यावे अशी मागणी उबाठा शिवसेना कार्यकर्त्यांनी केली असून आक्रमक भूमिका घेतली आहे . तालुक्यात सध्या नवीन स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम जोमात सुरू आहे या नावाखाली वीस ग्राहकांची मोठी लूट केली जात आहे नवीन मीटर बसविताना जुने मीटर फॉल्टी असल्याचे सांगून पैसे उखळण्याचे प्रकार सरस सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे जबरदस्तीने स्मार्ट नवीन मीटर बसून ग्राहकांना वेट इज धरले जात आहे एकीकडे शासन थरावर मीटर बसवणे बंधन कारक नसल्याचे सांगितले जात असले तरी नवीन मीटर बसविणाऱ्या कंपन्या शक्ती करताना दिसत आहे नवीन मीटर सुद्धा फोल्टी असल्याचे दाखवून छेडछाड केल्याच्या नावाखाली दंड आकारला जात आहे या विरोधात उभाटा शिवसेनेने महावितरण कंपनीच्या विरोधात जन आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे या आशियाचे लेखी निवेदन सहाय्यक अभियंता मुदखेड यांना देण्यात आले आहे या निवेदनावर उभाटा शिवसेना तालुका संघटक माधव पावडे. सर्कल प्रमुख विजय देशमुख बारडकर, मयूर देशमुख, प्रशांत पाटील, शेख सतार, आनंद कांबळे, यांच्यासह शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजपच्या माहूर शहराध्यक्षपदी दुसऱ्यांदा गोपू महामूने

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.२० जुलै -**

दहा गुरुंपेक्षा एक आचार्य श्रेष्ठ, शंभर आचार्यांपेक्षा एक पिता श्रेष्ठ आणि हजार पित्यांपेक्षाही एक आई श्रेष्ठ या संस्कृत सुभाषिताप्रमाणे आपल्या आईकडून सुसंस्काराचे बाळकडू तर आमदार गुरुकडून राजकारणाचे धडे घेतलेले विद्यमान नगरसेवक सागर ऊर्फ गोपु सुधीरराव महामुने यांची भारतीय जनता पक्षाचे माहूर शहराध्यक्षपदी पूनश्च एकदा दुसऱ्यांदा नियुक्ती करण्यात आली आहे. आपले राजकीय गुरू आ.भीमराव केराम यांचे अत्यंत विश्वासू निकटवर्तीय समजले जाणारे, त्यांना सलग दुसऱ्यांदा निवडून आणण्यासाठी माहूर शहरासह तालुक्यातून सिंहाचा वाटा उचलले गोपु महामुने यांची माहूर भाजपाच्या शहराध्यक्षपदी झालेली नियुक्ती ही भाजपचे तुकडे गँग करण्यासाठी आसुसलेल्यांसाठी मोठी चपराप असल्याचे मानले जात आहे.

२०११ च्या नगरपंचायत निवडणुकीत विजयी होत दुसऱ्या हाफ टर्म मध्ये माहूर नगरपंचायतच्या उप नगराध्यक्ष राहिलेल्या त्यांच्या मातोश्री शोभाताई सुधीरराव महामुने यांच्याकडून राजकारणाचे प्राथमिक बाळकडू घेऊन पुढे भाजपमध्ये प्रवेशालाच शहराध्यक्ष पदाला गवसणी घातलेले विद्यमान नगरसेवक गोपु महामुने यांची राजकीय कारकीर्द खऱ्या अर्थाने आ. भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनात्मक राजकीय तालमीत नावारूपाला आली. अर्थात यात महामुने यांची पक्षाशी असलेली एकनिष्ठता व पक्ष वाढीसाठी घेतलेली अजोड मेहनत या यशाला तेवढेच कारणीभूत ठरले आहेत. याच मेहनतीच्या फळस्वरुपात त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्याकडून अर्थात आ. भीमराव केराम यांचा भक्कम विश्वास व पाठीवरील आशिर्वादरुपी हात यामुळेच गोपु महामुने यांची दोन वर्षांच्या अंतरानंतर दुसऱ्यांदा भाजपच्या माहूर शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



माहूर येथील प्रसिद्ध सराफा व्यावसायिक गोपु महामुने यांच्या मातोश्री ह्या माहूर नगरपंचायत स्थापनेपासून २०११ ते २०१६ या कालावधीत तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेविका व याच दरम्यान अडीच वर्षे उपनगराध्यक्ष होत्या. तर गोपु महामुने हे प्रथमतः २०१६ ते २०२१ या कालावधीत स्विकृत नगरसेवक होते. याचदरम्यान त्यांनी २०२० मध्ये भारतीय जनता पक्षात रितसर प्रवेश केला. त्याचवेळी त्यांची प्रथमवेळा माहूर शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. आता दोन वर्षांच्या कालखंडानंतर त्यांची पुन्हा एकदा भाजपचे माहूर शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्ती बद्दल सर्वस्तरातून त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

या नियुक्तीविषयी भाजपाचे नूतन माहूर शहराध्यक्ष गोपू महामूने यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी विश्वास नांगरे पाटील यांनी अनुवादित केलेल्या ' जे अशक्य वाटतंय ते स्वप्न मला पहाचंय'...! प्रसिद्ध कवितेच्या माध्यमातून उदयोन्मुख पिढीसाठी संदेश दिला.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२० जुलै -**

साहित्य सम्राट आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनानिमित्त आज, शुक्रवार दि. १८ जुलै २०२५ रोजी किनवट येथील बसस्थानकाजवळील त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष के. मुर्ती आणि आनंद मच्छेवार, अॅड. हरीभाऊ दर्शनवाड, माजी नगरसेवक लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, मारोती सुंकलवाड, प्रहार क्रांती दिव्यांग संघटनेचे तालुकाध्यक्ष भगवान मारपवार, शंकर भंडारे, शिवन्ना कलगोटूवार, सुरेश साकपेल्लीवार, सुभाष आगीमेलीवार, संतोष मारपवार, किरण कलगोटुवार, साई दिसलवार, राकेश उपरवार, अमोल इंगोले, रितेश मंत्रीवार, अशोक आरपेल्लीवार, संजय कोतूरवार, राज माहूरकर, पत्रकार ड. मिलिंद सर्पे यांच्यासह विविध पक्ष आणि सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

या स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला.

## संक्षिप्त वृत्त

### भोकर भाजपा अनुसुचित जाती शहराध्यक्षपदी अरुण डोईफोडे यांची निवड

**भोकर-** येथील सामाजीक कार्यकर्ते तथा पत्रकार अरुण डोईफोडे यांची भोकर शहर भाजपाच्या अनूसूचित जाती शहराध्यक्ष पदी व तसेच माधव पवार यांची भाजपा शहर सरचिटणीस पदावर निवड करण्यात आली. भारतीय जनता पार्टी भोकर शहर मंडळ अध्यक्ष विशाल पाटील माने यांनी वरिष्ठांच्या आदेशानूसार शहर कार्यकारीणीचा विस्तार करुन विविध आघाड्यांच्या नियूक्ती केल्या आहेत. पत्रकार अरुण डोईफोडे यांच्या निवडीबद्दल भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष तथा बाजार समितीचे संचालक किशोर पा. लगळूदकर, माजी नगरसेवक शेख यूसूफभाई, संजय घंटलवार, रमेश दूधारे, संदिप नरवाडे, नागेश सोमेबोईनवाड, दिगंबर कदम, संतोष मनमंदे, सूमेध बनसोडे, विजय वाघमारे, भगवान जाधव, अंकूश चव्हाण, प्रमोद चौदंते, सूनिल कल्याणकर, मधूकर गोवंदे, गोटू क्षिरसागर, नितीन गेंटेवार, श्रिकांत गेंटेवारसह विविध क्षेत्रातील मित्रपरिवारांनी अभिनंदन केले.



### सिडको येथील शिवाजी विद्यालयाची शिष्यवृत्ती परीक्षेत यशाची परंपरा कायम

**नवीन नांदेड-** जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी संचलित शिवाजी विद्यालय सिडको येथील विद्यार्थ्यानें शिष्यवृत्ती परीक्षेत गेल्या काही वर्षापासून उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. सदरील विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळेचे उपमुख्याध्यापक रवी जाधव यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवाजी विद्यालय सिडको येथील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवून आपल्या शाळेचे नावलौकिक केले आहे. सदरील विद्यालयाच्या १० विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश मिळवले.पुर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) मध्ये विद्यालयातील पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले तर पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) विद्यालयाचे पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.पाचवीतील रुद्र अमोल पेन्शनवार,जोशी स्पृहा प्रसाद,तुपकरी लक्ष गजानन,शिरसे लक्ष्मण सुमेध व मळगे वरद अशोक हे विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत .तर इयत्ता आठवीतील पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.यामध्ये लिंगसेकर मंदार मयूर,नरवाडे मिथिलेश,बागे गणेश राजू,पांडे प्रज्वल दिलीप व जाकोरे प्रशांत प्रकाश या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शाळेच्या वतीने शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार उपमुख्याध्यापक रवी शिवाजीराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रा. साहेबराव देवरे, पर्यवेक्षक विकास पाटील,मुख्य लिपीक वसंत वाघमारे , गणेश जाधव,एम. जी.स्वामी, आर.के.चंदनशिवे, पालक आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थिती होते.



### शेखर चिंचोळकर यांची भाजप ओबीसी आघाडी अध्यक्षपदी तिसऱ्यांदा फेरनिवड

**किनवट-** भारतीय जनता पक्षाच्या किनवट तालुका कार्यकारिणीचा अलीकडेच विस्तार करण्यात आला असून, या नव्या विस्तारात किनवट उत्तर मंडळ ओबीसी आघाडी अध्यक्षपदी भाजपाचे निष्ठावान कार्यकर्ते शेखर चिंचोळकर यांची सलग तिसऱ्यांदा फेरनिवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या निवडीचे तालुका व शहरातील विविध संघटना, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांकडून हार्दिक स्वागत आणि अभिनंदन करण्यात येत आहे. ओबीसी आघाडीच्या आगामी कार्यपद्धतीवर आणि तालुक्यातील संघटनात्मक बळकटीकरणासाठी त्यांच्या नेतृत्वाकडून पुन्हा एकदा नवे योगदान मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# भारतीय जनता पार्टी किनवट शहर मंडळाची नवीन कार्यकारिणी जाहीर

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२० जुलै -**

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशाच्या मान्यतेनुसार व नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष ड. किशोर देशमुख व आमदार भिमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली, भारतीय जनता पार्टी किनवट शहर मंडळाची नवी कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. किनवट शहर मंडल अध्यक्ष स्वागत केशवराव आयनेनीवार यांच्या नेतृत्वाखाली ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, कार्यकारिणीत विविध पदांवर जबाबदारी देण्यात आली आहे.

उपाध्यक्षपदी जयराज वर्मा, नरसिंग तक्कलवार, राजेंद्र भातनासे, आकाश भंडारे, राहुल दारगुलवार, धिरज नेम्मानीवार यांची निवड करण्यात आली. सरचिटणीसपदी बाळकृष्ण कदम, सुनिल मच्छेवार, चिटणीसपदी कृष्णा कलकुंटलवार, शिवाजी आंधळे, कृष्णा वासटवार, गणेश कोल्हे, सौ. विद्याताई पाटील, गंगुताई परेकार, कोषाध्यक्षपदी सतिष बिराजदार , युवा मोर्चा अध्यक्षपदी कृष्णा इटकेपेल्लीवार, किसान मोर्चा अध्यक्ष जगदिश



तिरमनवार , महिला मोर्चा अध्यक्ष सौ. पुनम लखन दिक्षीत, ओबीसी मोर्चा अध्यक्ष शिवा कायतमवार, एससी मोर्चा अध्यक्ष शंकर भंडारे, एसटी मोर्चा अध्यक्ष संतोष पांडुरंग कनाके तर अल्पसंख्याक मोर्चा अध्यक्षपदी अरबाज खान हाशम खान (अरबाज लाला) यांची निवड करण्यात आली.

केशवराव आयनेनीवार यांनी नव्याने घोषित केलेल्या या कार्यकारिणीमुळे पक्ष संघटना अधिक बळकट होणार असून, पक्षाची ताकद शहरातील प्रत्येक प्रभागात वृद्धिंगत होईल, असा विश्वास व्यक्त करत माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार व माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पथनाट्याने रंगला चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२० जुलै -**

स्वच्छतेची सामाजिक गरज, कचऱ्यातून उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक असंख्य समस्या व त्या जाणीवेची आणि त्यावरील उपायांची प्रभावी मांडणी झाली ती नाट्य सादरीकरणातून रवींद्र नाट्यमंदिरातल्या रंगमंचावर रंगलेल्या बहारदार पथनाट्याने रसिकांची मने जिंकली. चित्रपटाच्या प्रमोशनसाठी स्वच्छतेचं पथनाट्य सादर करीत पहिल्यांदाच अनोख्या पद्धतीने 'अवकारीका' या मराठी चित्रपटाचा ट्रेलर अनावरण सोहळा रंगला. याप्रसंगी चित्रपटातील कलाकार, तंत्रज्ञ, तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त पोलीस महासंचालक. कृष्णप्रकाश आवर्जून उपस्थित होते.

# उमरीत प्रसिद्ध किर्तनकार इंदूरीकर महाराज यांच्या किर्तनाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.२० जुलै -**

उमरी शहरात महाराष्ट्रातील प्रसिद्ध समाज प्रबोधनकार ह.भ .प .निवृती महाराज इंदूरीकर यांचे १ ऑगस्ट रोजी भव्य असा किर्तन सोहळा पार पडणार आहे असे आयोजक भाजपाचे प्रदेश युवा सचिव डॉ.अमोल पाटील ढगे यांनी माहिती दिली आहे .

उमरी तालुक्यात राजकारणाचा सत्तेसाठी धुरळा उठला आसुन त्यांनां एक बघल देवून तरुणावर - समाजकार्यावर आणि समाजातील व्यक्तींनी संस्कार जपण्यासाठी

इतर कार्या प्रमाणे धार्मिक समाज संस्कृती जपली पाहिजे म्हणून भाजपा महाराष्ट्र युवा प्रदेश सचिव डॉ अमोल पाटील ढगे यांनी हा सामाजीक संदेश देवून मानसात परिवर्तन घडले पाहीजे असा उदान्त हेतू घेवून महाराष्ट्र नव्हे तर इतर राज्यात , फेसबुक इस्टाकग्रॅम वॉटसाप टिव्हटर वर प्रसिद्ध , ख्याती असलेले ह भ प निवृती महाराज इंदूरीकर यांचा कार्यप्रम दि १ आगस्ट २०२५ रोजी उमरी येथे मोढां मैदान बैल बाजार ,पोलीस स्टेशन परिसरात ठेवण्यात आले आहे .

आषाढी पोर्णीमा पवित्र महोत्सव श्रावण मास निमित इंदूरीकर महाराज नविन पिडीला जागृत करण्यासाठी भाजपा महाराष्ट्र प्रदेश युवा सचिव डॉ. अमोल पाटील ढगे यांनी इंदूरोकर महाराज यांचा किर्तन सोहळाचे आयोजन केले आहे .

जे का रंजले गाजले ! त्यासि म्हणे जो आपूले ।। तोची साधू ओळखावा ! देव तेथेचि जाणावा ।। या उक्त म्हणी प्रमाणे जनमानसाने वागावे . असे ही ढगे पाटील म्हणाले .



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची महाराष्ट्र परिषद सदस्यपदी निवड झाल्या बदल भेट घेवून डॉ . अमोल पाटील ढगे यांनी इंदूरीकर महाराज यांच्या किर्तन सोहळ्यास उपस्थि राहण्याचे निमंतत्र दिले आहे . असे सामाजिक उपक्रम घेत असल्याने अशोकराव चव्हाण यांनी त्यांच्या सामाजीक व राजकीय कार्याचे कौतुक केले आणि उपस्थित राहण्याचे अश्वासन दिलेआहे .

शेवटी अमोल पाटील ढगे यांनी उमरी व तालुका परिसरातील तमाम भक्तगन आणि नागरीकास इंदूरीकर महाराज यांच्या किर्तन सोहळ्यास उपस्थित राहून किर्तन सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# 'आपला दवाखाना' फलकावर स्व. बाळासाहेब ठाकरे नाव नसल्याने शिवसैनिकांचा राग अनावर

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२० जुलै -**

महाराष्ट्रामध्ये हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने आपला दवाखाना अशा अनेक दवाखान्याचा शुभारंभ करण्यात आला. आणि हे दवाखाने अजूनही चालूच आहे. असे असतांना मुदखेड शहरातील जो हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आहे त्या दवाखान्याच्या मुख्य फलकावर हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना असे नावच नसल्याने उबाठा शिवसैनिक यांचा राग अनावर आला.

शिवसैनिकांनी काही वेळ डॉक्टरांशी चर्चा केली व शासनाने नाव दिलेले तुम्हाला टाकण्यास काय अडचण आहे असे विचारले असता डॉक्टरांनी दोन दिवसात नाव टाकण्यात येईल असे आश्वासन दिले. त्यामुळे त्या ठिकाणी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. येत्या दोन दिवसात नाव बदलुन हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे असे नाव दया अन्यथा मोठे आंदोलन करण्यात येईल असे सांगण्यात आले. यावेळी उबाठा शिवसेनेचे नेते विश्वाभंर पवार, माजी शहरप्रमुख अंकुश मामीडवार, व विलास मैड, यांची उपस्थिती होती.

# श्रावण भिलवंडेंच्या नेतृत्वाला सर्वस्तरातून मान्यता
# नरसी येथे अभिष्टचिंतन सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२० जुलै -**

नरसी येथील श्री तुळजा भवानी जिनिंग फेडरेशनचे चेअरमन व भाजपाचे माजी जिल्हा सरचिटणीस श्रावण भिलवंडे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास तालुक्यातील नागरिक, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहू न कार्यक्रमास भव्य स्वरूप प्राप्त करून दिले.



शनिवार दि.१९ जुलै रोजी दूपार नंतर त्यांच्या नंदनंदन निवास स्थानी पार पडलेल्या या कार्यक्रमाला समाजाच्या सर्व स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्रावण मित्र मंडळ व त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमात भिलवंडे यांच्या सामाजिक व राजकीय योगदानाचा गौरव करण्यात आला. पंचायत समितीचे सभापती म्हणून कार्यरत असताना त्यांनी नायगांव तालुक्यात पारदर्शक व सर्वसमावेशक कार्यपद्धती अंगीकारत अनेक विकासाच्या योजना यशस्वीपणे राबवल्या. भेदभाव न ठेवणारी कार्यशैली आणि सर्वधर्मसमभाव जोपासणारे नेतृत्व हा त्यांचा विशेष गुणधर्म ठरला.

या वेळी भोपाळा येथील माजी उपसरपंच तथा सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन आनंद बावणे यांनी भिलवंडे यांच्या प्रामाणिक राजकीय भूमिकेची व समाजहितासाठी असलेल्या निष्ठेची विशेष प्रशंसा केली.

या अभिष्टचिंतन सोहळ्याला रामतीर्थ चे स.पो.नी विक्रम हराळे, नरसी बिटचे पो.हे.कॉ.गणपत राठोड, पो.हे.कॉ.अनिल रिंदकवाले, उद्योगपती मारोतराव कवळे गुरुजी ,भाजपाचे बालाजी बच्चेवार, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी पांडुरंग नागेश्वर, काँग्रेसचे सय्यद रहिम, नरसीचे माजी सरपंच व्यंकट कोकणे, मारोती भिलवंडे, वसंत कस्तुरे, ईब्राहिम बेग पटेल,पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष गोविंदराव टोकलवाड, भुषण पारळकर, गंगाधर गंगासागरे, शेषेराव कंधारे, आनंदराव सूर्यवंशी, गणेश कंदूर्के, साईनाथ अकमवाड, राजेश्वर वडगांवे, इत्यादींसह अनेक सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी आकर्षक व सुरुचि भोजन व्यवस्था करण्यात आली होती. नागरिकांसाठी पुरेशी बैठक व्यवस्था, महिलांसाठी स्वतंत्र विभाग व ज्येष्ठ नागरिकांसाठी खास जागा ठेवण्यात आली होती. त्यामुळे कार्यक्रमाची आखणी कौतुकास्पद ठरली.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी श्रावण भिलवंडे यांनी उपस्थितांचे आभार मानत पुढील वाटचालीबाबत आपले विचार व्यक्त केले. त्यांनी सांगितले, सामाजिक भान राखत, सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करणारा, पारदर्शक आणि परिणामकारक विकास साधण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. जनसेवा हेच माझे ध्येय असून, पक्ष, जात, धर्म हे भेद विसरून 'माणूस केंद्रबिंदू' मानणारे राजकारण पुढे घेऊन जाणार आहे.

या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने केवळ एका व्यक्तीचा गौरव झाला नाही,तर समाजातील विविध घटकांनी एकत्र येत दिलेला पाठिंबा ही त्यांच्या नेतृत्वाची सर्वपक्षीय मान्यता ठरली. नायगाव परिसरातील राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक वर्तुळात या कार्यक्रमाची उत्स्फूर्त चर्चा सुरू असून भिलवंडे यांच्या मितभाषी, संयमी व सकारात्मक नेतृत्वाची छाप या सोहळ्याच्या निमित्ताने अधोरेखित झाली आहे.